४. या प्रतिबंधांमध्ये अमेरिका आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) सारख्या आंतरराष्ट्रीय बँकांकडून पतपुरवठा थांबवणे, परवाना आवश्यक असलेल्या वस्तू आणि तंत्रज्ञानाची विक्री रोखणे, बँका, उत्पादक आणि पुरवठादारांवर बंदी घालणे, मालमत्तेचे व्यवहार आणि विशिष्ट अधिका–यांवर आर्थिक आणि व्हिसाविषयक निर्बंध यांचा समावेश आहे.

५. तथापि, जर राष्ट्राध्यक्षांनी असे प्रमाणित केले की, हा करार अमेरिका आणि सहयोगी देशांसाठी धोका नाही, की निर्बंध माफ करणे हे अमेरिकाच्या 'महत्त्वाच्या राष्ट्रीय सुरक्षा हितसंबंधांमध्ये' आहे किंवा ज्या देशाला मंजुरी दिली जात आहे तो 'विरोधक देशा' वरील भविष्यातील अवलंबित्व कमी करण्याची हमी देत आहे, तर हा कायदा त्यांना निर्बंध माफ करण्याचा किंवा त्यांना स्थगित करण्याचा अधिकार देतो.

**चीन आणि तुर्कीवरील निर्बंध –**

१. अमेरिकेने चीन आणि तुर्कीवर एस–४०० क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीच्या खरेदीबाबत आधीच निर्बंध घातले आहेत.

२. चीनवरील निर्बंधांमध्ये निर्यात परवाने नाकारणे, परकीय चलन व्यवहारांवर बंदी, अमेरिकेच्या अधिकारक्षेत्रातील मालमत्तेतील सर्व मालमत्ता आणि हितसंबंध यावर टाच आणणे आणि व्हिसा बंदी यांचा समावेश आहे.

३. SSB या तुर्कीच्या मुख्य संरक्षण खरेदी एजन्सीवरील निर्बंधांमध्ये परवाने आणि कर्जावरील बंदी आणि SSB चे प्रमुख इस्माईल डेमिर आणि इतर अधिका–यांना पत/कर्ज आणि व्हिसा यावर निर्बंध आणणे यांचादेखील समावेश आहे.

**भारतासाठी सवलती –**

अमेरिकेच्या लोकप्रतिनिधीगृहा (हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह) ने २०१८ मध्ये रशियाकडून एस–४०० क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली खरेदी करण्यासाठी १४ जुलै रोजी काउंटरिंग अमेरिकाज ॲडव्हर्सरीज थ्रू सॅन्शन्स ॲट (CAATSA) अंतर्गत आर्थिक निर्बंधांमधून भारताला सूट देणारी एक कायदा दुरुस्ती मंजूर केली.

भारतीय–अमेरिकन काँग्रेस सदस्य रो खन्ना यांनी ही दुरुस्ती मांडली आणि बिडेन प्रशासनाला भारताला सवलत देण्याची विनंती केली.

**बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह (बीआरआय) (Belt Road Initiative - BRI)**

**बीआरआय काय आहे ?**

- बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह (BRI), ज्याला 'वन बेल्ट वन रोड इनिशिएटिव्ह' म्हणूनही ओळखले जाते, हे जागतिक, राजकीय आणि धोरणात्मक प्रभाव वाढविण्याच्या संदर्भातील चीनच्या आर्थिक आणि औद्योगिक सामर्थ्याचे प्रदर्शनाचे प्रतीक आहे. शी जिनपिंग हे सत्तारूढ होण्याच्या आधीच्या अनेक बीजिंग–समर्थित पायाभूत सुविधा प्रकल्पांना दर्शविण्यासाठी हे नाव देण्यात आले आहे.

१. बीआरआय भागीदारीमध्ये आशिया आणि आफ्रिकेतील अनेक देशांमध्ये पसरलेल्या बांधकाम, वाहतूक, विमान वाहतूक, दूरसंचार आणि ऊर्जा क्षेत्रातील पायाभूत गुंतवणुकीचा समावेश आहे.

२. अनेक लॅटिन अमेरिकन आणि कॅरिबियन राज्यांनी अलीकडे बीआरआयमध्ये सामील होण्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्ष–या केल्या आहेत.

३. मध्य आणि पूर्व युरोपीय देशांच्या तथाकथित १६+१ (चीन) गटामध्ये युरोपियन युनियन (EU) मधील ११ राज्यांचा समावेश आहे.

४. इटलीने गेल्या आठवड्यात बीआरआयला मान्यता दिली, जे असे करणार्या ७ सर्वाधिक औद्योगिक राष्ट्रांच्या गटातील हा पहिला देश आहे.

५. या घडामोडींमुळे ब्रुसेल्स आणि वॉशिंग्टनमध्ये खळबळ उडाली आहे, जे आधीच ट्रान्स–अटलांटिक युतीमध्ये उद्भवलेल्या अनेक समस्यांना तोंड देत आहेत.




**चीनच्या बीआरआय प्रकल्पाची रूपरेषा**

**बीआरआयवर चीनने इतका भर का दिला आहे?**

१. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, २००७–०८ आर्थिक मंदीनंतर विकसित देशांना होत असलेल्या चीनच्या निर्यातीतील घसरणीमुळे या दशकाच्या सुरुवातीला देशांतर्गत आर्थिक वाढ मंदावण्यावरील उपाययोजना म्हणजे बीआरआय होय.

२. देशांतर्गत पायाभूत सुविधांवरील खर्च फारसा परवडण्यायोग्य न राहिल्यामुळे, बीजिंगने देशांतर्गत व्यवसायांची जागतिक स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणात भर दिला.

३. सप्टेंबरमध्ये बीआरआयच्या पाचव्या वर्धापन दिनादरम्यान, शी जिनपिंग यांनी या प्रमुख कार्यक्रमाचे वर्णन भू–राजकीय किंवा लष्करी युतीऐवजी 'आर्थिक सहकार्याचा उपक्रम' म्हणून केले.

४. परंतु मुख्य गोष्ट ही आहे की, अल्पविकसित आणि विकसनशील देशांमध्ये मोठ्या पायाभूत गुंतवणुकीमुळे बीजिंगला संभाव्यत: जागतिक व्यवस्थेचे प्रस्थापित नियम बदलण्यासाठी जगभरातील आपल्या प्रभावाचा फायदा उठवण्यास सक्षम केले आहे.

**चीन–पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर (CPEC) बाबत भारताची चिंता –**

सीपेकमध्ये बहुविध प्रकल्पांचा समावेश आहे. ज्यातील एक मुख्य प्रकल्प म्हणजे, बलुचिस्तान प्रांतातील ग्वादार शहरातील बंदराचा विकास. ग्वादार बंदराच्या विकासामुळे चीनच्या झिनजियांग प्रांताला अशा एका बंदराच्या



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

सुविधेची उपलब्धता झाली आहे जे चीनमधील इतर पूर्वेकडील बंदरांपेक्षा जवळ आहे. ग्वादार बंदरामुळे चीनला मलाक्काच्या सामुद्रधुनीतून जाणार्या व्यस्त सागरी वाहतूक मार्गाचा अवलंब न करता चीनला अरबी समुद्रात आपले प्रस्थापित करता येईल, अशी चीनची योजना होती. इतर काही प्रकल्पांमध्ये प्रचंड प्रमाणात गुंतवणूक असलेले वीजनिर्मिती, वाहतूक आणि दूरसंचार प्रकल्पांचा समावेश होता.

सीपेक प्रकल्प पाकव्याप्त काश्मीरमधून जात असल्याने तो भारताच्या प्रादेशिक सार्वभौमत्वाचे उल्लंघन करतो.




### हिंद महासागर क्षेत्रात चीनची वाढती उपस्थिती

२१ नोव्हेंबर २०२२ रोजी चीनच्या सर्वोच्च विकास साहाय्य एजन्सीने दक्षिण-पश्चिम चिनी शहर कुनमिंग येथे पहिली 'चीन-हिंद महासागर क्षेत्र मंचा'ची बैठक आयोजित केली. चायना इंटरनॅशनल डेव्हलपमेंट कोऑपरेशन एजन्सी (CIDCA) ने आयोजित केलेली ही बैठक हिंद महासागर क्षेत्रावर (IOR) लक्ष केंद्रित करणारा अगदी अलीकडचा चिनी उपक्रम आहे, जो या प्रदेशातील बीजिंगच्या वाढत्या धोरणात्मक हितसंबंधांना अधोरेखित करतो, त्याच्या आर्थिक हितसंबंधांच्या पाऊलखुणा ठळकपणे दिसून येतात.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**भारतासाठी हिंद महासागर क्षेत्राचे (IOR) चे महत्त्व –**

२१ नोव्हेंबर २०२२ रोजी चीनच्या सर्वोच्च विकास साहाय्य एजन्सीने दक्षिण–पश्चिम चिनी शहर कुनमिंग येथे पहिली 'चीन–हिंद महासागर क्षेत्र मंचा'ची बैठक आयोजित केली. चायना इंटरनॅशनल डेव्हलपमेंट कोऑपरेशन एजन्सी (CIDCA) ने आयोजित केलेली ही बैठक हिंद महासागर क्षेत्रावर (IOR) लक्ष केंद्रित करणारा अगदी अलीकडचा चिनी उपक्रम आहे, जो या प्रदेशातील बीजिंगच्या वाढत्या धोरणात्मक हितसंबंधांना अधोरेखित करतो, त्याच्या आर्थिक हितसंबंधांच्या पाऊलखुणा ठळकपणे दिसून येतात.

**भारतासाठी हिंद महासागर क्षेत्राचे (IOR) चे महत्त्व –**

१. स्थान : भारत महासागराच्या मध्यभागी वसलेला आहे आणि जवळजवळ ७,५०० किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा त्याला लाभला आहे.

२. भारताच्या सहभागासाठी सुरक्षा परिमाण : प्रदीर्घ किनारपट्टीमुळे भारताला नेहमीच दहशतवादी हल्ले आणि सुरक्षाविषयक समस्याना तोंड द्यावे लागते. तस्करी, अवैध मासेमारी आणि मानवी तस्करी या इतर प्रमुख समस्या आहेत.

३. व्यूहात्मक महत्त्व : भारत विविध सहकार्य प्रकल्पांमध्ये गुंतलेला आहे आणि इराणमधील चाबहार बंदराचा विकास आणि मॉरिशस आणि सेशेल्समधील 'पायाभूत सुविधा विकास अधिकार' यांच्यामार्फत आपली पोहोच वाढविण्याचा प्रयत्न करत आहे.

४. आर्थिक महत्त्व : भारत आपला बहुतांश व्यापार याच व्यापारी मार्गाने करतो आणि तेल पुरवठ्यासाठी या मार्गावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे.

५. संसाधनांची आवश्यकता : भारताला हिंद महासागरातील संसाधनांची आवश्यकता आहे. मत्स्यपालन आणि मत्स्यपालन उद्योग हे निर्यातीचे प्रमुख स्त्रोत आहेत.

६. भारताची भूमिका : IOR ची भारताशी भौगोलिक राजकीय जवळीक 'संरक्षण प्रदान करणारा देश' आणि या प्रदेशात 'प्रथम प्रतिसाद देणारा देश'म्हणून भारताचा दर्जा वाढवते.

७. याशिवाय, भारताच्या अगदी अंगणातच असलेल्या या प्रदेशामध्ये भारताच्या 'प्रभावक्षेत्रा'त त्याला व्यूहात्मक संतुलक (Strategic balancer) म्हणून भूमिका पार पाडण्याची संधी मिळते.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421




**चीन हिंद महासागर क्षेत्र मंचाची स्थापना का झालेली आहे ?**

CIDCA ही चीनची नवीन विकास मदत एजन्सी असून, तिचे सध्याचे प्रमुख व माजी उपपरराष्ट्रमंत्री लुओ झाओहुई हे आहेत. तिने एका निवेदनात म्हटले आहे की हा मंच 'चीन आणि हिंद महासागर क्षेत्रातील देशांनी संयुक्तपणे आयोजित केलेला पहिला उच्च-स्तरीय अधिकृत विकास सहकार्य मंच आहे' आणि 'हिंद महासागराच्या सीमेवर असलेल्या १९ देशांतील वरिष्ठ अधिकार्यांसह १०० हून अधिक सहभागी' उपस्थित होते.

**भारताची भूमिका –**

नवी दिल्लीने या प्रदेशातील चीनच्या अलीकडच्या हालचालींकडे लक्षपूर्वक पाहिले आहे, ज्यामध्ये चीनच्या लष्करी ट्रॅकिंग जहाज युआन वांग ५ च्या अलीकडील श्रीलंकेच्या भेटीचा समावेश आहे. शिवाय, भारत IORA कडे या प्रदेशासाठीचे आधीच स्थापित व्यासपीठ म्हणून पाहतो, ज्यामध्ये ज्यात चीन, जपान, रशिया, ब्रिटन आणि अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि मालदीवसह २३ सदस्य आहेत, ज्यामध्ये १० संवाद भागीदार आहेत.

**भारतासाठी कळीचे मुद्दे –**

१. भारत सावधपणे पावले टाकत आहे : भारताने क्वाड गटामध्ये सामील होणे हे याचा संकेत देते की ते हिंदी महासागरात धोरणात्मक दुविधेचा सामना करत आहे.

२. भारताच्या मर्यादा : सध्या भारत हा एकटाच संपूर्ण क्षेत्राच्या सुरक्षेची व्यवस्था करण्यास सक्षम नाही.

३. चिनी आव्हान : चिनी सैन्य आणि नौदल या प्रदेशात त्यांची उपस्थिती वाढवत आहेत आणि यामुळे भारत आणि इतर लहान राष्ट्रांच्या सुरक्षाविषयक चिंता वाढल्या आहे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

४. चीन आणि पाश्चिमात्य देश : पाश्चिमात्य देशांशी असलेले चीनचे शत्रुत्व लक्षात घेऊन, हा देश या प्रदेशात दीर्घकालीन संबंध ठेवण्याचा प्रयत्न करत आहे, जेणेकरून तो या प्रदेशात पाश्चात्य शक्तींपेक्षा अधिक प्रभावशाली होऊ शकेल.

५. भारताचा कमी खर्च : भारताचा नौदलावर होणारा खर्च इतर मोठ्या शक्तींच्या तुलनेत खूपच कमी आहे. अशा प्रकारे इतर शक्तींपेक्षा श्रेष्ठत्व मिळवणे कठीण होईल.

**नवीन दृष्टिकोन –**

१. कोविड–१९ मुळे महासागरी बेट राष्ट्रांना मोठा फटका बसला आहे, अशावेळी भारत त्यांचा गरजेच्यावेळी साह्य करणारा मित्र म्हणून काम करेल: भारत हा त्यांचा संकटसमयी सर्वप्रथम मदत करणारा मित्र होणे गरजेचे आहे आणि भविष्यात त्यांचा पाठिंबा परत मिळविण्यासाठी या देशांना सुरक्षा आणि साहाय्य करणे गरजेचे आहे.

२. दिल्ली त्याच्या आणि 'पश्चिमेकडे पाहा' (Look West) च्या दृष्टिकोनांमध्ये संतुलन शोधत आहे. हा दृष्टिकोन हिंद महासागर क्षेत्रात प्रभावी उपस्थिती व लूक ईस्ट या धोरणांच्या एकत्रीकरणासाठी महत्त्वाचा आहे. इंडो–पॅसिफिक समुद्री क्षेत्राच्या दोन टोकांसाठी सूक्ष्म फरक असलेले हे त्याचे दोनही दृष्टिकोन महत्त्वपूर्ण असतील.

३. नौदलात गुंतवणूक वाढवावी.

**आयटूयूटू (I2U2)**

आयटूयूटू (I2U2) म्हणजे भारत, इस्रायल, संयुक्त अरब अमिराती, आणि अमेरिका. संयुक्त अरब अमिरातीचे भारतातील राजदूत अहमद अल्बन्ना यांनी 'वेस्ट एशियन क्वाड' म्हणून देखील याचा उल्लेख केला आहे. ऑटोबर २०२१ मध्ये परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर हे इस्रायलच्या भेटीवर असताना चार देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची बैठक झाली होती. त्या वेळी या गटाला 'आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य मंच' असे संबोधले गेले होते.

**सहकार्याची क्षेत्रे –**

या देशांनी परस्पर सहकार्याच्या सहा क्षेत्रांची ओळख केली आहे आणि पाणी, ऊर्जा, वाहतूक, अंतराळ, आरोग्य आणि अन्न सुरक्षा या क्षेत्रांमध्ये संयुक्त गुंतवणुकीला प्रोत्साहन देणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे. वृत्तपत्र निवदनात अस म्हटले गेले आहे की, 'खाजगी क्षेत्रातील भांडवल आणि कौशल्य' यांच्या मदतीने, हे देश पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण, उद्योगांसाठी कमी कार्बन उत्सर्जनाचे मार्ग शोधणे, सार्वजनिक आरोग्य सुधारणे आणि गुंतागुंतींच्या उदयोन्मुख आणि हरित तंत्रज्ञानाच्या विकासास प्रोत्साहन देतील.

१. आयटूयूटू हा एक परिणाम आहे आणि पश्चिम आशियाई प्रदेश ज्या परिस्थितीमधून जात आहे त्याचे प्रतिबिंब आहे.

२. आयटूयूटू ची निर्मिती हा अब्राहम कराराचा थेट परिणाम मानला जातो.

३. अब्राहम कराराने २०२० मध्ये संयुक्त अरब अमिरात, बहारीन, सुदान आणि मोरोक्को सारख्या अनेक अरब देशांनी इस्रायलशी राजनैतिक संबंध प्रस्थापित केले. या प्रक्रियेत अमेरिकेची महत्त्वाची भूमिका होती.

४. इस्रायल आणि किमान काही अरब देशांमधील वैमनस्य संपुष्टात आल्याने अधिक प्रादेशिक आणि बहुपक्षीय सहकार्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

५. आयटूयूटू हा या प्रदेशातील बदलत्या समीकरणांच्या पार्श्वभूमीवर इस्रायल आणि संयुक्त अरब अमिराती या प्रादेशिक शक्ती आणि भारत आणि अमेरिका हे त्यांचे अतिरिक्त प्रादेशिक जवळचे भागीदार यांच्यात सहकार्य वाढवण्याचा प्रयत्न आहे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**भारतासाठी आयटूयूटूचे सकारात्मक परिणाम –**

१. भारत हा मध्यपूर्वेत अमेरिका सोडत असलेली पोकळी भरून काढेल.

२. त्यात प्रदेशाचे भूराजनीती आणि भू–अर्थशास्त्र बदलण्याची क्षमता आहे.

३. व्यापार, ऊर्जा संबंध, हवामान बदलाशी लढा देणे आणि सागरी सुरक्षा वाढवणे या भारताशी संबंधित मुद्द्यांवर हा गट आपली प्रतिबद्धता वाढवू शकतो.

४. भारताचे इस्रायल आणि आखाती देशांसोबत असलेल्या मजबूत संबंधांशी ते अनुरूप आहे.

५. आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या चीनचा मुकाबला करण्यासाठी हे एक प्रभावी साधन असू शकते.

**भारताच्या चिंता –**

१. या भागीदारीमध्ये सौदी अरेबियासारख्या इतर अरबी आखाती शक्तींची भूमिका अद्याप निश्चित झालेली नाही.

२. चिंतेची बाब म्हणजे भारत वगळता इतर तीन देश हे इराणचे विरोधक आहेत.

३. भारत – इराण संबंधांसाठी हे चिंतेचे कारण आहे. हे दोन्ही देश चाबहार आणि मध्य आशियायी देशांशी मैत्री करण्यासारख्या धोरणात्मक प्रकल्पांवर सहकार्य करत आहेत.

४. चार देशांच्या या नवीन भागीदारीने अद्याप आपली धोरणात्मक उद्दिष्टे स्पष्ट केलेली नाहीत.

५. भारताबाबत अमेरिकेचे धोरण फारसे ठाम स्वरूपाचे राहिलेले नाही. त्याने इंडो–पॅसिफिकमध्ये अणघणड ही समांतर भागीदारी तयार केली आहे. भारताला विश्वासात न घेता अमेरिकेने अफगाणिस्तानातून माघार घेतली.

६. या पार्श्वभूमीवर अमेरिकेला मध्यपूर्वेतील आपल्या धोरणात्मक महत्त्वाकांक्षेबाबत भारताची भूमिका अधिक स्पष्ट करण्याची गरज आहे.

अशाप्रकारे, आयटूयूटूचे भारताचे सदस्यत्व ज्याने सहकार्याचे एक साधेसोपे धोरण अधोरेखीत केले असून, ते भारताच्या अंतर्गत बाबींमध्ये 'हस्तक्षेप न करणे, धोरणात्मक स्वायत्ततेचा पाठपुरावा करणे आणि द्विपक्षीयतेचा लघुपक्षीयतेपर्यंत विस्तार करणे या धोरणाशी सुसंगत असल्याचे दिसते.

**दक्षिण चीन समुद्रविषयक भूराजनीती**

**महत्त्व –**

१. सर्वसाधारणपणे इंडो–पॅसिफिक क्षेत्र, विशेषतः दक्षिण चीन समुद्र हे अलीकडेच महत्त्वाचे भू–राजकीय केंद्र म्हणून उदयास आले आहे.

२. जवळजवळ १/३ जागतिक व्यापार वाहतूक, तेल आणि नैसर्गिक वायू संसाधनांची समृद्धता आणि जगातील मत्स्यपालनापैकी सुमारे १०% हिस्सा असलेला दक्षिण चीन समुद्र हा त्याच्या सभोवतालच्या किनारी देशांमध्ये वादाचा एक विषय आहे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**दक्षिण चीन समुद्रातील सध्याचे विवाद –**

१. चीनने ९–डॅश लाइनच्या संकल्पनेसह ९०% क्षेत्रावर दावा केला आहे.

२. UNCLOS च्या अनुषंगाने उच्च समुद्रातील नियम–आधारित नौवहनासाठी अमेरिकेने'नौवहन कार्यांचे स्वातंत्र्य' (Freedom of Navigation Operations) या संकल्पनेंतर्गत या प्रदेशात आपली लष्करी उपस्थिती वाढवली आहे.

३. हे UNCLOS अंतर्गत 'नौवहन स्वातंत्र्य' या तत्त्वाशी सुसंगत आहे ज्यात उच्च समुद्रांमध्ये जहाजांच्या निर्बंधरहित मुक्त वाहतुकीसासाठी तरतुदी केल्या आहेत.

४. विवादित सेनकाकू/डियाओयू बेटांमुळे या भागात जपानने आपली उपस्थिती वाढविली आहे.

५. फिलीपिन्स, व्हिएतनाम हे अनुक्रमे स्प्रेटली आणि पॅरासेल बेटांवर आपला हक्क सांगणाऱ्या प्रादेशिक शक्ती म्हणून उदयास आले आहेत.

६. इतर महत्त्वाच्या देशांमध्ये मलेशिया, इंडोनेशिया आणि ब्रुनेई यांचा समावेश आहे.




**भारतासाठी प्रासंगिकता –**

- भारत आणि इतर आग्नेय आशियाई देशांनी नेहमीच दक्षिण चीन समुद्राला जागतिकदृष्ट्या सामाईक क्षेत्र मानले आहे.
- याशिवाय ऐतिहासिकदृष्ट्या दळणवळणाचा एक महत्त्वाचा सागरी मार्ग म्हणून या समुद्राने महत्त्वाची भूमिका पार पाडली असून, त्यामधून मलेशियातील केदाह ते चीनमधील क्वानझूपर्यंत भारताचा व्यापार चालत असे.
- याशिवाय आसियान देशांसोबत भागीदारी वाढवण्याचे भारताचे उद्दिष्ट आहे. दक्षिण चीन समुद्राची सुरक्षा भारतासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

## रशिया–युक्रेन युद्ध

- येथे, रशिया–युक्रेन युद्धाच्या तपशीलांचा अभ्यास करण्याऐवजी, आपण या युद्धाचे परिणाम आणि प्रभावांचा अभ्यास करणार आहोत.




### जागतिक अर्थव्यवस्थेवरील परिणाम –

१. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) ने असे निदर्शनास आणले होते की, रशिया आणि युक्रेन हे दोन्ही प्रमुख आवश्यक वस्तूंचे उत्पादक आहेत आणि तेथील संघर्षामुळे जागतिक किमती, विशेषतः तेल आणि नैसर्गिक वायूच्या किमती वाढल्या आहेत.

२. गव्हाच्या जागतिक निर्यातीत युक्रेन आणि रशियाचा ३०% पर्यंत वाटा असल्याने अन्नधान्याच्या किमतीही वाढल्या आहेत. IMF ने म्हटले आहे की, संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेवर मंद वाढ आणि वेगवान चलनवाढ असे परिणाम जाणवतील.

३. विशेषत: कमकुवत सामाजिक सुरक्षा सविधा, नोकरीच्या कमी संधी, मर्यादित मौद्रिक क्षेत्र आणि लोकप्रिय नसलेली सरकारे असलेल्या देशांमध्ये वाढत्या किमतींमुळे सामाजिक तणाव निर्माण होऊ शकतो,

४. तेलाच्या आयातीवर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थांमध्ये महागाईच्या दबावाबरोबरच व्यापक वित्तीय आणि व्यापार तूट दिसून येईल. तथापि, मध्य पूर्व आणि आफ्रिकेतील निर्यातदारांना जास्त किंमतींचा फायदा होऊ शकतो.

५. ऑटोमोटिव्ह आणि इलेट्रॉनिससह उच्च–मूल्याच्या वस्तू आणि इतर महत्त्वाच्या वस्तूंच्या पुरवठा साखळीला, विशेषतः युरोप आणि आशिया दरम्यानच्या व्यापार कॉरिडॉरमध्ये व्यत्ययांचा फटका बसला.


Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

### जागतिक कृषी बाजारावरील परिणाम

युक्रेनवर रशियाच्या आक्रमणामुळे या प्रदेशात अस्थिरता निर्माण झाली नाही आणि लाखो लोकांना विस्थापित केले गेलेच, परंतु त्याशिवाय जागतिक पातळीवर अन्नधान्याची कमतरता देखील निर्माण झाली. जूनच्या सुरुवातीला, यूनोच्या अन्न आणि कृषी संघटनेने (एफएओ) एक अहवाल प्रसिद्ध केला होता ज्यात कृषी बाजारासाठी युक्रेन आणि रशियाचे महत्त्व आणि फेब्रुवारी २०२२ मध्ये रशियाने देशावर आक्रमण केल्यावर युक्रेनमध्ये सुरू झालेल्या युद्धाशी संबंधित जोखीम व संकटांचा लेखाजोखा मांडलीा होता.

१. देशव्यापी युद्धाने युक्रेनच्या कृषी उत्पादनावर दबाव आणला आहे आणि त्याच्या आर्थिक व्यवहारांवर मर्यादा आणली आहे, त्यामुळे तेथील लोकांची क्रयशक्ती कमी झाली आहे. अन्न असुरक्षितता आणि कुपोषणही वाढत आहे.

२. FAO च्या अंदाजानुसार जर युद्धामुळे रशिया आणि युक्रेनच्या अन्नधान्याच्या निर्यातीवर दीर्घकाळ परिणाम झाला तर २०२२–२३ मध्ये जगभरात कुपोषित लोकांची संख्या ८–१३ दशलक्षने वाढू शकते.

३. रशिया आणि युक्रेनमधून अन्नधान्ये आणि खते आयात करणारे अनेक देश या वर्गवारीत मोडत असल्याने या युद्धामुळे कमी विकसित देश आणि कमी उत्पन्न असलेले अन्न–तूट असलेले देश प्रभावित झाले आहेत.

४. गहू आणि बार्लीच्या आंतरराष्ट्रीय किमती २०२० मधील किमतींच्या तुलनेत २०२१ पर्यंत ३१ टक्क्यांनी वाढल्या आहेत. हे उच्च जागतिक मागणी आणि धान्य उत्पादन करणार्या देशांमध्ये हवामान–संबंधित उत्पादन मर्यादांमुळे घडले आहे.

५. मे २०२२ मध्ये, एक महत्त्वाचे नायट्रोजन–आधारित खत असलेल्या युरियाच्या किंमती युद्धामुळे डिसेंबर २०२० च्या पातळीपेक्षा अडीच पटीने वाढल्या होत्या.

### भारताची प्रतिक्रिया –

- भारत सर्व ठरावांमध्ये मतदानापासून दूर राहिला.
- ही तत्त्वे आंतरराष्ट्रीय नियम आणि तत्त्वांवर आधारित सुरक्षित आणि शाश्वत उपाययोजनांसाठी साह्य करतात.
- भारत हा कोणत्याही बाजूस विरोध करत नाही, तर लोकांना शस्त्राऐवजी मानवतावादी मदत आणि पाठिंबा उपलब्ध करते. उदाहरणार्थ, भारताने युक्रेनला ९० टन मानवतावादी मदत पाठवली.
- भारत हा जागतिक उलथापालथीच्या काळात आणि सामायिक जबाबदारीद्वारे शांततापूर्ण निराकरणापर्यंत पोहोचण्यासाठी धोरणात्मक स्वायत्ततेवर भर देतो.

### भारतासाठी कळीचे मुद्दे –

१. रशिया आणि अमेरिका यांच्याशी असलेल्या संबंधांत समतोल राखणे : भारताचे रशिया आणि अमेरिका या दोन्ही देशांशी चांगले संबंध आहेत आणि यापैकी एका देशाची बाजू घेतल्याने भारताचे दुसर्या देशाशी असलेले संबंध खराब होऊ शकतात.

२. पूर्व युरोपमधील राजकीय संघर्षापासून भारताने आपली तटस्थता कायम ठेवली आहे : भारत हा संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत युक्रेनवरील मतदान प्रक्रियेपासून दूर राहिला आहे.

३. रशिया–चीनची जवळीक : रशिया आधीच इंडो–पॅसिफिक संकल्पना आणि क्वाडकडे शीतयुद्ध गटाच्या राजकारणाचे

पुनरुज्जीवन म्हणून बघत आहे आणि ते त्याच्या आशिया–पॅसिफिक हितसंबंधांसाठी हानिकारक असमजत असून, त्यांना विरोध करत आहे आणि. युक्रेनमधील कोणताही संघर्ष आणि या संघर्षांमुळे रशिया–पाश्चात्त्य देशांमधील संबंध तुटल्यास या संकल्पनांना आणि मंचांना, जे आपले अमेरिकाशी असलेल संबंध अधिक दृढ करीत आहेत त्यांना रशियाचा असलेला विरोध आणखी तीव्र होईल.

४. रशियामधील भारताची गुंतवणूक : रशियाच्या ऊर्जा क्षेत्रातील भारताच्या योजना आणि त्याच्या सुदूर पूर्व धोरणाच्या विकासामध्ये समस्या निर्माण होतील. हे अमेरिकेच्या जटिल निर्बंधांना सामोरे जाण्याच्या खाजगी क्षेत्राच्या अनिच्छेमुळे आणि रशियन बँकांना स्विफ्ट प्रणालीमधून वगळण्यामुळे घडू शकते.

५. रशियासोबतचा शस्त्रास्त्र व्यापार : रशिया हा भारताचा प्रमुख शस्त्र पुरवठादार राहिला आहे.

१. SIPRI च्या अहवालानुसार, २०१७–२१ मध्ये भारताच्या एकूण शस्त्रास्त्र आयातीपैकी रशियाचा वाटा ४६% (२०१२–१६ मध्ये ६९%) होता.

**इंडो–पॅसिफिक इकॉनॉमिक फ्रेमवर्क (Indo-Pacific Economic Framework)**

भारताने इंडो–पॅसिफिक इकॉनॉमिक फ्रेमवर्क फॉर प्रोस्पॅरिटी (IPEF) मध्ये सहभागी होण्यास मान्यता दिली आहे. हा १२ देशांचा समावेश असलेल्या अमेरिकेच्या नेतृत्वाखालील आर्थिक गट आहे. क्वाड शिखर परिषदेसाठी जपानमध्ये आलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमेरिकेचे अध्यक्ष जो बिडेन, जपानचे पंतप्रधान फुमियो किशिदा आणि टोकियोमध्ये फ्रेमवर्कच्या शुभारंभाच्या वेळी आलेल्या दहा देशांच्या नेत्यांनी या मंचाचे 'संस्थापक सदस्य' वाटाघाटी सुरू केल्या. यामध्ये ऑस्ट्रेलिया, ब्रुनेई, भारत, इंडोनेशिया, जपान, दक्षिण कोरिया, मलेशिया, न्यूझीलंड, फिलीपिन्स, सिंगापूर, थायलंड आणि व्हिएतनाम यांचा समावेश आहे. या देशांचा मिळून जागतिक स्थूल राष्ट्रीय उत्पन्ना (जीडीपी) मध्ये ४० टक्के वाटा आहे.



१. व्यापार आघाडीवर, कामगार आणि ग्राहक दोघांनाही लाभदायक आर्थिक व्यवहार आणि गुंतवणुकीला चालना देण्यासाठी 'उच्च–मानकांनीयुक्त, समावेशक, मुक्त आणि निष्पक्ष–व्यापार कटिबद्धता' स्थापित करण्याचा हा एक प्रयत्न आहे.

२. या मंचाद्वारे पुरवठा साखळीच्या लवचिकतेसाठी विशेषकरून आपत्तीच्यावेळी प्रतिसाद उपायांसाठी आणि व्यवसाय सातत्य सुनिश्चित करण्यासाठी प्रमुख कच्चा माल आणि प्रक्रिया केलेला माल, सेमीकंडटर, महत्त्वाची खनिजे आणि स्वच्छ ऊर्जा तंत्रज्ञान यांच्या उपलब्धतेची सुनिश्चिती करणे अपेक्षित आहे.

३. पॅरिस कराराच्या अनुषंगाने, स्वच्छ ऊर्जा, डीकार्बोनायझेशन आणि पायाभूत सुविधा हे घटक तांत्रिक साहाय्य प्रदान करून आणि सवलतीच्या वित्तपुरवठ्यासह वित्तीय स्त्रोतांची उपलब्धता करून स्पर्धात्मकतेत सुधारणा करण्यासाठी आणि नूतनीकरणक्षम उर्जेचा अवलंब करण्याच्यादृष्टीने शाश्वत आणि टिकाऊ पायाभूत सुविधांच्या विकासासाठी देशांना साहाय्य देऊन संपर्कक्षमता वाढविण्यासाठी करण्यात मदत केली जाईल.

४. करचुकवेगिरी आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी विद्यमान बहुपक्षीय दायित्वे, मानके आणि करारांच्या अनुषंगाने सशक्त कर, मनी लॉंडरिंगविरोधी आणि लाचलुचपत प्रतिबंधक व्यवस्था लागू करून निष्पक्ष स्पर्धेला प्रोत्साहन देणे हे कर आणि भ्रष्टाचारविरोधी स्तंभाचे उद्दिष्ट आहे.

**भारतासाठी सकारात्मक बाजू –**

१. हा मंच चीनचे वर्चस्व असलेल्या प्रादेशिक व्यापक आर्थिक भागीदारी (RCEP) आणि ट्रान्स–पॅसिफिक भागीदारीसाठी व्यापक आणि प्रगतीशील करार (CPTPP) सारख्या इतर प्रादेशिक व्यापार उपक्रमांना तोंड देण्यासाठी मदत करेल.

२. आर्थिकदृष्ट्या चीनचा मुकाबला करण्याचे साधन असू शकते.

३. हे उल्लेखनीय आहे की, १० पैकी ७ आसियान (ASEAN) देश आणि १५ पैकी ११ ट्रान्स–पॅसिफिक भागीदारीसाठी व्यापक आणि प्रगतीशील करारा (RCEP) मध्ये सहभागी देशांनी या मंचाच्या स्थापना करण्यात सहभाग घेतला आहे.

४. जागतिक चलनवाढीचा दबाव कमी करण्यासाठी पुरवठा साखळीची लवचिकता वाढवण्यासाठी आणि विशेषतः प्रमुख कच्चा माल, महत्त्वाची खनिजे आणि सेमीकंडटर्स यांच्या पुरवठ्यातील भविष्यातील व्यत्ययाचा प्रभाव कमी करण्यासाठीचा हा पहिला बहुपक्षीय प्रयत्न होय.

**भारतासाठी कळीचे मुद्दे –**

१. डिजिटल अर्थव्यवस्थेच्या स्तंभाखाली माहितीच्या खुल्या आणि मुक्त प्रवाहास चालना देण्याच्या अमेरिकाच्या प्राधान्यामुळे देशांतर्गत हेतूंसाठी माहितीचे नियंत्रण करण्याची भारताची क्षमता कमी होईल.

२. कर चुकवेगिरी कमी करण्यासाठी भारत आपली कर धोरणे अमेरिका भागीदारांमधील जागतिक कर मानकांच्या आग्रहाच्या दबावाच्या अनुषंगाने समक्रमित करण्यास अनुकूल असण्याची खात्री देता येत नाही.

३. कामगार मानके आणि जकातेतर अडथळे भारतासाठी वादाचा मुद्दा असतील.

४. आयपीईएफ जकातविषयक अडथळे कमी करण्यासारख्या बाजार प्रवेश दायित्वांचा समावेश करणार नाही, कारण हा करार जास्त करून 'प्रशासकीय व्यवस्थेशी अधिक' संबंधित आहे आणि यासाठी कॉंग्रेसची मान्यता, जी



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

व्यापारविषयक करारांसाठी आवश्यक आहे, अनिवार्य नाही.

५. आयपीईएफ हा पारंपरिक स्वरूपाचा व्यापारविषयक करार नाही.

***

# अभ्यासक्रमातील विषय– भारत आणि त्याचे शेजाऱ्यांसोबतचे संबंध

**वरील विषयाशी संबंधित गेल्या वर्षातील प्रश्न पाहू.**

| प्रश्न | कळीचा शब्द/मागणी | विषयसूत्र |
|---|---|---|
| A number of outside powers have entrenched themselves in Central Asia, which is a zone of interest to India. Discuss the implications, in this context, of India's joining the Ashgabat Agreement, 2018. (2018) | भारत-मध्य आशिया संबंध | समकालीन चालू घडामोडी |
| 'China is using its economic relations and positive trade surplus as tools to develop potential military power status in Asia'. In the light of this statement, discuss its impact on India as her neighbour. (2017) | चीनच्या भारतावर वाढत्या कुरघोडी करण्याचा परिणाम | समकालीन चालू घडामोडी |
| The question of India's Energy Security Constitutes the most important part of India's economic progress. Analyze India's energy policy cooperation with West Asian countries. (2017) | भारताची ऊर्जासुरक्षा | समकालीन चालू घडामोडी |
| Evaluate the economic and strategic dimensions of India's Look East Policy in the context of the post Cold War international scenario. (2016) | 'पूर्वेकडे दृष्टी' धोरणाचे महत्त्व | समकालीन चालू घडामोडी |
| "Increasing crossborder terrorist attacks in India and growing interference in the internal affairs of several memberstates by Pakistan are not conducive for the future of SAARC (South Asian Association for Regional Cooperation)." Explain with suitable examples. (2016) | सार्कची प्रस्तुतता | समकालीन चालू घडामोडी |
| Project 'Mausam' is considered a unique foreign policy initiative of Indian Government to improve relationship with its neighbours. Does the project have a strategic dimension? Discuss. (2015) | परराष्ट्र धोरणातील सौम्य सत्तेची भूमिका | समकालीन चालू घडामोडी |

| | | |
|---|---|---|
| Terrorist activities and mutual distrust have clouded India – Pakistan relations. To what extent the use of soft power like sports and cultural exchanges could help generate goodwill between the two countries? Discuss with suitable examples. (2015) | भारत-पाकिस्तान संबंधांमधील सौम्य सत्तेची / सांस्कृतिक मुत्सद्देगिरीची भूमिका | समकालीन चालू घडामोडी |
| With respect to the South China sea, maritime territorial disputes and rising tension affirm the need for safeguarding maritime security to ensure freedom of navigation and over flight throughout the region. In this context, discuss the bilateral issues between India and China. (2014) | भारत-चीन द्विपक्षीय संबंध | समकालीन चालू घडामोडी |
| In respect of India-Sri Lanka relations, discuss how domestic factors influence foreign policy. (2013) | भारत-श्रीलंका संबंधांमधील देशांतर्गत घटकांची भूमिका | समकालीन चालू घडामोडी |
| Discuss the political developments in Maldives in the last two years. Should they be of any cause of concern to India? (2013) | भारत-मालदीव सुडाच्या कारवाया | समकालीन चालू घडामोडी |
| What is meant by Gujral doctrine? Does it have any relevance today? Discuss.(2013) | गुजराल तत्त्व | समकालीन चालू घडामोडी |

सुरक्षितता व संपन्नता या संदर्भात शेजाऱ्यांशी असणाऱ्या संबंधांवर परराष्ट्र धोरणाची कार्यक्षमता अवलंबून असते. त्यामुळे शेजाऱ्यांशी चांगले संबंध टिकवणे हे आव्हानात्मक काम असते. तुमचा शेजारी हा तुमचा नैसर्गिक शत्रू असतो, असे कौटिल्य म्हणाला होता.

''तुम्ही तुमचे मित्र बदलू शकता, पण शेजारी बदलता येत नाहीत.''

**– माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी**




**भारताच्या शेजाराचा संदर्भ–**

**भारताच्या शेजारी देशांमध्ये पुढीलप्रमाणे राजकीय व आर्थिक उलथापालथ होते आहे–**

१. आर्थिक संकट – श्रीलंका व पाकिस्तान.

२. राजकीय संकट – म्यानमारमधील बंडजन्य सत्तांतर.

३. सामरिक आव्हाने – चीन व नेपाळ यांच्यासोबत सीमावाद.

**या प्रदेशातील नवीन गतिशीलता**

१. भारताकडे मोठा भाऊ म्हणून पाहिले जाणे (नेपाळकडून)

२. चीनची वाढती आक्रमकता व विस्तारवाद.

३. चीनचे कर्जकचाट्याचे धोरण.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

४. अफगाणिस्तानवर तालिबानने मिळवलेला ताबा.

५. अफगाणिस्तान–पाकिस्तान संगनमत– या संयोगाचा परिणाम काश्मिरमधील दहशतवादावर होईल.

**भारताच्या शेजारील आव्हाने–**

१. संदिग्ध सीमा– चीन, पाकिस्तान, नेपाळ.

२. दक्षिण आशियातील देशांचे बहुजिनसी स्वरूप.

३. दक्षिण आशियातील कमी आर्थिक व दळणवळणविषयक एकीकरण.

४. धोक्याच्या आकलनाविषयी सर्वानुमतीचा अभाव– सीमापार दहशतवाद.

५. सार्कसारख्या निष्क्रिय संस्थात्मक यंत्रणा.

६. चीनचा उदय आणि भारताच्या शेजारामधील वाढता हस्तक्षेप– हम्बान्तोता बंदरावरील ताबा, चीन–पाकिस्तान आर्थिक मार्ग, इत्यादी.

७. दक्षिण आशियाई प्रदेशातील कमी मानवी विकास.

---

१. लडाख व तवांग प्रदेशात चीनसोबतच्या प्रत्यक्ष ताबा रेषेचा प्रश्न.

२. बिम्स्टेकचा सार्कवरील वाढता प्रभाव.

३. बांग्लादेशाचा आर्थिक उदय– दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत बांग्लादेशाने भारताला मागे टाकले.

४. श्रीलंकेतील आर्थिक उलथापालथ (भारताने पहिल्यांदा मदत केली).

५. म्यानमारमध्ये सैन्याने पुन्हा सत्ता ताब्यात घेतली.

---

**भारताचा दृष्टिकोन**

धोरणात्मक पातळी– भारताने शेजाराला प्राधान्य धोरण, गुजराल तत्त्व, मिशन सागर, पूर्वेकडे कृती धोरण यांसारखे प्रयत्न सुरू ठेवले.

इ.राजनैतिक पातळी– उच्चस्तरीय राजनैतिक व नेतृत्व पातळीवरील बैठका, बिम्स्टेकच्या नेत्यांसोबतचा भारताचा वाढता संवाद.

**पुढील मार्गक्रमणा–**

भारताचे शेजारविषयक धोरण अधिक उदार असायला हवे आणि त्यात नोकरशाहीच्या पातळीवरील देवाणघेवाण व्हायला नको, असे परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर म्हणाले.

शिवाय, भारताने २+१ यंत्रणेसारखे तत्काळ परिणाम दाखवणारे प्रकल्प हाती घेण्याची गरज आहे (भारत, जपान यांनी एकत्रपणे श्रीलंकेतील कोलंबो वेस्ट कंटेनर टर्मिनलमध्ये गुंतवणूक केली).



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**भारत–नेपाळ संबंध**

**पार्श्वभूमी–**

भौगोलिक जवळकीमुळे, खुल्या सीमेमुळे आणि सांस्कृतिक, सभ्यताजन्य व सामाजिक नात्यामुळे भारत व नेपाळ यांचे अनन्यसाधारण संबंध आहेत. या अनन्यसाधारण संबंधांना 'रोटी बेटी का संपर्क' या नात्याचीही जोड आहे, याची पुनरुक्ती पंतप्रधान मोदींनी केली होती.

या संबंधांचा पाया १९५० सालच्या भारत–नेपाळ मैत्री करारापर्यंत मागे जातो. परंतु, विविध कारणांमुळे या द्विपक्षीय संबंधांचे सामर्थ्य पूर्णतः प्रत्यक्षात आले नाही.

**प्रश्न व आव्हाने –**

१. विविध विकासप्रकल्पांसंदर्भातील मंद प्रगती– महाकाली नदीवरील पंचेश्वर बहुउद्देशी प्रकल्प.

२. नेपाळमधील भारतविरोधी विचार.

३. नेपाळमधील चीनचा वाढता प्रभाव व हस्तक्षेप.

४. खुल्या व खंडित सीमांमुळे होणारे सीमेवरील संघर्ष– कलापनी, लिम्पियाधुरा, इत्यादी.

५. २०१५ साली लादलेले आर्थिक निर्बंध हा एक इतिहासातील मोठा मुद्दा आजही या संबंधांसाठी त्रासदायक ठरतो.

६. मधेसी लोकांचा प्रश्न सोडवण्यात राजकीय नेत्यांना आलेले अपयश.






Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**पुढील मार्गक्रमणा–**

१. विख्यात व्यक्तींच्या गटाने सादर केलेल्या अहवालाचा स्वीकार करून सीमावाद सोडवण्यासाठीचा आराखडा म्हणून त्याचा वापर करणे.

२. १९५० सालच्या शांतता व मैत्रीच्या कराराच्या जागी एखादा समतोल व लोकशाही करार करणे.

३. भारताने अपूर्ण प्रकल्प वेगाने पूर्ण करायला हवे आणि परस्परविश्वासाची परिस्थिती निर्माण करायला हवी.

४. दोन्ही देशांनी दहशतवादाविषयी आणि खुल्या सीमेवर कार्यरत असलेल्या गुन्हेगारी शक्तींविषयी सामायिक भूमिका घ्यायला हवी.

५. भारताने सर्व राजकीय पक्षांशी संवाद कायम ठेवायला हवा.

६. नेपाळसोबतचा आपला संवाद केवळ राजकीय अभिजनवर्गापुरता मर्यादात राहता कामा नये, तर नेपाळमधील सर्वसामान्य नागरिकांचाही त्यात समावेश असायला हवा.

**भारत–भूतान संबंध**

**पार्श्वभूमी–**

भारत–भूतान संबंधांची पायाभूत चौकट १९४९ सालच्या मैत्री व सहकार्य करारापर्यंत मागे जाते. या दोन देशांमधील राजनैतिक संबंध १९६८ साली प्रस्थापित झाले, तेव्हापासून त्यांचे संबंध दक्षिण आशियातील भारताच्या शेजार धोरणाची सर्वाधिक विख्यात यशोगाधा मानली जातात.

**भारत व भूतान यांच्यात अनुकरणीय व अनन्य नाते असले, तरी या संबंधांमध्ये विविध प्रश्न आहेत–**

**प्रश्न व आव्हाने –**

१. भूतानसह सर्व हिमालयन प्रदेशासंदर्भात भारतामध्ये सुसंगत धोरणाचा अभाव असल्याची प्रतिमा.

२. विकास प्रकल्पांमधील विलंब– औष्णिक ऊर्जा प्रकल्प.

३. भारताने भूतानच्या अंतर्गत कारभारात व राजनैतिक संबंधांमध्ये कथितरित्या केलेला हस्तक्षेप.

४. चीनच्या भूप्रादेशिक आक्रमकतेमुळे डोकलाम व चुम्बी खोऱ्यातील तिठ्यापाशी निर्माण झालेली सामरिक असुरक्षितता.

५. औष्णिक ऊर्जा प्रकल्पांसाठी भारताने पुरवलेल्या वित्तपुरवठ्यासंदर्भातील अटी भूतानला अन्याय्य वाटतात.

६. भारताच्या अर्थसहाय्यामुळे भूतानमध्ये विनारोजगार आर्थिक वाढ होत असल्याची टीका केली जाते.

**भारतासाठी भूतानचे महत्त्व.**

१. शेजारविषयक धोरण, पूर्वेकडे कृती धोरण व गुजराल तत्त्व यांमध्ये भूतानचे स्थान मध्यवर्ती आहे.

२. भूसामरिक महत्त्व– संवेदनशील सिलिगुडी मार्गापासून (चिकन नेक कॉरिडॉर) कमी अंतरावर असणे व सशस्त्र बंडखोरीची हाताळणी.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

३. चिनी उदयाला आळा घालणे– चीनच्या बीआरआय प्रकल्पामध्ये सहभागी न झालेला भूतान हा भारताचा एकमेव शेजारी देश आहे.

४. भूराजकीय महत्त्व– संयुक्त राष्ट्रांमधील सुरक्षा परिषद व आण्विक पुरवठादार गट या संस्थांच्या सदस्यत्वावरील भारताच्या दाव्यला भूतान अनुकूल आहे.




भारत व भूतान यांच्यातील सहकार्याचे प्रदेश–

| क्षेत्र | महत्त्व |
|---|---|
| १. अर्थव्यवस्था | भारत हा भूतानचा सर्वांत मोठा व्यापारी भागीदार आहे. जकातमुक्त वाहतूक. |
| २. सीमा व्यवस्थापन | भूतानची सीमा चार भारतीय राज्यांना लागून आहे. संयोजन व सचिव पातळीवरील संवाद यंत्रणा. |
| ३. औष्णिक ऊर्जा मंडळ | ऊर्जासुरक्षेसंदर्भातील संभाव्यता. |
| ४. लोकांच्या पातळीवरील संबंध | शिक्षण व संस्कृती यांबाबतीत सक्षम भागीदारी. नियमित सांस्कृतिक देवाणघेवाण व शिष्यवृत्ती. |
| ५. बहुराष्ट्रीय संबंध | सार्क, बिम्स्टेक, बीबीआयएन |



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**पुढील मार्गक्रमणा–**

१. नियमित संपर्क ठेवून व चिंतांवर उपाय करून विश्वासातील तूट भरून काढणे.

२. विकासप्रकल्पांना मदत करणे व ते वेगाने पूर्ण करणे.

३. औष्णिक ऊर्जा प्रकल्पांसाठी करण्यात येणाऱ्या वित्तपुरवठ्यांच्या शर्थींबाबत भूतानला वाटणाऱ्या चिंतांवर भारताने उपाय करायला हवा.

४. भारताकडून भूतानला सर्वाधिक अर्थसहाय्य मिळते, पण निधीच्या रूपातील सहाय्याची रक्कम कमी झाली आहे. चिनी उपस्थिती वाढत असताना भूतानला दिले जाणारे अर्थसहाय्य कमी करण्याची ही योग्य वेळ नाही.

५. लडाख व भूतान यांच्यातील धार्मिक व सांस्कृतिक संवादावर लक्ष केंद्रित करून भारताला शाश्वत सौम्य सत्तेच्या दृष्टिकोनाची प्रक्रिया सुरू करता येईल.

६. भारताने भूतानी मूल्यांविषयी आदर दाखवायला हवा. भूतानी लोक पर्यावरणाविषयी सजग आहेत. त्यामुळे भारताने आर्थिकदृष्ट्या व पर्यावरणीयदृष्ट्या व्यवहार्य ठरतील अशा प्रकल्पांची निवड करायला हवी.

**भारत–मालदीव संबंध**

**पार्श्वभूमी–**

भारत व मालदीव यांचे संबंध परस्परांसाठी लाभदायक आहेत. भारत शेजाराला प्राधान्य हे धोरण अनुसरतो, तर मालदीवने भारताला प्राधान्य हे धोरण अग्रक्रमावर ठेवले आहे. हिंद महासागरी प्रदेशाचे महत्त्व वाढत असताना मालदीवलाही भारताच्या परराष्ट्रीय धोरणाच्या अनुषंगाने बरेच महत्त्व प्राप्त झाले आहे.






Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

त्यांच्यातील संबंध कायमच जवळचे व सौहार्दाचे राहिले असले, तरी अलीकडे मालदीवमधील राजवटीच्या अस्थिरतेमुळे त्यावर काही मर्यादा आल्या आहेत.

**प्रश्न व आव्हाने–**

१. चीनचा वाढता प्रभाव व हस्तक्षेप– कर्जकचाट्याची मुत्सद्देगिरी– चीनने मालदीवला दिलेल्या कर्जाची रक्कम १.५ अब्ज डॉलरांहून अधिक आहे.

२. सुरक्षितता व सामरिक चिंता– नवीन जमीन कायद्यासंदर्भातील प्रश्न.

३. माजी राष्ट्राध्यक्ष अब्दुल्ला यामीन यांच्या चीनस्नेही राजवटीच्या काळात ताणलेले संबंध– यामीन यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेले भारताला बाहेरचा रस्ता दाखवण्याचे अभियान.

४. राजकीय अस्थिरता हा भारताच्या दृष्टीने मोठा चिंतेचा विषय आहे.

५. वाढता मूलतत्त्ववाद– इस्लामिक स्टेटसारख्या दहशतवादी संघटनांचा वाढता प्रभाव.

६. मालदीवने भारतासोबत सौदेबाजी करताना चीनचा संदर्भ वापरायला सुरुवात केली आहे.

७. हिंद महासागरी प्रदेशामधील चीनचा वाढता वावर– स्ट्रिंग ऑफ पर्ल्स.

**भारत व म्यानमार यांच्यातील सहकार्य–**

- सुरक्षाविषयक सहकार्य– कॅक्टस मोहीम.
- आपत्ती व्यवस्थापन– भारताने कोव्हिड–१९दरम्यान पुरवलेल्या सहकार्याचा सर्वांत मोठा लाभार्थी मालदीव आहे.
- लोकांच्या पातळीवरील संपर्क– मालदीवला शैक्षणिक शिष्यवृत्ती देण्यात येतात.
- आर्थिक सहकार्य– पर्यटन हा मालदीवच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारतीय पर्यटक हे मालदीवला येणाऱ्या एकूण पर्यटकांमध्ये सर्वाधिक आहेत.
- परदेशस्थ भारतीय– मालेमधील भारतीय रहिवासी हा दुसरा सर्वांत मोठा परकीय समुदाय आहे.

**पुढील मार्गक्रमणा–**

- भारत व मालदीव यांनी बहुराष्ट्रीय सुधारणांसाठी ताळमेळ राखून काम करायला हवे (उदाहरणार्थ, संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतील कायमस्वरूपी सदस्यत्वाचा विस्तार करण्यासाठी व ती परिषद अधिक प्रातिनिधिक होण्यासाठी आवश्यक सुधारणा).
- भारत यूपीआय, रूपे यांच्या निर्यातीद्वारे मालदीवची डिजिटल अर्थव्यवस्था विकसित करू शकतो.
- हिंद महासागरी प्रदेशातील प्रमुख सुरक्षा पुरवणारा देश म्हणून भारताच्या दृष्टीने मालदीवचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहेत, त्यामुळे भारताने मालदीवशी जवळचे व सामरिक संबंध जोपासायला हवेत.

**भारत–म्यानमार संबंध**

**पार्श्वभूमी–**

- ईशान्य भारतातील अस्थिर व गुंतागुंतीची परिस्थिती लक्षात घेता म्यानमार भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो. शिवाय, सामरिक संभ्रमामुळे भारताला म्यानमारसोबत संवाद साधणे अवघड जाते. एका बाजूला म्यानमारच्या साहसी कारवायांना चीनचा पाठिंबा आहे, तर दुसऱ्या बाजूला भारताने लोकशाहीच्या बाबतीत तात्त्विक भूमिका घेतली आहे.
- त्यामुळे भारताने म्यानमारच्या बाबतीत 'दुहेरी मार्गांचा दृष्टिकोन' स्वीकारला आहे.

**भारतासाठी म्यानमारचे महत्त्व–**

१. म्यानमारला सामरिक स्थान लाभलेले असल्यामुळे भारतातील ईशान्य प्रदेशाच्या विकासासाठी म्यानमार महत्त्वाचा आहे.

२. दक्षिण आशिया व आग्नेय आशिया यांना जोडणारा म्यानमार हा कळीचा दुवा आहे.

३. म्यानमारद्वारे केलेली जोडणी भारताला 'सिलिगुडी मार्गा'शी निगडित (चिकन–नेक) संभ्रमावर मात करायला उपयुक्त ठरेल.

४. ईशान्य भारतात सुरक्षितता व स्थैर्य राखण्यासाठी म्यानमार अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण या भागातील अनेक बंडखोर अनेकदा म्यानमारमध्ये आश्रय घेतात.

५. शस्त्रास्त्र, अमली पदार्थ व मानवी तस्करी यांसारख्या प्रश्नांवर उत्तरे शोधण्यासाठी म्यानमारसोबत परिणामकारक सहकार्य आवश्यक आहे.






Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**प्रश्न व आव्हाने–**

१. खंडित व विषम सीमा– यामुळे बंडखोर गटांना सहजपणे पळून जाता येते व एकत्र येता येते.

२. भारताचा सामरिक संभ्रम– तत्त्व विरुद्ध राष्ट्रहित.

३. म्यानमारमधील वाढता चिनी प्रभाव– चीन म्यानमार आर्थिक मार्ग

४. राजकीय संकट– सैनिकी बंड– म्यानमारमधील सैनिकी कारवाईपासून जीव वाचवून पळणारे निराश्रित मिझोरममध्ये प्रवेश करत आहेत. त्यातून भारताचे केंद्र सरकार आणि निराश्रितांना पाठिंबा देणारे मिझोरामचे राज्य सरकार यांच्यात असहमती निर्माण झाली आहे.

**म्यानमारमधील सैनिकी बंडाचे भारतासाठीचे गर्भितार्थ–**

१. सामरिक प्रश्न– म्यानमारमधून पळ काढणाऱ्या अधिकाऱ्यांना आश्रय देऊन भारत तिथल्या लष्करी सत्ताधीशांना नाराज करू शकत नाही.

२. म्यानमारमध्ये राहणाऱ्या अनेक वांशिक (एथ्निक) समूहांना सशस्त्र बंडखोरीचा धोका आहे.

३. म्यानमारमधील भारतीय गुंतवणुकीसमोरचा धोका– कलाहंडी बहुलकी प्रकल्प.

४. म्यानमारमध्ये लष्करी बंड झाल्यापासून चीन तिथल्या सत्ताधीशांशी जवळीक वाढवत असल्याचे दिसून आले आहे.

५. मानवाधिकाराचा प्रश्न.

**भारताचा दृष्टिकोन–**

१. अंतर्गत राजकारणात हस्तक्षेप न करणे.

२. टीकेपेक्षा संवादावर भर.

३. चीनच्या प्रभावाविरोधात समतोल साधणे.

४. सामरिक पायाभूत विकास– सित्तवे बंदराचा विकास, कलादान बहुलकी जोडणी विकास प्रकल्प.

५. सीमासुरक्षा व परस्परांशी सहकार्य.






Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

## भारत–श्रीलंका संबंध

### पार्श्वभूमी–

भारत हा श्रीलंकेचा सर्वांत जवळच्या अंतरावरील शेजारी आहे. या दोन देशांमधील संबंध अडीच हजार वर्षांहून जुने आहेत आणि दोन्ही बाजूंनी बौद्धिक, सांस्कृतिक, धार्मिक व भाषिक अन्योन्यक्रीडांच्या वारशाचा आधार घेत हे संबंध वाढवले आहेत.

### महत्त्वाची तथ्ये–

१. द्विपक्षीय व्यापार ३.६ अब्ज डॉलर इतका आहे (२०२०).

२. सार्क प्रदेशातील सर्वांत मोठ्या व्यापारी भागीदारांपैकी एक.

३. श्रीलंकेतील थेट परकीय गुंतवणुकीत भारताचे अतिशय मोठे योगदान आहे.

### भारत–श्रीलंका सहकार्य

१. आर्थिक– भारत व श्रीलंका यांच्यातील मुक्त व्यापारी करार– भारत श्रीलंकेमध्ये विविध पायाभूत, जोडणी व वाहतूक प्रकल्प उभारतो आहे.

२. राजकीय सहकार्य– उच्चस्तरीय राजकीय व राजनैतिक भेटी, श्रीलंकेतील संसदेमध्ये भारतासोबतच्या संबंधांना नवीन ऊर्जा देण्यासाठी मैत्री गटाची स्थापना झाली आहे.

३. सांस्कृतिक संबंध– ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक व भाषिक संबंधांचा सामायिक वारसा. उदाहरणार्थ, रामायणाचा वारसा, श्रीलंकेतील पर्यटन.

४. लोकांच्या पातळीवरील संबंध– बौद्ध धर्म हा एक सामायिक दुवा आहे.

५. सैनिकी कवायती– मित्रा, शक्ती.

६. पर्यटन व मनुष्यबळ विकास– श्रीलंकाई पर्यटकांसाठी ई–व्हिसा योजना.



**प्रश्न व आव्हाने–**

१. सत्ताविध्वंसाचा प्रश्न– भारताने १३व्या दुरुस्तीची पूर्ण अंमलबजावणी करण्याची पुनरुक्ती केली आहे.

२. मच्छिमार समुदायाचा प्रश्न– भारतीय नौकांनी समुद्राच्या तळापर्यंत जाणारी जाळी वापरू नयेत व आपल्या किनाऱ्यावर बेकायदेशीर मासेमारी करू नये, असे सांगत श्रीलंकाई मच्छिमारांनी याबाबत आक्षेप नोंदवले आहेत. अनेकदा या घटनांमध्ये भारतीयांना अटकही होते.

३. कच्छथीवू बेटांच्या दर्जाविषयीचा वाद अजूनही मिटलेला नाही.

४. विश्वासातील तुटवड्याचा प्रश्न– सीईपीएवर सह्या न करणे.

५. चीनच्या बाजूने वाढता कल. श्रीलंकेने हम्बान्तोता बंदर ९९ वर्षांच्या भाडेकरारावर चीनला दिले आणि चीनच्या कर्जकचाट्यातही अडकला .

६. भारतीय प्रभुत्वसत्तेविषयी श्रीलंकेला कल्पित भीती वाटते.

७. श्रीलंकेतील मूलतत्त्ववादाचा वाढता प्रवा– राष्ट्रीय तोहीद जमात– ईस्टर संडेच्या दिवशी झालेला हल्ला.

८. ठप्प झालेले प्रकल्प– जाफना संमिश्र ऊर्जा प्रकल्प.

**श्रीलंकेतील आर्थिक संकट–**

श्रीलंकेमध्ये देशांतर्गत व बाह्य घटकांमुळे उद्भवलेल्या अभूतपूर्व आर्थिक संकटामुळे राजकीय उलथापालथ व निदर्शने होत आहेत. श्रीलंकेवरील चिनी कर्जाचे दायित्व, हा या आर्थिक संकटाला कारणीभूत ठरलेला एक घटक आहे. या संकटादरम्यान श्रीलंकेला मदत करायला चीन उत्सुक नाही, त्यामुळे भारताला मानवतावादी सहाय्य वाढवण्यासाठी आणि व्यापार व गुंतवणूक यांचे एकंदर सामर्थ्य वापरायची संधी आहे.

**भारतावरील परिणाम–**

१. निराश्रितांसंबंधीचा प्रश्न– निराश्रितांच्या लोंढ्यामुळे भारतात सामाजिक–आर्थिक उलथापालथ होऊ शकते.

२. श्रीलंकेने चीनकडून प्रचंड कर्ज घेतलेले असल्यामुळे श्रीलंकेवरील चिनी प्रभाव वाढेल.

३. व्यापारी अडथळे.

४. श्रीलंकेतील विविध भारतीय कंपन्यांची गुंतवणूक धोक्यात.

५. सध्याच्या अनागोंदीमुळे बंडखोर गटांना अधिक भूमिगत पाठिंबा मिळेल आणि भारताच्या अंतर्गत स्थैर्याला त्यातून बाधा पोचू शकते.

**श्रीलंकाई आर्थिक संकटात भारताला संधी–**

१. मानवदावाती व द्विपक्षीय अर्थसहाय्य करून भारताला स्वतःची 'दादागिरी करणाऱ्या शेजाऱ्या'ची प्रतिमा पुसून टाकायला मदत होईल. श्रीलंकेच्या संकटात राजकीयदृष्ट्या हस्तक्षेप न करता तिथल्या लोकांच्या मनात भारताची सकारात्मक प्रतिमा यातून निर्माण होईल.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

२. श्रीलंकेची मदत केली तर भारत शेजारच्या देशातील कोणत्याही संकटाला पहिल्यांदा प्रतिसाद देत असल्याची प्रतिमा बळकट होईल.

३. सध्या भारत व श्रीलंका यांच्यातील विश्वासामध्ये तुटवडा निर्माण झाला आहे, तो भरून काढण्याची ही संधी आहे.

४. तेरावी दुरुस्ती सौम्य करण्यासाठीही भारत श्रीलंकाई सरकारकडे पाठपुरावा करू शकतो.

५. श्रीलंकेती अर्थव्यवस्था स्थिर झाली तर भारताच्या गुंतवणुकीला व व्यापाराला पाठबळ मिळेल.

६. श्रीलंकेतील चिनी प्रकल्पांची छाननी होत असताना भारत अर्थसहाय्य वाढवून श्रीलंकेतील चीनच्या उपस्थितीवर मात करू शकतो, त्यासाठी अमेरिका, जपान व युरोपीय संघ यांसारख्या इतर मैत्रीपूर्ण देशांशी, तसेच आंतरराष्ट्रीय नाणे निधीशी जवळून काम करावे लागेल.

**अलीकडच्या घडामोडी–**

१. भारताने विख्यात श्रीलंकाई नर्तिका वजिरा चित्रसेना यांना पद्मश्री सन्मान बहाल केला (लोकांच्या पातळीवरील संबंध)

२. कोलंबो वेस्ट इंटरनॅशनल टर्मिनलमध्ये अदानी समूहाची गुंतवणूक.

३. भारताने संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार आयोगात झालेल्या मतदानावेळी अनुपस्थित राहायचा निर्णय घेतला.

४. भारताने संकटकाळात श्रीलंकेला तब्बल चार अब्ज डॉलरांइतके अर्थसहाय्य केले.

**पुढील मार्गक्रमणा–**

प्रादेशिक महासत्ता व जगातील सर्वांत मोठी जबाबदारी लोकशाही असलेल्या भारताला श्रीलंकेसोबत रचनात्मक व सौहार्दपूर्ण द्विपक्षीय संबंध ठेवावे लागतील. भारताची सुरक्षितता व राष्ट्रहित श्रीलंकेच्या हिंद महासागरातील पवित्र्यावर थेट अवलंबून आहे.

या शेजारील तणावापासून मुक्त होण्यासाठी भारताला श्रीलंकेबाबतीत दबावाऐवजी मनवळवणीचे धोरण आखावे लागेल.

**भारत–बांग्लादेश संबंध**

**पार्श्वभूमी–**

बांग्लादेशला डिसेंबर १९७१मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेचच त्याला स्वतंत्र देश म्हणून मान्यता देणारा व राजनैतिक संबंध प्रस्थापित करणारा भारत हा पहिला देश होता. भारताचे बांग्लादेशाशी सभ्यताजन्य, सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक संबंध आहेत. या दोन देशांना एकत्र आणणाऱ्या इतरही अनेक गोष्टी आहे– सामायिक इतिहास व वारसा, भाषिक व सांस्कृतिक संबंध, संगीत, साहित्य व कला यांवरील प्रेम, इत्यादी. या सामायिकतेचे प्रतिबिंब आपल्या बहुआयामी व विस्तारत्या संबंधांमध्ये उमटले आहे. भारत व बांग्लादेश यांचे भौगोलिक स्थान परस्परांना पूरक आहे आणि दोघांनाही जोडणी व अर्थव्यवस्था विकसित करण्यासाठी यातून संधी मिळते.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**महत्त्वाची तथ्ये–**

१. बांग्लादेश हा दक्षिण आशियातील भारताचा सर्वांत मोठा व्यापारी भागीदार आहे– १०.८ अब्ज डॉलर.

२. बांग्लादेश हा भारताकडून होणाऱ्या पतपुरवठ्याचा सर्वांत मोठा लाभार्थी आहे.

**सहकार्याचे प्रांत–**

१. संरक्षण व सुरक्षितता– गुप्तच माहितीची देवाणघेवाण आणि भारताकडून होणारा सैनिकी उपकरणांचा पुरवठा व तंत्रज्ञानाचे हस्तांतरण.

२. आर्थइक सहकार्य– पर्यटन, आरोग्यसेवा व शिक्षण यांसारखी पारंपरिक क्षेत्रे.

३. बहुराष्ट्रीय सहकार्य– सार्क, बिम्स्टेक, आयओआरए, बीबीआयएन.

४. सीमा व्यवस्थापन– समुद्री सीमेची मर्यादा निश्चित करणे, भूसीमा करार २०१५.

५. सांस्कृतिक सहकार्य– लोकांच्या पातळीवरील संबंध, बांग्लादेशातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती.

६. जोडणी व पायाभूत प्रकल्प– खुलाना– मोंगाला बंदल, मैत्री सुपर थर्मल पॉवर प्लान्ट, रूपुर आण्विक प्रकल्प (बांग्लादेश, रशिया, भारत).

७. दहशतवाद व मूलतत्त्ववाद यांच्या विरोधात सहकार्य.






Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**प्रश्न व आव्हाने–**

१. बेकायदेशीर स्थलांतर– बांग्लादेशी व रोहिंग्या मुस्लिमांच्या बेकायदेशीर स्थलांतरामुळे ईशान्य भारतातील (विशेषतः आसाममधील) अंतर्गत स्थैर्याची हानी होते आहे.

२. वाढता चिनी प्रभाव– बांग्लादेश हा चीनच्या शस्त्रास्त्र निर्यातीचा दुसरा सर्वांत मोठा स्वीकारकर्ता देश आहे. चीनची बांग्लादेशातील थेट परकीय गुंतवणूकही वाढते आहे.

३. तरुणाईमधील जहाल विचारांमध्ये वाढ– एचयूजेआयसारखे मूलतत्त्ववादी गट भारतविरोधी भावनेमध्ये तेल ओतत आहेत.

४. तीस्ता नदी वाटप कराराशी निगडित वादग्रस्त प्रश्न अजून सुटलेले नाहीत.

५. सीएए व एनआरसी या संदर्भात बांग्लादेशात नकारात्मक मत निर्माण झाले आहे.

६. खंडित व विषम सीमेमुळे बेकायदेशीर व्यवहारांमध्ये वाढ झाली आहे.

७. चिनी कंपन्या बांग्लादेशातील पायाभूत प्रकल्पांसाठी आक्रमकपणे बोली लावत आहेत, त्यामुळे भारतीय कंपन्या तिथे मागे पडताना दिसतात.

**अलीकडच्या घडामोडी–**

१. भारत व बांग्लादेश यांनी सप्टेंबर २०२२मध्ये सात करारांवर सह्या केल्या– माहिती–तंत्रज्ञान, अंतराळ तंत्रज्ञान, बांग्लादेशी रेल्वे कर्मचाऱ्यांचे व न्यायिक अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण.

**पुढील मार्गक्रमणा–**

१. भारताने विकासात्मक व आर्थिक सहाय्यामध्ये अधिक उदार व्हायला हवे आणि बांग्लादेशाच्या आकांक्षांना पाठबळ पुरवायला हवे.

२. भारताने सीमापार स्थलांतर परिणामकारकरित्या हाताळायला हवे.

३. मैत्री प्रकल्प, मोंग्ला बंदल यांसारखे पायाभूत प्रकल्प वेगाने पूर्ण करायला हवेत.

४. जलसंसाधनांचे, विशेषतः तीस्ता नदीच्या पाण्याचे परिणामकारक व्यवस्थापन.

५. बिम्स्टेकमध्ये सुसूत्रीकरण आणण्यासाठी बांग्लादेशाच्या आर्थिक क्षमतांचा वापर करणे.

६. ईशान्य भारताच्या अधिक चांगल्या आर्थिक एकीकरणासाठी बांग्लादेशासोबतची जोडणी सुधारणे– मैत्री रेल्वे व बस मार्ग.

७. कापडोद्योग व चर्मोद्योग यांसारख्या विशेष क्षेत्रांमधील बांग्लादेशाच्या महत्त्वाच्या क्षमतांचा लाभ करून घेण्यासाठी अधिक आर्थिक एकीकरण साधणे.

१९७१ची प्रेरणा टिकवून ठेवण्यासाठी आपण आपल्या परस्पर विश्वासावर हल्ला चढवणाऱ्या शक्तींना एकत्ररित्या सामोरे जायला हवे.

- **पंतप्रधान नरेंद्र मोदी**



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

भारत–बांग्लादेश संबंध हे शेजारधर्माच्या मुत्सद्देगिरीचा आदर्श आहेत.

- **बांग्लादेशी पंतप्रधान शेख हसिना**

**भारत–अफगाणिस्तान संबंध**

**पार्श्वभूमी–**

भारत व अफगाणिस्तान यांचे ऐतिहासिक व सांस्कृतिक दुव्यांवर आधारलेले सक्षम संबंध आहेत. भारताने अफगाणिस्तानच्या पुनर्बांधणीत व पुनर्वसनामध्ये महत्त्वाची भूमिका निभावली आहे. अफगाणिस्तान प्रादेशिक स्थैर्याचा स्त्रोत होण्यासाठी लोकशाही व विकास ही कळीची साधने आहेत. याचे प्रतिबिंब अफगाणिस्तान व भारत यांनी ऑक्टोबर २०११मध्ये केलेल्या सामरिक भागीदारी करारामध्ये उमटले आहे. त्या वेळी अफगाणिस्तानात राष्ट्राध्यक्ष हमीद अन्सारी भारत भेटीवर आले होते. या करारादून दोन्ही देशांमधील सक्षम, चैतन्यशील व बहुआयामी संबंधांना बळ मिळाले, आणि त्याच वेळी दोन देशांमधील विविध प्रांतांतल्या सहकार्याला औपचारिक चौकट लाभली– राजकीय व सुरक्षाविषयक सहकार्य, व्यापारी व आर्थिक सहकार्य, क्षमतावृद्धी व शिक्षण, आणि सामाजिक, सांस्कृतिक, नागरी समुदाय व लोकांच्या पातळीवरील संबंध, अशा पातळ्यांवरचे हे सहकार्य होते.

**भारतासाठी अफगाणिस्तानचे महत्त्व–**

१. भूसामरिक महत्त्व– मध्य आशियाच्या बाजारपेठेपर्यंत पोचण्याचा मार्ग (बाजारपेठ, गुंतवणूक, ऊर्जासुरक्षा).

२. या प्रदेशातील सत्तासमतोल– चीनशी स्पर्धा.

३. जोडणी– भारताने मध्य आशिया व अफगाणिस्तान यांना चाबहार बंदराद्वारे जोडण्याचा महत्त्वाकांक्षी जोडणी प्रकल्प हाती घेतला होता, पण तो सध्या कुंठितावस्थेत आहे.

४. नैसर्गिक संसाधने– अफगाणिस्तान नैसर्गिक संसाधनांनी संपन्न आहे; तिथे तांबे, लोखंड व इतर अनेक खनिजांचे मोठे साठे आहेत. उदाहरणार्थ, लोहखनिजासाठीच्या हाजिगेक खाणी.

५. ऊर्जासुरक्षा– तापी गॅस पाइपलाइन.






Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**अफगाणिस्तानमध्ये तालिबानने सत्ता हस्तगत केल्याचा भारतावरील परिणाम–**

१. चन्थाम बंदराद्वारे अफगाणिस्तान व मध्य आशिया यांच्यात जोडणी करण्याचे भारताचे प्रकल्प याने बाधित झाले आहेत.

२. भारताने अफगाणिस्तानात देलराम–झरानी महामार्ग, सलमा धरण यांसारखे दीर्घकालीन प्रकल्प हाती घेतले होते, पण आता ते धोक्यात आले आहेत.

३. तालिबान पाकिस्तानी राजवटीच्या जवळचे असल्यामुळे पाकिस्तानला अफगाणिस्तानात वरचष्मा लाभला आहे.

४. अमली पदार्थाचा व्यापार वाढेल, कारण तालिबानसाठी रोकडीचा तो एक मोठा स्त्रोत आहे.

५. चीन–पाकिस्तान–तालिबान या अक्षामुळे भारताच्या भूराजकीय हितसंबंधांना बाधा पोचेल.

---

**अफगाणिस्तानातील भारतीय गुंतवणूक**

- पायाभूत विकास– काबूलमधील अफगाणी संसद, सलमा धरणाची पुनर्बांधणी, अधिक परिणाम साधणारा सामुदायिक विकासाचा कार्यक्रम.
- बस, रुग्णवाहिका, अन्नसहाय्य, औषधे, हेलिकॉप्टरे, इत्यादींसारख्या विविध वस्तूंचे हस्तांतरण.
- लोकांच्या पातळीवरचे आदानप्रदान– अफगाणी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे, अफगाणी सैनिकांना प्रशिक्षण देणे, अफगाणी क्रिकेट संघाला नोएडामध्ये पहिले घरेलू मैदान उपलब्ध करून देणे.
- एकंदरित भारताने अफगाणिस्तानात जवळपास ३ अब्ज डॉलरांची गुंतवणूक केली आहे.

---






Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**भारत–अफगाणिस्तान संबंधांमधील प्रश्न व आव्हाने –**

१. अफगाणिस्तान–पाकिस्तान यांच्या संगनमताने भारतातील, विशेषतः काश्मिरमधील अंतर्गत स्थैर्याला बाधा पोचेल.

२. अफगाणिस्तानमध्ये तालिबानने सत्ता काबीज केल्यामुळे सार्क आणखी निष्क्रिय होईल, कारण अफगाणिस्तान हा सार्कचा एक सदस्य आहे (तालिबान ही मुळात दहशतवादी संघटना असून पाकिस्तानशी जवळीक साधून आहे).

३. अफगाणिस्तानातील अत्यंत महत्त्वाच्या खनिज क्षेत्रात चीनचा आक्रमक दृष्टिकोन दिसतो आहे– इलेक्ट्रिक वाहने व स्वच्छ ऊर्जा साठवण्याच्या यंत्रणा यांसाठी लागणाऱ्या मोठ्या क्षमतेच्या बॅटऱ्यांमध्ये लिथियम हा कळीचा घटक असतो आणि अफगाणिस्तानात लिथियम मोठ्या प्रमाणात सापडले आहे.

४. अमेरिका–रशिया व अमेरिका–इराण यांच्यातील तणावामुळे भारताला अफगाणिस्तानातील वावर विस्तारणे अवघड झाले आहे.

५. तालिबान अजूनही अत्यंत निष्ठूर व प्रतिगामी आहे, त्यामुळे भारताला मानवाधिकारविषयक प्रश्न हाताळणे अवघड जाते– तालिबानने महिलांना विद्यापीठीय पातळीवरील शिक्षण घेण्यापासून प्रतिबंध केला आहे.

६. भारत आणखी दहशतवादी हल्ल्यांचे लक्ष्य ठरू शकतो.

**भारताने तालिबानसोबत संवाद साधण्यामागील कारणे–**

१. पाकिस्तानच्या आर्थिक ऱ्हासामुळे तालिबानवर सत्ता व प्रभुत्व गाजवण्याची त्याची क्षमता कमी हील.

२. पाकिस्तानातील सध्याच्या राजकीय अस्थैर्यामुळे भारताला अधिक सामरिक अवकाश मिळाला आहे.

३. अफगाणिस्तान हा लिथियमचा संपन्न स्त्रोत आहे, आणि इलेक्ट्रिक कारच्या बॅटरीसाठी लिथियम हा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो.

४. अमेरिकेच्या रोडावत्या प्रभावामुळे भारताला इथे पुढाकार घ्यायची संधी आहे.

५. अफगाणिस्तानच्या भूमीचा वापर भारताविरोधातील दहशतवादी कारवायांसाठी होऊ नये, यासाठी तालिबानचे मन वळवणे.

६. तालिबान लोकशाहीविरोधी आहे एवढ्या कारणावरून भारत त्यांच्यासोबतचा संपर्क गमावू शकत नाही, उलट आपण अफगाणिस्तानातील लोकांवर लक्ष केंद्रित करायला हवे. भारताच्या परराष्ट्र धोरणासंदर्भातील दृष्टिकोनामध्ये याला मध्यवर्ती स्थान असायला हवे.

**अलीकडच्या घडामोडी–**

१. भारताने जून २०२२मध्ये अफगाणिस्तानातील राजकीय उपस्थिती पुन्हा सुरू केली.

२. भारताने दिल्ली व दुश्नाबे इथे प्रादेशिक सुरक्षा चर्चेमध्ये सहभाग घेतला.

३. भारताने अलीकडे मानवतावादी सहाय्याचा भाग म्हणून ५० हजार मेट्रिक टन गहू अफगाणिस्तानला द्यायचे आश्वासन दिले.

**पुढील मार्गक्रमणा–**

१. किमान काही काळासाठी तरी तालिबान अफगाणिस्तानात सत्तेमध्ये राहणार असल्याचे भारताने लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे भारताने अफगाणिस्तानातील लोकांशी रचनात्मकदृष्ट्या संवाद साधणे आपल्या हिताचे ठरणारे आहे.

२. भारताने मानवतावादी मुत्सद्देगिरीच्या दृष्टीने संवाद साधायला हवा.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

३. फ्रान्स, रशिया, यांच्यासारख्या समविचारी देशांसोबत संवाद साधून प्रादेशिक सर्वानुमती उभारणे.

४. भारताने एससीओ, ब्रिक्स, सार्क यांसारख्या बहुराष्ट्रीय मंचांचा उपयोग करून अफगाणिस्तानातील समस्येवर उपाय शोधायला हवेत.

**भारत–पाकिस्तान संबंध**

**पार्श्वभूमी–**

भारताने पाकिस्तानच्या बाबतीत सातत्यपूर्ण व तत्त्वनिष्ठ धोरण अनुसरले आहे, म्हणजेच 'शेजाराला प्राधान्य' या धोरणानुसार भारताने दहशतवाद, वैरभाव व हिंसाचार यांच्यापासून मुक्त वातावरणात पाकिस्तानशी सुरळीत शेजारसंबंध राखण्याचा प्रयत्न केला; आणि शिमला करार व लाहोर घोषणापत्र या दस्तावेजांना अनुसरून पावले उचलत द्विपक्षीय व शांततापूर्ण मार्गांनी प्रश्न सोडवण्याची वाट निवडली; तसेच भारत स्वतःच्या राष्ट्रीय सुरक्षेशी निगडित प्रश्नांवर तडजोड न करता देशाच्या सुरक्षिततेला व राज्यक्षेत्रीय अखंडत्वाला बाधक ठरणारे सर्व प्रयत्न हाणून पाडण्यासाठी ठामपणे प्रयत्न करतो.

**भारत–पाकिस्तान सहकार्य–**

१. सिंधू नदी कराराची यशस्वी अंमलबजावणी.

२. सांस्कृतिक संबंध– कर्तारपूर मार्ग.

३. भारत सरकारने पाकिस्तानी रुग्णांना दिलेला वैद्यकीय व्हिसा.

४. लोकांच्या पातळीवरील संपर्क.



**प्रश्न व आव्हाने–**

१. ऐतिहासिक शत्रुत्व– फाळणीचा हा अवशेष असून याबाबतीत प्रचंड मतभिन्नता आहे.

२. ताबा रेषेचा न सुटलेला प्रश्न व इतर सीमाविषयक प्रश्न.

३. काश्मिरला दिलेला विशेष दर्जा भारताने रद्द केला– त्यानंतर पाकिस्तानने हा मुद्दा आंतरराष्ट्रीय मंचांवर उपस्थित केला.

४. पाकिस्तानच्या राज्यसंस्थेकडून दहशतवादाला प्रोत्साहन दिले जाते.

५. सीपीईसी प्रकल्प– पाकिस्तान–चीन आर्थिक मार्गाचा हा प्रकल्प भारताच्या राज्यक्षेत्रीय सार्वभौमत्वाला व अखंडत्वाला बाधक ठरणारा आहे.

६. बेकायदेशीर सीमापार स्थलांतर, दहशतवादी अतिक्रमण व काश्मिरमध्ये जहाल विचाराचा प्रसार.

७. मुख्यत्वे पाकिस्तानी सरकारी व्यवस्थेच्या पाठबळावर कार्यरत असणाऱ्या दहशतवादी संघटनांकडून वापरल्या जाणाऱ्या मानवरहित हवाई वाहनांबाबतची असुरक्षितता. भारतीय हवाई दलाच्या तळावर अलीकडे झालेला हल्ला.

८. चीनचा वाढता प्रभाव– यामुळे दोन आघाड्यांवर युद्ध उद्भवू शकते.

**पुढील मार्गक्रमणा–**

१. भारताने पाकिस्तानशी मागल्या दाराने मुत्सद्देगिरी करून अधिक संवाद साधायला हवा. त्यासाठी एससीओ व सार्क यांसारखे मंच वापरायला हवेत आणि त्याचसोबत दहशतवाद व चर्चा एकाच वेळी सुरू राहू शकत नाहीत याचीही पुनरुक्ती भारताने करायला हवी.

२. सौम्य सत्तेची मुत्सद्देगिरी– लोकांच्या पातळीवरील संपर्क वृद्धिंगत करण्यावर लक्ष केंद्रित करणे, क्रिकेटद्वारे मुत्सद्देगिरी, इत्यादी.

३. भारताने सीमेवरील पाळतयंत्रणा अद्ययावत करायला हवी.

४. भारत–पाकिस्तान आर्थिक व्यापार प्रचंड कमी आहे (सुमारे २.५ अब्ज डॉलर), तो वाढवण्याची गरज आहे.

**भारत–चीन संबंध**

**पार्श्वभूमी–**

१ एप्रिल १९५० रोजी चिनी लोकप्रजासत्ताकाशी राजनैतिक संबंध प्रस्थापित करणारा भारत हा समाजवादी गटाबाहेरचा पहिला देश ठरला. ऑक्टोबर १९५४ रोजी तत्कालीन पंतप्रधान नेहरू यांनी चीनला भेट दिली. १९६२ सालच्या सीमासंघर्षाने या संबंधांना फटका बसला असला तरी १९८८ साली पंतप्रधान राजीव गांधी यांनी चीनचा ऐतिहासिक दौरा केल्यावर द्विपक्षीय संबंधांमधील सुधारणेला सुरुवात झाली. १९९३ साली पंतप्रधान नरसिंह राव यांनी चीनचा दौरा केला, तेव्हा भारत–चीन सीमा प्रदेशांमध्ये प्रत्यक्ष ताबारेषेवर शांतता राखण्यासाठीच्या करारावर सह्या करण्यात आल्या. यातून द्विपक्षीय संबंधांमधील वाढते स्थैर्य दिसत होते.

पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळात, २००३ साली भारत व चीन यांनी 'संबंध व सर्वांगीण सहकार्य यांविषयीच्या तत्त्वांचे घोषणापत्र' अशा दस्तावेजावर सही केली. तसेच सीमावाद सोडवण्यासाठीची चौकट



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

शोधण्याकरता दोन्ही बाजूंनी विशेष प्रतिनिधी नेमण्याचे ठरवण्यात आले. एप्रिल २००५मध्ये चीनचे पंतप्रधान वेन जिआबाओ भारतभेटीवर आले असताना, दोन्ही बाजूंनी 'शांतता व संपन्नता यांसाठी सामरिक व सहकार्याधारित भागीदारी' सुरू करण्यात आली.

त्यानंतर मनमोहन सिंग यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात हे संबंध वैविध्यपूर्ण झाले व विस्तारले. नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात या संबंधांनी रोचक आर्थिक उडी घेतली व त्यात काही ताणही निर्माण झाले.

**महत्त्वाची आकडेवारी–**

१. भारत–चीन आर्थिक व्यापार– सुमारे ११५ अब्ज डॉलर.

२. चीनसोबतच्या व्यापारातील तूट– ७० अब्ज डॉलरांहून अधिक.




**भारत–चीन संबंधांमधील प्रश्न व आव्हाने–**

१. न सुटलेले सीमावाद– प्रत्यक्ष ताबारेषा, मॅकमोहन रेषा, हे प्रश्न अजून सुटलेले नाहीत.

२. दोन्ही देशांच्या स्पर्धात्मक जागतिक महत्त्वाकांक्षा.

३. व्यापारातील मोठी तूट– ७० अब्ज डॉलरांहून अधिक.

४. अक्साई चीन व अरुणाचल प्रदेश इथल्या सार्वभौमत्वाचा प्रश्न.

५. राज्यक्षेत्रीय आक्रमकता– सीपीईसी, पूर्व लडाख व तैवान.

६. भारताच्या शेजारी देशांमधील चीनचा वाढता हस्तक्षेप.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

७. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेमध्ये दहशतवाद्यांच्या यादीत नावांची भर टाकण्यासाठी भारत करत असलेले प्रयत्न चीन नकाराधिकार वापरून सातत्याने हाणून पाडतो.

८. नदीच्या पाण्यावरून वाद– ब्रह्मपुत्रा नदीच्या वरच्या भागात धरणे बांधल्यामुळे पुढील काळात ईशान्य भारतात पाणीसुरक्षेचा प्रश्न निर्माण होईल.

---

- आर्थिक सामर्थ्य– १७ खर्व डॉलरांची अर्थव्यवस्था
- तंत्रज्ञानीय वर्चस्व– कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, अंतराळविज्ञान यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञानीय अभिनवतेला चालना दिली जाते.
- सैनिकी– जगातील दुसरा सर्वाधिक सैनिकी खर्च चीन करतो.
- भूसामरिक वर्चस्व– चीनच्या बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह या प्रकल्पाची उपस्थिती आशिया खंडात सर्वत्र आहे.
- अत्यंत महत्त्वाच्या खनिजांच्या पुरवठासाखळ्यांवर चीनचे नियंत्रण आहे– दुर्मिळ भूमिगत घटक.
- जागतिक मूल्यसाखळीच्या केंद्रस्थानी– इलेक्ट्रॉनिक्स वस्तुनिर्माण.

---

**भारत–चीन संबंधांमधील आर्थिक गतिमानता–**

१. एपीआय, इलेक्ट्रॉनिक्स व सौरपट्ट्या यांवर अतिरिक्त अवलंबित्व– ७० टक्के एपीआय व ८० टक्के सौरपट्ट्या भारत चीनकडून आयात करतो.

२. चीनसोबतच्या व्यापारात प्रचंड तूट– चीन भारताला सुमारे १०० अब्ज डॉलरांची निर्यात करतो.

३. चिनी अर्थव्यवस्था भारतीय अर्थव्यवस्थेपेक्षा पाच पटींनी मोठी आहे.

**भारताच्या शेजारामधील चिनची वाढती उपस्थिती–**

| | |
|---|---|
| १. नेपाळ | आंतरहिमालयन बहुआयामी जाळे |
| २. बांग्लादेश | २५ प्रकल्पांना वित्तपुरवठा,<br>दुसरा आण्विक ऊर्जा प्रकल्प,<br>बंगबंधू १ उपग्रह |
| ३. श्रीलंका | कर्जविषयक वित्तपुरवठा,<br>हम्बान्तोता बंदर<br>लढाऊ जहाजाचे दान. |
| ४. मालदीव | ७० टक्के कर्जपुरवठा,<br>अनेक बेटे चीनला भाडेकरारावर. |
| ५. पाकिस्तान | आर्थिक सहाय्य,<br>कर्जविषयक वित्तपुरवठा,<br>सीपीईसी |



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421




**भारतावरील संभाव्य परिणाम–**

१. चीन–पाकिस्तान–अफगाणिस्तान या अक्षाने भारताच्या राष्ट्रहिताला बाधा पोचू शकते.

२. चीनने पाकिस्तानला आर्थिक पाठबळ पुरवल्यामुळे– चीन–पाकिस्तान आर्थिक मार्गाच्या उभारणीमुळे भारताच्या राज्यक्षेत्रीय सार्वभौमत्वाला व अखंडत्वाला बाधा पोचू शकते.

३. भारताच्या समुद्री सुरक्षेल धोका– चीनने राबवलेली 'स्ट्रिंग ऑफ पर्ल' व्यूहरचना.

४. भारताचा सामरिक वरचष्मा कमी होईल.

५. व्यापारातील प्रचंड असमतोलामुळे भारत चीनच्या लहरीपणावर व कल्पनांवर अवलंबून राहील व असुरक्षित होईल.

६. चीनच्या विरोधात समतोल साधणारे राष्ट्र म्हणून स्वतःची आक्रमक भूमिका घ्यायची की जैसे–थे परिस्थिती अनुसरायची, हा भारतासमोरचा सामरिक संभ्रम आहे.

७. जागतिक आरोग्य संघटना, जागतिक व्यापार संघटना, ब्रिक्स, आरआयसी, एससीओ, इत्यादींसारख्या बहुराष्ट्रीय मंचांवर चीनचे वर्चस्व आहे, आणि ही स्थिती भारताच्या हिताची नाही.

८. चीन कर्जकचाट्याची मुत्सद्देगिरी पुढे रेटतो आहे, तसेच अवजड पायाभूत सुविधा निर्माण करून देतो आहे (उदाहरणार्थ, हम्बान्तोता बंदराची बांधणी), अशा वेळी चीनच्या आक्रमकतेमुळे आपल्याच शेजारच्या प्रदेशातील भारताचा प्रभाव कमी होईल.

**पुढील मार्गक्रमणा–**

१. तणाव टाळून संबंध सुधारण्यासाठी सीमा निश्चित करायची व आखून घ्यायची गरज आहे.

२. भारताने शेजाऱ्यांशी आर्थिक एकीकरण साधण्यासाठीची व्यूहरचना आखायला हवी.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

३. भारताने जपान, ऑस्ट्रेलिया, युनायटेड किंगडम यांसारख्या समविचारी देशांशी सतत संवाद ठेवायला हवा; कारण, या देशांनाही चीनसंदर्भात अशीच चिंता वाटते आहे.

४. नवद्योगांना पुरेसा निधीपुरवठा करणे आणि वस्तुनिर्माणाच्या क्षमता वाढवणे.

५. पायाभूत परिसंस्था सुधारणे आणि नवीन गुंतवणूकस्नेही वातावरण निर्माण करणे.

***



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

# अभ्यासक्रमातील विषय– भारताचा समावेश असणारे आणि/किंवा भारताच्या हितसंबंधांवर परिणाम करणारे द्विपक्षीय, प्रादेशिक व जागतिक गट आणि करार

गेल्या वर्षीचे प्रश्न पाहू–

| प्रश्न | कळीचा शब्द/मागणी | विषयसूत्र |
|---|---|---|
| "If the last few decades were Asia's growth story, the next few are expected to be Africa's." In the light of this statement, examine India's influence in Africa in recent years.(2021) | भारत-आफ्रिका संबंध | समकालीन चालू घडामोडी |
| The time has come for India and Japan to build a strong contemporary relationship, one involving global and strategic partnership that will have a great significance for Asia and the world as a whole.' Comment. (2019) | भारत-जपान संबंधांचे बळकटीकरण | समकालीन चालू घडामोडी |
| "What introduces friction into the ties between India and the United States is that Washington is still unable to find for India a position in its global strategy, which would satisfy India's National self- esteem and ambitions" Explain with suitable examples. (2019) | भारत-अमेरिका संबंधांमधील प्रश्न | समकालीन चालू घडामोडी |
| What is the significance of Indo-US defense deals over Indo-Russian defense deals? Discuss with reference to stability in the Indo-Pacific region. (2020) | भारत-अमेरिका शस्त्रास्त्र कराराचे महत्त्व | चालू घडामोडी |



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

| | | |
|---|---|---|
| "India's relations with Israel have, of late, acquired a depth and diversity, which cannot be rolled back." Discuss. (2018) | भारत-इस्राएल संबंध | समकालीन चालू घडामोडी |
| In what ways would the ongoing U.S-Iran Nuclear Pact Controversy affect the national interest of India? How should India respond to this situation? (2018) | इराण आण्विक करार व त्याची भारतासाठीची प्रस्तुतता | समकालीन चालू घडामोडी |
| Increasing interest of India in Africa has its pros and cons. Critically examine. (2015) | भारत-आफ्रिका संबंध | समकालीन चालू घडामोडी |
| Economic ties between India and Japan, while growing in recent years, are still far below their potential. Elucidate the policy constraints which are inhibiting this growth. (2013) | भारत-जपान संबंधांचे सामर्थ्य | समकालीन चालू घडामोडी |

**भारत–जपान संबंध**

**पार्श्वभूमी–**

भारत व जपान यांच्यातील मैत्रीचा दीर्घ इतिहास आहे, त्याची मुळे अध्यात्मिक स्नेहामध्ये आणि सक्षम सांस्कृतिक व सभ्यताजन्य नात्यामध्ये रुजलेली आहेत. याची सुरुवात इसवीसन ७५२मध्ये भारतीय भिक्खू बोधिसेना यांनी जपानला भेट दिली तेव्हापासून झाली. या संबंधांसाठी २०१३ हे वर्ष ऐतिहासिक ठरले– या वर्षी तत्कालीन जपानी सम्राट अखिहितो व सम्राज्ञी मिचिको यांनी पहिल्यांदाच भारताचा दौरा केला (३० नोव्हेंबर–६ डिसेंबर २०१३). या भेटीनंतर दोनेक महिन्यांनी जपानी पंतप्रधान आबे यांनी जानेवारी २०१४मध्ये भारताचा अधिकृत दौरा केला. त्या वेळी ते प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे होते (पहिल्यांदाच एखाद्या जपानी पंतप्रधानांना हा सन्मान लाभला). पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वार्षिक शिखरबैठकीसाठी ऑगस्ट–सप्टेंबर २०१४मध्ये जपानचा अधिकृत दौरा केला (भारताच्या शेजाराबाहेरील त्यांचा हा पहिला द्विराष्ट्रीय दौरा होता). यातून द्विराष्ट्रीय संबंधांना 'विशेष सामरिक व जागतिक भागीदारी'चे रूप आले. भारत–जपान वार्षिक शिखरबैठका नियमितपणे घेतल्या जातात.

**महत्त्वाची तथ्ये–**

- द्विराष्ट्रीय व्यापार– ११.८७ अब्ज डॉलर.
- जपान हा भारताचा सर्वांत मोठा अधिकृत विकासविषयक सहकार्य भागीदार आहे.
- जपान हा भारतातील थेट परकीय गुंतवणुकीचा पाचवा सर्वांत मोठा स्त्रोत आहे.




**सहकार्याचे प्रांत–**

१. आर्थिक पूरकता व व्यापारी सुरक्षितता– भारत व जपान यांनी २०११ साली सीईपीए करारावर सह्या केल्या, आणि त्याद्वारे चलन देवाणघेवाण कराराचे नूतनीकरण झाले.

२. संरक्षण व सामरिक– हिंद–पॅसिफिक ओपन इनिशिएटिव्ह, सप्लाय चेन रेसिलियन्स इनिशिएटिव्ह, जेआयएमईएक्स, ॲक्विझिशन अँड क्रॉस सर्व्हिस ॲग्रीमेन्ट.

३. बहुराष्ट्रीय सहकार्य– क्वाड, जी–२०, जी–४, हिंद–पॅसिफिक आर्थिक चौकट यांसारखे मंच.

४. सांस्कृतिक सहकार्य– बौद्ध धर्माच्या ऐतिहासिक वारशाचा भारत–जपान संबंधांवर मोठा प्रभाव आहे. त्यातून



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

भागीदारी शहर संलग्नता कराराचा जन्म झाला.

५. उच्चतंत्रज्ञानीय सहकार्य– लुपेक्समध्ये अंतराळविषयक सहकार्य, भारत–जपान डिजिटल भागीदारी.

६. अनुकूल लोकसांख्यिकी सहकार्य– जपान वृद्ध होत आहे, तर भारतात मोठी कुशल श्रमशक्ती आहे.

**प्रश्न व आव्हाने–**

१. आशिया आफ्रिका वृद्धी मार्गाच्या कार्यपद्धतीमध्ये विलंब व व्यवहार्यतेच्या विश्लेषणाचा अभाव.

२. चीनच्या आव्हानाला प्रतिसाद देणे हे दोन्ही देशांसाठी अवघड काम असणार आहे.

३. चीनच्या तुलनेत कमी आर्थिक व्यापार, सीईपीएला मर्यादित यश.

४. विविध देशांतर्गत प्रकल्पांमुळे प्रादेशिक सहकार्य आर्थिक कराराबाबत भिन्न मते.

५. ठप्प झालेले प्रमुख प्रकल्प– बुलेट ट्रेनचा प्रकल्प अजूनही अपूर्ण आहे.

६. क्वाडअंतर्गत हिंद–पॅसिफिक दृष्टियोजनेबाबत भिन्न आकलने आहेत.

७. माहितीच्या सीमापार प्रवाहाबद्दल परस्परविरोधी मते– भारत 'माहितीचे (डेटा) स्थानिकीकरण' करण्याचा पुरस्कार करतो, तर जपानला माहितीच्या प्रवाहाचे प्रमाणीकरण व्हायला हवे आहे.

**अलीकडच्या घडामोडी–**

१. भारत–जपान संबंधांच्या ७०व्या वर्धापनदिनानिमित्त नवी दिल्लीमध्ये १४वी भारत–जपान वार्षिक शिखरबैठक झाली.

२. ईशान्य भारतासाठी शाश्वत विकास उपक्रम सुरू करण्यावर सहमती झाली.

३. माहितीच्या देवाणघेवाणीसाठी सायबरसुरक्षा, क्षमताबांधणी कार्यक्रम व सहकार्य याबाबतच्या सहकार्य ज्ञापनावर सह्या करण्यात आला.

**पुढील मार्गक्रमणा**

१. चीनचा प्रतिकार– दोन्ही देशांच्या समुद्री सीमांवर वार्षिक मलबार कवायत.

२. हरित ऊर्जा भागीदारी; वस्तुनिर्माण आणि सूक्ष्म–लघु–मध्य उद्योगांमध्ये अभिनव भागीदारी निर्माण करणे.

३. अधिक आर्थिक एकीकरणासाठी सीईपीएचे सुसूत्रीकरण.

४. हिंद महासागरातील तेलपुरवठा सुरक्षित ठेवण्याकरता जपानला भारताच्या सहकार्याची गरज आहे. पारंपरिक व अपारंपरिक सुरक्षाविषयक धोक्यांमुळे हा साठा अधिकाधिक धोक्यात येत आहे.

५. भारत व जपान यांनी उच्चतंत्रज्ञानीय क्षेत्रांमध्येही स्वतःचे सहकार्य विकसित करण्याची गरज आहे. त्यात अंतराळविषयक संशोधन, जैवतंत्रज्ञान, सुपरकम्प्युटर, इत्यादींचा समावेश होतो. त्यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे त्यांना प्रादेशिक व जागतिक समुदायाला ग्रासणाऱ्या विविध समस्यांवर उपाय शोधायला मदत होईल.

६. भारत व जपान हे मध्य, पूर्व, दक्षिण व आग्नेय आशियाई देशांच्या एकत्रित सुरक्षाविषयक हितसंबंधांबाबत मध्यवर्ती

आधारस्तंभ होऊ शकतात. सध्या आक्रमक चीनचा मोठा धोका या देशांसमोर उभा आहे.

जगातील इतर कोणत्याही द्विपक्षीय संबंधांचा विचार करता भारत व जपान यांच्या संबंधांमध्ये सर्वाधिक सामर्थ्य आहे.

- पंतप्रधान शिन्झो आबे

  भारत व जपान हे सभ्यताजन्य शेजारी आहे.

- पंतप्रधान मनमोहन सिंग

थोडक्यात, भारत व जपान यांनी आधी परस्परांशी संवाद न साधल्यामुळे आर्थिक व सामरिक अवकाशांमध्ये दोघांसाठीही लाभदायक ठरतील अशा महत्त्वाच्या संधी त्यांनी गमावल्या. परंतु, भारतीय व जपानी अर्थव्यवस्थांचे पूरक स्वरूप आणि त्यांच्या सुरक्षाविषयक व राजकीय हितसंबंधांमध्ये साधला जाणारा संयोग, यांमुळे ते ‘सामायिक आस्थाविषय’ असणारे ‘नैसर्गिक मित्र’ ठरतात, त्यामुळे दीर्घकालीन प्रवाहात त्यांची भागीदारी अनिवार्य आहे.

**भारत–अमेरिका संबंध**

**आढावा**

भारत व अमेरिका यांचे द्विपक्षीय संबंध ‘जागतिक सामरिक भागीदारी’पर्यंत विकसित झाले आहेत. सामायिक लोकशाही मूल्ये आणि द्विपक्षीय, प्रादेशिक व जागतिक प्रश्नांवरील हितसंबंधांमधील वाढता संयोग यांवर हे संबंध आधारले आहेत. भारत सरकारने विकास व सुशासन यांवर भर दिलेला असल्यामुळे द्विपक्षीय संबंधांचे पुनरुज्जीवन व्हायला संधी मिळाली आणि ‘चलें साथ साथ’ (एकत्र वाटचाल करूया) व ‘सांझा प्रयास, सब का विकास’ (सामायिक प्रयत्नांतून सर्वांचा विकास) या ब्रीदवाक्यांखाली सहकार्य वृद्धिंगत झाले. पंतप्रधान मोदी व राष्ट्राध्यक्ष ओबामा यांच्यात अनुक्रमे सप्टेंबर २०१४ व जानेवारी २०१५ मध्ये झालेल्या शिखरबैठकांवेळी ही ब्रीदवाक्ये स्वीकारण्यात आली. जून २०१६मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या शिखरबैठकीच्या पातळीवरील संयुक्त निवेदनात भारत–मेरिका संबंध हे ‘एकविसाव्या शतकातील टिकाऊ जागतिक भागीदार’ असल्याचे म्हटले होते.

उच्स्तरीय राजकीय दौऱ्यांमधून होणाऱ्या नियमित देवाणघेवाणीमुळे द्विपक्षीय सहकार्याला शाश्वत गती मिळाली आले, तर व्यापक व सतत विस्तारत्या चर्चा रचनेमुळे भारत–अमेरिका संवादाला दीर्घकालीन चौकट मिळवून दिली आहे.

**महत्त्वाची तथ्ये–**

१. अमेरिका हा भारताचा सर्वांत मोठा व्यापारी भागीदार आहे– द्विपक्षीय व्यापार ११९ अब्ज असून ते भारताच्या पथ्यावर पडणारे आहे.

२. अमेरिका हे भारताच्या व्यापारी वस्तूंच्या निर्यातीचे सर्वांत मोठे ठिकाण आहे.

३. अमेरिका– भारतातील थेट परकीय गुंतवणुकीचा दुसरा सर्वांत मोठा स्त्रोत.

४. भारताकडे होणाऱ्या वित्तप्रेषणाचा मुख्य स्त्रोत म्हणून अमेरिकेने संयुक्त अरब अमिरातीला मागे टाकले आहे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

अमेरिकेचा यातील वाटा २०२१ साली २३.४ टक्के होता, तो २०१७ साली २२.९ टक्क्यांपर्यंत वाढला.

५. भारतीय हा अमेरिकेतील तिसरा सर्वांत मोठा आशियाई वांशिक (एथ्निक) समूह आहे.

**सहकार्याचे प्रांत–**

१. संरक्षण व सुरक्षितता– चार पायाभूत संरक्षणविषयक करार– सीओएमसीएएसएसए, जीएसओएमआयए, एलईएमओए, व बीईसीए.

२. सैनिकी कवायती– मलबार, युद्धाभ्यास, वज्रप्रहार.

३. समुद्री सुरक्षाविषयक सहकार्याचे करार– क्वाड, आय२यू२.

४. आर्थिक सहकार्य– सेवांमधील व्यापार, आकर्षक बाजारपेठ.

५. भारतीय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उच्चशिक्षणासाठी जाण्याकरता अमेरिकेला सर्वाधिक प्राधान्य दिले जाते.

६. अंतराळविषयक भागीदारी– जॉइन्ट मायक्रोवेव्ह रिमोड सेन्सिंग सॅटेलाइट– निसार.

७. दहशतवादविरोधी सहकार्य.

**प्रश्न आणि आव्हाने–**

१. अमेरिकेकडून उच्चतंत्रज्ञान स्वीकारल्यावर त्याच्या सुरक्षिततेची हमी देणारी अनेक दायित्वेही मान्य करावी लागतात.

२. अमेरिकेने इराणवर लादलेल्या निर्बंधांमुळे चाबहार बंदलाच्या विकासाच्या गतीमध्ये बाधा येते आहे.

३. युक्रेनमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे अमेरिकेचे लक्ष हिंद–पॅसिफिक प्रदेशातील चीनच्या सामरिक आव्हानापासून विचलित होते आहे.

४. औषधनिर्मितीसंदर्भातील पेटन्ट व डेटाच्या स्थानिकीकरणासंबंधीची धोरणे याबद्दल भिन्न मते– भारत 'विशेष चौकशी ३०१' या अग्रक्रमावरील देखरेख यादीमध्ये राहिला आहे.

५. भारताचा जीएसपी दर्जा रद्द झाल्याचा विपरित परिणाम भारताच्या स्पर्धात्मकतेवर होणार आहे.

६. अमेरिकेने अफगाणिस्तानातून माघार घेतल्यामुळे त्या प्रदेशात सत्तेची पोकळी निर्माण होईल आणि चीन त्यात शिरकाव करण्याची शक्यता आहे.

७. क्वाडच्या हिंद–पॅसिफिक प्रदेशातील भूमिकेविषयीची भिन्न आकलने.

८. भारत व अमेरिका यांना अवघड वारशावर मात करावी लागले. अनेक दशके अमेरिकेने आपल्या आण्विक व क्षेपणास्त्रविषयक क्षमतांच्या विकासात अडथळे आणले आणि स्वतःच्या देशांतर्गत कायद्यांसोबतच आंतरराष्ट्रीय निर्यात नियंत्रणांद्वारे जागतिक निर्बंध लादून भारताच्या सामरिक हितसंबंधांची मोठी हानी केली आहे.

**पुढील मार्गक्रमणा–**

१. भारत व अमेरिका यांनी लस संशोधन व विकास यांबाबतीत सहकार्य करायला हवे– अमेरिकेतील विद्यापीठांनी भारतातील लसउत्पादकांशी भागीदारी करायला हवी.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

२. सामायिक दीर्घकालीन हितसंबंधांवर लक्ष केंद्रित– दहशतवादाचा प्रतिकार, आशियाई सुरक्षितता व संपन्नता.

३. दोन्ही देशांनी जागतिक शासनव्यवहाराची संरचना सुधारून एकमेकांना सहकार्य करायला हवे.

४. अमेरिकेने चीनच्या आव्हानाला आटोक्यात ठेवण्यासाठी हिंद–पॅसिफिक प्रदेशात अधिक राजनैतिक व वित्तीय भांडवल गुंतवायला हवे.

५. अमेरिकेने हवामानबदलामुळे उद्भवलेल्या आव्हानात्मक परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी सक्रियरित्या तंत्रज्ञानाचे हस्तांतरण करावे व वित्तपुरवठा करावा.

६. दोन्ही देशांनी जागतिक संस्था अधिक सक्षम व शाश्वत करण्यासाठी सहकार्य करायला हवे– सीडीआरआय, आयएसए, क्वाड.

**भारत–इस्राएल संबंध**

भारत व इस्राएल यांच्यात विस्तृत व सर्वांगीण आर्थिक, सैनिकी व राजकीय संबंध आहेत. हे दोन्ही देश आय२यू२ गटामध्ये आहेत. भारतीय व इस्राएली सरकारांनी असे नमूद केले आहे की, परस्परांच्या समस्यांमध्ये व त्यावर उपाय करायच्या इच्छेमध्ये त्यांच्यातील संबंध रुजले आहेत. विशेषतः भारताच्या दृष्टीने इस्राएलची तांत्रिक उपकरणे महत्त्वाची ठरतात.

**महत्त्वाची तथ्ये–**

१. द्विपक्षीय व्यापार ५.६६ अब्ज डॉलर आहे, ते भारताच्या अनुकूल आहे.

२. भारत हा आशियातील इस्राएलचा तिसरा सर्वांत मोठा व्यापारी भागीदार आहे.

३. हिऱ्यांचा व्यापार– द्विपक्षीय व्यापारातील अर्धा वाटा या व्यापाराचा आहे.

**सहकार्याचे प्रांत–**

१. संरक्षण– सैनिकी अवजड उपकरणे व उच्चतंत्रज्ञानीय शस्त्रास्त्रे (फाल्कन यंत्रणा, थर्मल सेन्सर, पित समुद्रासाठी पाळतीची उपकरणे).

२. अद्ययावत तंत्रज्ञानासाठी भागीदारी– नॅनो तंत्रज्ञान, जल तंत्रज्ञान आणि जैव तंत्रज्ञान.

३. शेती– औद्योगिक उपक्रम व शेतकी बाजारपेठांमधील संयुक्त गुंतवणूक.

४. गुप्तचरविषयक सहकार्य– रॉ व मोस्साद यांची गुप्तचरविषयक माहितीची देवाणघेवाण.

५. अंतराळ क्षेत्रातील सहकार्य– लहान उपग्रहांसाठी इलेक्ट्रिक प्रोपल्शन सिस्टिम (ईपीएस)बाबत सहकार्य व जीओ–लिओ (गिओसिन्क्रोनस अर्थ ऑर्बिट–लो अर्थ ऑर्बिट) ऑप्टिकल लिंक.

६. सांस्कृतिक संबंध– कला व संस्कृतीच्या क्षेत्रामध्ये द्विपक्षीय सांस्कृतिक देवाणघेवाणीला सुकरता आणून देणारा (यात 'युथ एक्सेन्ज'चाही समावेश होता) सांस्कृतिक देवाणघेवाण कार्यक्रम (२०२०–२३ या कालावधीसाठी) ऑगस्ट २०२०मध्ये स्वीकारण्यात आला.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421




**पुढील मार्गक्रमणा (भविष्यातील संभाव्यता)–**

१. सामरिक पूरकता– भारताची सैनिकी बाजारपेठ पुरवठादारांमध्ये वैविध्य आणण्यासाठी नवीन उपायांच्या शोधात आहे. इस्राएल ही जागा भरून काढू शकतो.

२. दोन्ही देशांनी दहशतवादाशी लढण्याकरता त्रिपक्षीय मंच निर्माण करण्याचा प्रयत्न करायला हवा.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

३. भारत–इस्राएल संबंधांमध्ये सैनिकी क्षेत्राकडून ज्ञानकेंद्री स्वरूपाच्या माहिती–तंत्रज्ञान, सॉफ्टवेअर, अंतराळ संशोधन आदी क्षेत्रांचा समावेश व्हायला हवा.

४. भारताने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पटीने वाढवण्याच्या मोहिमेचा भाग म्हणून इस्राएलशी असणारे सहकार्य वाढवायला हवे.

५. दोन्ही देशांनी संरक्षणविषयक उत्पादन व संशोधन यांमध्ये संयुक्त उपक्रम सुरू करायला हवेत.

६. सेमिकंडक्टरांच्या उत्पादनामध्ये सहकार्य.

**भारत–इराण संबंध**

भारत–इराण संबंधांमध्ये अनेक शतकांची अर्थपूर्ण अन्योन्यक्रीडा घडत आली आहे. या दोन देशांची सीमा १९४७ सालापर्यंत एकमेकांना लागून होती आणि भाषा, संस्कृती व परंपरा यांबाबतीत त्यांच्यात अनेक सामायिक वैशिष्ट्ये आहेत. दक्षिण आशिया व पर्शियन आखात या दोन्हींमध्ये सक्षम व्यापारी, ऊर्जाविषयक, सांस्कृतिक व लोकपातळीवरचे संबंध आहेत.

**महत्त्वाची तथ्ये–**

१. १.९ अब्ज डॉलरांचा द्विपक्षीय व्यापार.

२. इराणकडून होणारी तेलाची आयात २०२१ साली १ टक्क्यांहून कमी झाली.

३. अमेरिकेने इराणवर निर्बंध लादण्यापूर्वी भारत इराणला तेलाच्या व्यापारासाठी भारतीय रुपयामध्ये मोबदला देत असे.






Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**भारतासाठी इराणचे महत्त्व–**

१. मध्य आशिया व अफगाणिस्तान यांच्याशी जोडून घेण्याचा पर्यायी मार्ग इराण पुरवतो.

२. २००९–१०मध्ये इराण हा भारताचा दुसरा सर्वांत मोठा तेल निर्यातदार होता. अमेरिकेच्या निर्बंधांमुळे २०२०–२१ साली हा वाटा १ टक्क्याच्या खाली गेला. त्यामुळे भारताच्या ऊर्जासुरक्षेसाठी इराण महत्त्वाचा आहे.

३. भारत इराणमध्ये चाबहार बंदर विकसित करतो आहे. चाबहार बंदरासंदर्भातील भारतीय उपस्थिती ग्वादार बंदरासंदर्भातील चिनी उपस्थितीबाबत समतोल साधेल.

४. इराणचे तालिबानशी जवळचे संबंध आहेत, त्यामुळे अफगाणिस्तानात तालिबानशी संवाद साधण्याकरता भारताला इराण महत्त्वाचा ठरतो.






Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**भारत–इराण संबंधांमधील प्रश्न व आव्हाने–**

१. अमेरिकी निर्बंधांमुळे इराणकडून होणारी तेलआयात थांबवण्याचा भारताचा निर्णय इराणला रुचलेला नाही.

२. इराण व चीन यांच्यातील वाढती जवळीक– या दोन्ही देशांमध्ये १५ वर्षांचा सामरिक भागीदारी करार झाला आहे.

३. इराणचा पाठिंबा असणारे हौथी येमेनमध्ये सौदी अरेबिया व संयुक्त अरब अमिराती यांच्या विरोधात ड्रोन हल्ले करतात, आणि हे दोन्ही देश भारताचे जवळचे भागीदार आहेत.

४. चाबहार बंदर व आयएनएसटीसी यांच्या विकासाची गती संथ आहे.

५. भारत आय२यू२चा भाग झाला आहे आणि इस्राएलसोबतच्या त्याच्या सैनिकी सहकार्यावर इराणमधील कट्टरतावादी टीका करत आहेत.

६. इराण आण्विक करार कुंठितावस्थेत अडकल्यामुळे भारताच्या इराणसोबतच्या व्यापारामध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत.

**अलीकडच्या घडामोडी–**

१. सौदी अरेबिया व इराण यांनी येमेनमधील शस्त्रसंधीबाबत एकमेकांशी चर्चा सुरू केल्या आहेत.

२. संयुक्त अरब अमिराती व कतार यांनी इराणसोबत चर्चा केली आहे.

यावरून पश्चिम आशिया प्रदेशातील गतिमानता बदलत असल्याचे संकेत मिळतात.

**पुढील मार्गक्रमणा–**

१. भारताने स्वतःच्या सामरिक स्वायत्ततेचा वापर करायला हवा आणि इराणकडून तेलाची आयात सुरू करायला हवी. यातून तेलाच्या आंतरराष्ट्रीय किंमती कमी होतील.

२. भारताने चाबहार बंदर व आंतरराष्ट्रीय उत्तर–दक्षिण मार्ग यांसारखे प्रकल्प वेगाने पूर्ण होण्यासाठी इराणशी तत्परतेने सहकार्य करायला हवे.

३. कुंठित इराण आण्विक करार पूर्ववत वाटेवर आणण्यासाठई भारताने स्वतःचे राजनैतिक वजन वापरायला हवे.

४. भारत–ओमान–इराण गॅस पाइपलाइन पूर्णत्वास न्यावी.

५. भारताने इराणी राजवटीद्वारे तालिबानशी अधिक संवाद साधायला हवा.

६. भारत–इराण यांच्यातील व्यापार अतिशय कमी आहे. दोन्ही देशांनी यात सुधारणा घडवण्यासाठी प्राधान्यजन्य व्यापारी करार करायला हवा.

**भारत–रशिया संबंध**

**आढावा–**

रशिया हा भारताचा दीर्घकालीन व काळाच्या कसोटीवर टिकून राहिलेला भागीदार आहे. भारत–रशिया संबंधांचा विकास हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा एक महत्त्वाचा स्तंभ आहे. ऑक्टोबर २०००मध्ये (राष्ट्राध्यक्ष पुतीन यांच्या



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

भारतभेटीवेळी) ‘भारत–रशिया सामरिक भागीदारीच्या घोषणापत्रा’वर सह्या करण्यात आल्या, तेव्हा भारत–रशिया संबंधांनी गुणात्मकरित्या नवीन रूप धारण केले, आणि राजकारण, सुरक्षा, संरक्षण, व्यापार व अर्थव्यवस्था, विज्ञान व तंत्रज्ञान, संस्कृती व लोकांच्या पातळीवरील संबंध, अशा द्विपक्षीय संबंधांच्या जवळपास सर्व प्रांतांमध्ये सहकार्य वाढले. सामरिक भागीदारीनुसार राजकीय व अधिकृत पातळ्यांवर अनेक संस्थात्मक चर्चांच्या यंत्रणा कार्यरत असतात, त्यातून सहकार्य होत असलेल्या विविध व्यवहारांबाबत नियमितपणे संवाद साधला जातो. रशियाचे राष्ट्राध्यक्ष डिसेंबर २०१०मध्ये भारतभेटीवर आले असताना सामरिक भागीदारीने ‘विशेष व विशेषाधिकारी सामरिक भागीदारी’ची पातळी गाठली.

कोव्हिड–१९शी संबंधित आव्हाने असली तरी भारत–रशिया संबंध सखोल जात राहिले. राजकीय संवादासोबतच सुरक्षा, संरक्षण, व्यापार व अर्थव्यवस्था, विज्ञान व तंत्रज्ञान व संस्कृती यांसारख्या द्विपक्षीय संबंधांच्या सर्व प्रांतांमध्ये सहकार्य वृद्धिंगत झाले. कोव्हिड–१९च्या जागतिक साथीशी लढण्यासाठी झालेल्या संयुक्त प्रयत्नांद्वारे हे सहकार्य आणखी वाढले. लशीच्या चाचण्या व उत्पादन, औषधांचा पुरवठा व दोन्ही देशांमधील नागरिकांना मायदेशी पाठवणे, अशा पातळ्यांवर हे सहकार्य दिसून आले.

**महत्त्वाची तथ्ये–**

१. द्विपक्षीय व्यापार– ८.१ अब्ज डॉलर.

२. भारताती रशियाची गुंतवणूक– १८ अब्ज डॉलर

३. रशियाच्या शस्त्रांची भारत करत असलेली आयात २०१५ साली ७० टक्के होती, ती २०२१ साली ४६ टक्क्यांपर्यंत खाली आली.

**भारतासाठी रशियाचे महत्त्व–**

१. भारत व चीन यांच्यातील तणाव निळवण्यामध्ये रशिया आरआयसीद्वारे महत्त्वाची भूमिका निभावू शकतो.

२. भारताच्या ऊर्जासुरक्षेसाठी रशिया महत्त्वाचा आहे.

३. दहशतवादविरोधी लढा– भारत व रशिया या दोन्ही देशांमधील ‘दहशतवादाशी लढा देण्यासंदर्भातील सर्वांगीण करार’ अंतिम टप्प्यात आहे.

४. रशिया हा भारताचा सर्वांत मोठा शस्त्र निर्यातदार आहे (४६ टक्के)






Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**सहकार्याचे प्रांत– विशेष व विशेषाधिकारी सामरिक भागीदारी चार स्तंभावर आधारलेली आहे.**

१. राजकीय व सुरक्षाविषयक सहकार्य– मध्य आशियातील हितसंबंधांचा संयोग, आण्विक पुरवठादार गट व संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतील सदस्यत्वासाठी भारताला पाठिंबा, अफगाणिस्तानसंदर्भातील संयुक्त कार्यकारी गट, एससीओ व ब्रिक्स यांद्वारे दहशतवादविरोधी प्रयत्नांमधील संयोग.

२. संरक्षणविषयक सहकार्य– खरेदीदार–विक्रेता संबंधांचे रूपांतर संयुक्त संशोधन, विकास व उत्पादन यांमध्ये करण्यात आले आहे (ब्राह्मोस), शिवाय तंत्रज्ञानाचे हस्तांतरणही केले जाते.

३. अंतराळविषयक सहकार्य– गंगनयान अभियान, इस्रो व रॉस्कॉस्मॉस यांच्यात ग्लॉनाससंदर्भात भागीदारी सुरू आहे.

४. ऊर्जाविषयक सहकार्य– रशिया जागतिक ऊर्जा संसाधनांपैकी २० टक्के संसाधनांवर नियंत्रण राखून आहे, त्यामुळे ऊर्जासुरक्षिततेसाठी तो नैसर्गिक भागीदार ठरतो.

५. आण्विक सहकार्य– कुडानकुलम आण्विक ऊर्जा प्रकल्प, रूपूर आण्विक प्रकल्प.

६. आर्थिक व व्यापारी– दोन्ही देशांनी गुंतवणूक ५० अब्ज डॉलरांपर्यंत वाढवण्याची इच्छा व्यक्त केली आहे, रुपया–रुपल व्यापार, भारतामध्ये औद्योगिक विकासाचा मार्ग उभारणे.

७. जोडणीविषयक सहकार्य– आंतरराष्ट्रीय उत्तर दक्षिण वाहतूक मार्ग.

**प्रश्न व आव्हाने–**

१. विक्रीनंतरच्या सेवा व देखभाल यांबाबतीत रशियाच्या व्यवहारांबाबत भारतात असमाधान आहे.

२. रशियाच्या बाजूने किंमती वाढवल्या जातात व सेवा पोचवणीबाबत विलंब होतो.

३. दोन देशांमधील व्यापाराची पातळी कमी आहे– ८ अब्ज डॉलर (भारत–रशिया व्यापारामध्ये वैविध्याचा अभाव आहे आणि त्यावर मुख्यत्वे शस्त्रास्त्रांचे वर्चस्व आहे).

४. रशिया–चीन यांच्यातील वाढत्या जवळकीमुळे भारत संभ्रमात पडतो.

५. रशियाचे चिंताविषय– भारत–अमेरिका यांच्यातील वाढत्या जवळकीमुळे (क्वाड, आय२यू२) रशियात साशंकता निर्माण होते.

६. रशियाचे पाकिस्तानशी वाढत असलेले संबंध भारतासाठी चिंतेचा विषय ठरतात.

७. भारत–रशिया ऊर्जा क्षेत्रात अलीकडे दुहेरी गुंतवणुकीद्वारे सहकार्य वाढलेले दिसते, परंतु पाइपलाइनद्वारे थेट पुरवठ्यामध्ये अडचणी येतात.

८. खाजगी क्षेत्राच्या सहभागाचा अभाव आणि दळणवळणविषयक जोडणी कमकुवत असणे.

**अलीकडच्या घडामोडी–**

१. एकविसावी भारत–रशिया शिखरबैठक– दहा वर्षांच्या संरक्षणविषयक सहकार्य करारावर सह्या.

२. एस–४०० संरक्षण यंत्रणेची पोचवणी.

३. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत रशिया–युक्रेन युद्धासंदर्भातील ठरावावर मतदान झाले तेव्हा भारत अनुपस्थित राहिला.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

४. भारतीय रिझर्व बँक व बँक ऑफ रशिया यांनी सायबर हल्ल्यांना संयुक्तरित्या तोंड देण्यासाठीच्या करारावर सह्या केल्या.

**पुढील मार्गक्रमणा–**

१. द्विपक्षीय व प्रादेशिक प्रश्नांवरील सहकार्य विस्तारणे, त्यासाठी दूर पूर्वेतील प्रदेश, आर्क्टिक, मध्य आशिया, इत्यादींसारख्या सहकार्याच्या नव्या अवकाशांवर लक्ष केंद्रित करणे.

२. मेक इन इंडिया उपक्रमाद्वारे संरक्षणविषयक उत्पादनांचा संयुक्त विकास आणि शस्त्रास्त्रे व सुट्या भागांचे सहउत्पादन.

३. संयुक्त राष्ट्रे, ब्रिक्स यांखाली नियमाधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्था.

४. खाजगी क्षेत्राच्या सहभागासह व्यावसायिक क्षेत्रांचे वैविध्यीकरण साधून अधिक आर्थिक एकीकरणासाठी प्रयत्न करणे.

५. आयएनएसटीसी प्रकल्प वेगाने पूर्ण करणे.

६. तालिबानने अफगाणिस्तानचा ताबा घेतल्यानंतर भारताला अफगाणिस्तानात उपस्थिती टिकवण्याच्या अनुषंगाने रशियाशी असलेल्या संबंधांचा लाभ होईल. उदाहरणार्थ– भारत, रशिया मध्य आशियाई प्रजासत्ताक राष्ट्रे, इत्यादींमध्ये सुरू असलेल्या एनएसए पातळीवरच्या चर्चा.

७. आर्थिक सहकार्य वाढवण्याची गरज आहे– दळणवळण सुधारणे आवश्यक आहे, तसेच मुक्त व्यापारी करार, ईएईयू, इत्यादी.

भारताच्या दृष्टीने ऊर्जाविषयक आयातीसाठी मध्य पूर्वेतील राष्ट्रे हा सर्वाधिक व्यवहार्य पर्याय असला, तरी नव्याने घडणारे भूराजकारण व बदलत्या पारंपरिक आघाड्या यांमुळे भारताला स्वतःच्या भागीदारांमध्ये वैविध्य आणणे भाग पडते आहे. रशियामध्ये ऊर्जाची विपुल संसाधने आहेत, सोबतच पाश्चात्त्य तेलकंपन्या त्याच्या ऊर्जाप्रकल्पांमधून बाहेर पडत आहेत, त्यामुळे भारताला तिथे प्रचंड संधी आहे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

## भारत–आफ्रिका संबंध




**आढावा–**

आफ्रिका–भारत यांचे संबंध ऐतिहासिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक बाबतीत भारतीय व आफ्रिकी खंडाच्या पातळीवरचे आहेत.

मुख्यत्वे भारत व पूर्व आफ्रिका यांच्यात ऐतिहासिक संबंध दिसून येतात. परंतु, आधुनिक काळात, राजनैतिक व व्यापारी संबंधांच्या विस्तारानंतर आता भारताचे बहुतांश आफ्रिकी राष्ट्रांशी संबंध विकसित झाले आहेत.

मुख्यतः भारत–आफ्रिका मंच शिखरबैठकीच्या छत्राखाली सल्लामसलतीच्या व प्रतिसादाच्या प्रक्रिया उपयोगात आणून भारताचे आफ्रिकेशी असलेले संबंध पुढे गेले. या मंचाची स्थापना २००८ साली झाली, तेव्हापासून आफ्रिकी नेत्यांच्या सर्वांत मोठ्या नियमित राजनैतिक बैठकीत त्याची गणना होऊ लागली आहे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**महत्त्वाची तथ्ये–**

१. द्विपक्षीय व्यापार – ६६ अब्ज डॉलर– भारत हा आफ्रिकेचा चौथा सर्वांत मोठा व्यापारी भागीदार आहे.

२. भारत हा आफ्रिकेतील पाचवा सर्वांत मोठा गुंतवणूकदार आहे.




**आफ्रिकेचे महत्त्व–**

१. आर्थिक– आफ्रिकेतील वाढता मध्यमवर्ग ही भारतासाठी मोठी बाजारपेठ आहे.

२. भूराजकीय महत्त्व– आफ्रिकेतील ५५ देशांचे संयुक्त राष्ट्रांसारख्या जागतिक संस्थांमध्ये मोठे वजन निर्माण होते.

३. भारताला स्वतःच्या सौम्य सत्तेची चाचणी घेण्यासाठी इथे सामरिक अवकाश लाभतो.

४. ऊर्जासुरक्षा– आफ्रिकेत तेल व नैसर्गिक वायू यांची संभाव्य ठिकाणे आहेत. भारताला मध्यपूर्वेतील राजकीय अस्थैर्यापासून अंतर राखण्याकरता आफ्रिकेचा पर्याय असू शकतो.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

५. इथली लोकसंख्या वाढती असल्यामुळे तिच्यात कौशल्यवाढ केली तर तो मनुष्यबळाचा महत्त्वाचा स्त्रोत ठरू शकतो.

**प्रश्न व आव्हाने–**

१. आफ्रिकेमध्ये चीनच्या तुलनेत भारताचा आर्थिक वावर कमी आहे– चीन–आफ्रिका द्विपक्षीय व्यापार २५४ अब्ज डॉलर आहे, तर भारताचा इथला व्यापार ६६ अब्ज डॉलर आहे.

२. भारताने विकासविषयक भागीदारीअंतर्गत दिलेल्या आश्वासनांमधील प्रकल्प पूर्ण करायला विलंब होतो.

३. चीनचे स्पर्धात्मक सामर्थ्य– चीन आफ्रिका खंडाच्या सुरक्षिततेमध्ये अधिकाधिक रस घेतो आहे.

४. रवांडा, कोंगो, सोमालिया, सुदान, इत्यादींसारख्या देशांमध्ये वारंवार यादवी युद्धे होतात.

५. हवामानबदल व वाळवंटीकरण (साहेल प्रदेशाचे वाळवंटीकरण).

६. भारतातील आफ्रिकी विद्यार्थ्यांविरोधातील हिंसाचार व भेदभावाचे वाढते प्रसंग.

७. आफ्रिकी देशांमधील राज्यसंस्थेच्या कार्यक्षमतेचा व सुशासनाचा अभाव.

८. आशिया–आफ्रिका वृद्धी मार्गाची अजून परिणामकारक अंमलबजावणी झालेली नाही.

९. या खंडामध्ये पायाभूत विकासाचा व जोडणीया अभाव आहे.

**पुढील मार्गक्रमणा–**

१. भारताने व्यापारामध्ये व भागीदार देशांमध्ये वैविध्य आणण्याची गरज आहे– सध्या मुख्यत्वे पेट्रोलियम उत्पादने, एलएनजी यांचे व्यापारावर वर्चस्व आहे, आणि त्यातही नामिबिया व दक्षिण आफ्रिका यांच्याकडून भारतात उत्पादने येतात.

२. विकासप्रकल्प वेळेत पूर्ण करणे.

३. विकासस्नेही खाजगी गुंतवणुकीला चालना देणे परस्परांच्या लाभाचे ठरेल.

४. भारत व आफ्रिकी संघ यांच्यातील चर्चेला वार्षिक घटना म्हणून संस्थात्मक रूप द्यायला हवे आणि १.५ पातळीवर त्याला चालना देता येऊ शकते (म्हणजे त्यात व्यापार, विद्यापीठे व शासनाचे प्रतिनिधी यांचा समावेश करता येऊ शकतो).

**भारत–आफ्रिका संवादासाठी १० मार्गदर्शक तत्त्वे पंतप्रधान मोदींनी युगांडा दौऱ्यामध्ये आफ्रिकी राष्ट्रांसमोर मांडली–**

१. आफ्रिकी आमच्यासाठी सर्वोच्च प्राधान्यावर असेल. आम्ही आफ्रिकेसोबतचा संवाद अधिक खोलवर नेऊ. हा संवाद टिकाऊ व नियमित असेल, हे आम्ही दाखवून दिले आहे.

२. आमच्या विकासविषयक भागीदारीला तुमच्या प्राधान्यक्रमांनुसार दिशा दिली जाईल. आम्ही शक्य तितकी स्थानिक कार्यक्षमता विकसित करू आणि स्थानिक संधी निर्माण करू. तुम्हाला सोयीच्या असतील अशा शर्थींवर, तुम्हाला स्वतःचे सामर्थ्य वापरता येईल व तुमचे भविष्य मर्यादित होणार नाही, अशा रितीने हे केले जाईल.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

३. आम्ही तुमच्या बाजारपेठा खुल्या ठेवून आणि भारतासोबत व्यापार करणे सोपे व अधिक आकर्षक करू. आम्ही आमच्या उद्योगांना आफ्रिकेत गुंतवणूक करण्यासाठी पाठबळ पुरवू.

४. आफ्रिकेच्या विकासाला पाठिंबा देण्यासाठी डिजिटल क्रांतीविषयीच्या भारताच्या अनुभवाची आम्ही जोपासना करू, सार्वजनिक सेवांची पोचवणी सुधारू; आणि परिघावरील घटकांना मुख्य प्रवाहात आणू.

५. जगातील ६० टक्के सुपीक जमीन आफ्रिकेत आहे, पण जगातिल केवळ १० टक्के शेतीउत्पादन आफ्रिकेत होते. आम्ही तुमच्या सोबत काम करून आफ्रिकेतील शेती सुधारू.

६. आपल्या भागीदारीतून हवामानबदलाच्या आव्हानांवर मात करता येईल.

७. आम्ही दहशतवाद व अतिरेकी कारवाया यांच्याशी लढण्यासाठी परस्परांच्या कार्यक्षमता सुधारण्याकरता सहकार्य करू; आपला सायबर अवकाश सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्न करू; आणि शांततेला चालना देण्यासाठी संयुक्त राष्ट्रांना पाठिंबा देऊ.

८. सर्व राष्ट्रांच्या लाभासाठी महासागर खुले व स्वतंत्र ठेवण्याकरता आम्ही आफ्रिकी राष्ट्रांसोबत काम करू. जगाला आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावर आणि हिंद महासागराच्या पूर्व किनाऱ्यावर सहकार्याची व स्पर्धेची गरज आहे.

९. आफ्रिकेतील जागतिक गुंतवणूक वाढत असताना आफ्रिका हा पुन्हा एकदा प्रतिस्पर्धी महत्त्वाकांक्षांच्या संघर्षाचा मंच होऊ नये, तर आफ्रिकेतील तरुणाईच्या आकांक्षांची ती संगोपनशाळा व्हावी, यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करायला हवेत.

१०. भारत व आफ्रिका यांनी वसाहतवादाशी एकत्र लढा दिला, त्याचप्रमाणे आपण न्याय्य, प्रातिनिधिक व लोकशाही जागतिक व्यवस्थेसाठीही एकत्र काम करायला हवे. आफ्रिकेत व भारतात राहणाऱ्या एक तृतीयांश मानवतेचा आवाज या व्यवस्थेत उमटायला हवा.

**भारत–मध्य आशिया संबंध**

**आढावा–**

भारत व मध्य आशिया यांच्यात दीर्घ ऐतिहासिक, सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक संबंध असून सरत्या काळागणिक त्यांचे रूपांतर स्थिर, प्रगल्भ व परिवर्तनकारी भागीदारीमध्ये झाले आहे. कझाखस्तान, किर्गिझिस्तान, ताजिकिस्तान, तुर्कमेनिस्तान व उझबेकिस्तान या पाच मध्य आशियाई देशांसोबत भारताची जवळीक वाढते आहे. कोव्हिड–१९ची जागतिक साथ व बदलती जागतिक व्यवस्था या पार्श्वभूमीवर समोर येणाऱ्या भूसामरिक आव्हानांना सामोरे जाताना त्यांच्यातील वाढलेल्या सहकार्यात याचे प्रतिबिंब उमटल्याचे दिसते. व्यापार व जोडणी, आर्थिक विकास, विकासात्मक भागीदारी, ऊर्जासुरक्षा, परस्परांच्या हिताचे प्रादेशिक प्रश्न, तसेच अफगाणिस्तानातील वाढत्या आव्हानांच्या पार्शअवभूमीवर दोन्ही बाजूंना जाणवणाऱ्या भूराजकीय चिंता, यांबाबतीत भारत व मध्य आशिया यांच्यात विमर्श होतो आहे व सहकार्यसुद्धा होते आहे.

अलीकडे, १९ डिसेंबर २०२१ रोजी नवी दिल्ली तिसरी भारत–मध्य आशिया चर्चा पार पडली. तेव्हा दोन्ही बाजूंनी नवनवीन जागतिक चिंताविषयांवर उपाय करण्यासाठी कणखर सहकार्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला, तसेच भारत–मध्य आशिया इथल्या भूराजकीय स्थापत्यामध्ये सुरक्षितता, स्थैर्य व दीर्घकालीन सामायिक आर्थिक संपन्नता यांना चालना देण्याची निकडही व्यक्त करण्यात आली.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**महत्त्वाची तथ्ये**

१. भारताचा मध्य आशियासोबतचा द्विपक्षीय व्यापार– २ अब्ज डॉलर.

२. आयएनएसटीसी मध्य आशियातून जातो.

३. मध्य आशियात जगातील तिसरे सर्वांत मोठे वायूचे व तेलाचे साठे आहेत.

**भारतासाठी मध्य आशियाचे महत्त्व–**

१. भूसामरिक महत्त्व– हा प्रदेश मध्यपूर्व आशिया, रशिया, यांसारख्या धगधगत्या प्रदेशांच्या छेदनबिंदूवर आहे.

२. ऊर्जासुरक्षा– मध्य आशियात हायड्रोकार्बनची संपन्न संसाधने आहेत.

३. अफगाणिस्तानवर तालिबानने ताबा मिळवल्यामुळे भारतासाठी मध्य आशिया अतिशय महत्त्वाचा झाला आहे.

४. भारतातून होणाऱ्या निर्यातीच्या दृष्टिकोनातून या प्रदेशाचे सामर्थ्य मोठे आहे (आयटी सेवेची निर्यात करता येईल).






Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**प्रश्न व आव्हाने–**

१. जोडणी– भारताची या प्रदेशाशी थेट जोडणी नाही. तालिबानने अफगाणिस्तान ताब्यात घेतल्यामुळे जोडणीची समस्या आणखी अवघड झाली आहे.

२. भारताचा या प्रदेशासोबतचा व्यापार खूप कमी आहे (भारताच्या एकूण व्यापारातील ०.५ टक्के, तर दुसऱ्या बाजूला चीनचा या प्रदेशासोबतचा व्यापार १०० अब्ज डॉलर इतका आहे). व्यापारविषयक संभाव्यतांचा शोध घेतला गेलेला नाही.

३. या प्रदेशात बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्हद्वारे चीनची उपस्थिती व संवाद वाढतो आहे.

४. अमेरिकेने निर्बंध लादल्यामुळे चाबहार बंदराचा विकास खुंटला, आणि त्यामुळे आयएनएसटीसी प्रकल्प पूर्णत्वास गेलेला नाही.

५. अंतर्गत प्रश्न– शासनव्यवहाराच्या समस्या व देशादेशांमधील वाद.

**भारताने मध्य आशियाशी संबंध बळकट करण्यासाठी उचललेली महत्त्वाची पावले–**

१. मध्य आशियाशी जोडून घेण्याचे धोरण.

२. आंतरराष्ट्रीय उत्तर–दक्षिण वाहतूक मार्ग.

३. चाबहार बंदराचा विकास.

४. अश्गबात करार.

५. तापी गॅस पाइपलाइन प्रकल्प.

**पुढील मार्गक्रमणा–**

१. युरेशियन आर्थिक संघासोबत मुक्त व्यापारी कराराला अंतिम रूप देऊन आर्थिक व्यापाराला चालना देणे.

२. भारताने प्रादेशिक उपस्थिती वाढवण्यासाठी अधिक जोरकस प्रयत्न करायला हवेत. चीनच्या बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्हच्या संदर्भात हे अधिक महत्त्वाचे आहेत, कारण यातील सहा मार्गांपैकी दोन मार्ग मध्य आशियातून जाणारे आहेत.

३. भारताने या प्रदेशाला अधिक विकासविषयक व मानवतावादी सहकार्य करायला हवे आणि शिक्षण, ज्ञानाचे हस्तांतरण, औषधे व आरोग्य, संस्कृती, खाद्यपदार्थ व पर्यटन यांबाबतीत लोका–लोकांमधील संबंधांना चालना द्यायला हवी.

४. भारताने एससीओ, ईएईयू, इत्यादींसारख्या बहुराष्ट्रीय संघटनांद्वारे या प्रदेशात अधिक सक्रिय गुंतवणूक करायला हवी.

५. चाबहार बंदर व आयएनएसटीसी यांसारखे जोडणीप्रकल्प वेगाने पूर्ण करणे.

६. वाणिज्य, क्षमतावृद्धी, जोडणी व संपर्क यांच्यावर काम करण्याची गरज असल्याचे भारत–मध्य आशिया चर्चेदरम्यान अधोरेखित करण्यात आले.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**भारत–पश्चिम आशिया संबंध**

**आढावा–**

भारताचे पारंपरिकरित्या अरब देशांशी जवळचे व मैत्रीपूर्ण संबंध राहिले आहेत. हे संबंध प्राचीन काळापर्यंत मागे जाणारे आहेत. ओमान ते इजिप्त व सुदान आणि त्या पलीकडेही अनेक देशांमध्ये भारताने महत्त्वाची गुंतवणूक केली आहे. इतिहासात कायमच या प्रदेशाशी भारताचे सांस्कृतिक संबंध राहिले आहेत. बहुतांश बाह्य व्यापार सुएझ कालवा, लाल समुद्र व एडनच्या आखातातून होतो. भारताने पॅलेस्टाइनच्या उद्दिष्टाला कट्टर समर्थन दिले आहे, तसेच आंतरराष्ट्रीय विकासाविषयीची एकसारखी मते आणि आर्थिक व व्यापारी संबंध, हे भारत–अरब संबंधांचे पायाभूत घटक आहेत.

अरब लीगसोबत भारताचे संस्थात्मक संबंध असल्यामुळे अरब देशांसोबतचे संबंधही आणखी वृद्धिंगत झाले आहेत आणि अरब लीग व भारत यांच्यात अलीकडच्या वर्षांत झालेल्या देवाणघेवाणीतून या दाखला मिळतो.

**महत्त्वाची तथ्ये–**

१. भारत व अरब देशांमधील व्यापार २०२१ साली १७५ अब्ज डॉलरांपलीकडे गेला.

२. अरब देशांमधील भारतीय– ९० लाख.

३. संयुक्त अरब अमिरातीसोबत सीईपीए.






Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**भारतासाठी पश्चिम आशियाचे महत्त्व–**

१. ऊर्जासुरक्षा– भारताची कच्च्या तेलाची ६० टक्के आयात व एलएनजीची ८५ टक्के आयात पश्चिम आशिया व उत्तर आफ्रिकेतून होते.

२. निर्यातीसाठी प्रचंड मोठी बाजारपेठ.

३. दुसरा सर्वांत मोठा वित्तप्रेषणाचा स्त्रोत– ५० अब्ज डॉलर.

४. या देशांमधील भारतीयांचा प्रचंड संपर्क– यांमुळे हे संबंध आणखी एकात्मिक होतात.

५. सामरिक महत्त्व– चाबहार बंदर, भारताच्या आयात–निर्यातीमधील सुरक्षितता.

**सहकार्यासाठी नवीन गतिमानता–**

१. संरक्षण व सुरक्षाविषयक सहकार्य– इस्राएल (आय२यू२).

२. आखादी देशांसोबत दहशतवादविरोधी सहकार्याचा विस्तार.

३. या देशांमध्ये राहणाऱ्या भारतीयांचे कल्याण– भारताच्या पूर्वीपासूनच्या चिंतांवर उपाय करायला आखाती राजवटींनी सुरुवात केली आहे.

४. सांस्कृतिक व लोका–लोकांमधील संबंध– अलीकडे संयुक्त अरब अमिरातीने हिंदीला तिथल्या न्यायालयीन कामकाजाची एक भाषा म्हणून दर्जा दिला.

५. ऊर्जा क्षेत्रातील भागीदारी–आराम्कोने आरआयएलमध्ये २० टक्के वाटा विकत घेतला आहे.

**या प्रदेशातील भूराजकारणाला आकार देणारे ऐतिहासिक घटक–**

१. अरब पॅलेस्टाइन राज्यक्षेत्रातून इस्राएल हा ज्यू देश निर्माण केल्यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात अरब–इस्राएल शत्रुत्वाला तोंड फुटले.

२. शिया–सुन्नी वैरभावामुळे अरब–इराण यांच्यातही शत्रुत्व आहे आणि या प्रदेशातील मुस्लीम देशांमधील प्रादेशिक प्रबुत्वसत्तेसाठीच्या स्पर्धेतही त्यांचा सहभाग आहे.

३. इस्राएल–इराण यांच्यातील शत्रुत्व १९७९ साली इराणी क्रांतीनंतर सुरू झाले आणि इराणच्या आण्विक कार्यक्रमामुळे ते वाढतेच आहे.

**प्रश्न व आव्हाने–**

१. अमेरिकेचा घटता प्रभाव व चीनचा वाढता प्रभाव यांमुळे या प्रदेशातील सत्तासमतोल बदलतो आहे– चीन–इराण यांच्यात २५ वर्षांची सामरिक भागीदारी प्रत्यक्षात आली आहे.

२. भारताचा सार्वभौम मालमत्ता निधीमधील वाटा केवळ ०.५ टक्के आहे.

३. पायाभूत प्रकल्पांमध्ये भारताचा वाटा नगण्य आहे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

४. भारत या प्रदेशातील तेलाचा दुसरा सर्वांत मोठा खरेदीदार असला तरी वायू क्षेत्रातील मालमत्तांमध्ये भारताची उपस्थिती नाममात्र आहे.

५. पश्चिम आशियातील दोन भागांमध्ये वाढते धृवीकरण होत असून भारताचे या दोन्ही भागांशी जवळचे संबंध आहेत. यात एका बाजूला इस्राएल, सौदी व संयुक्त अरब अमिराती आहेत, तर दुसऱ्या बाजूला इराण आहे.

६. इराणने सिरियाच्या प्रश्नावरून रशिया व तुर्कस्तान यांच्या चर्चेचे यजमानपद सांभाळले. रशिया–तुर्कस्तान संबंध सुरळीत झाल्यामुळेही भारताच्या अडचणी वाढल्या आहेत, कारण पाकिस्तान व काश्मीरच्या प्रश्नावरून तुर्कस्तानासोबतच्या भारताच्या संबंधांमध्ये ताण आला आहे.

७. या प्रदेशातील बहुतांश देश ओआयसीचे सदस्य आहे, आणि ही संघटना वेळोवेळी काश्मीरचा प्रश्न उपस्थित करत असते.

**मध्यपूर्वेतील सामरिक प्रांत–**




**अलीकडच्या घडामोडी–**

१. आय२यू२ची स्थापना.

२. संयुक्त अरब अमिराती, ब्रिटन यांनी अब्राहम कराराद्वारे इस्राएलसोबतचे संबंध सुरळीत केले.

३. अमेरिकेच्या मनोवृत्तीत झालेला बदल– आधी अमेरिका सौदी अरेबियाच्या बाजूचा होता, पण आता तो येमेनमधील



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

पेच सोडवण्याला पसंती देतो.

४. संयुक्त अरब अमिरातीमधील बरकाह आण्विक ऊर्जाप्रकल्प हे अरबी द्विपकल्पामधील पहिले आण्विक ऊर्जा स्थानक आहे, पर्शियन आखाती प्रदेशातील दुसरे व अरब जगतामधील पहिले व्यापारी आण्विक ऊर्जा स्थानक आहे.

**संधी व पुढील मार्गक्रमणा–**

१. आखाती साम्राज्यातील अंतर्गत गतिमानतेकडे अधिक लक्ष देणे– दिल्लीने या प्रदेशाच्या सुधारणा कार्यक्रमाला पाठबळ पुरवायला हवे (अरब समाजांच्या आधुनिकीकरणाला व स्थैर्यकरणाला पाठिंबा द्यायला हवा).

२. भारताने सकारात्मक सुधारणांना सक्षम जनमताचा पाठिंबा द्यायला हवा. यातून भारताचे वजन वाढेल.

३. इराण, सौदी व इस्राएल यांच्याबाबतीत सामरिक भागीदाराचा पाठपुरावा करणे आणि शाश्वत ऊर्जाविषयक मुत्सद्देगिरी करणे.

४. उच्चतंत्रज्ञानीय आर्थिक एकीकरणाच्या दिशेने संबंधांमध्ये वैविध्य आणणे– ऊर्जा, डिजिटल अभिनवता, शस्त्रास्त्र उत्पादन, अंतराळ तंत्रज्ञान, इत्यादी.

५. भारताने या प्रदेशातील अस्थैर्याचा व वैरभावी परिस्थितीचा विचार करून पर्यायी ऊर्जास्त्रोतांचा शोध घ्यायला हवा.

**भारत– पॅसिफिक प्रदेश व क्वाड**

**आढावा–**

हिंद–पॅसिफिक प्रदेश हा हिंद महासागरापासून पॅसिफिक महासागरापर्यंत पसरलेला प्रांत आहे. अमेरिकेच्या पश्चिम किनारपट्टीपासून भारताच्या पश्चिम किनारपट्टीत असणाऱ्या हिंद–पॅसिफिक प्रदेशात २४ राष्ट्रे येतात. हिंद महासागराच्या उष्णकटिबंधीय प्रवाहांस पाश्चात्त्य व मध्य पॅसिफिक महासागर आणि समुद्र यांद्वारे हे दोन भाग इंडोनेशियाजवळ एकमेकांना जोडले जातात.

२०११ सालापासून 'हिंद–पॅसिफिक' ही संज्ञा जागतिक सामरिक/भूराजकीय संभाषितामध्ये अधिकाधिक वापरली जाऊ लागली. हिंद–पॅसिफिक ही चौकट परस्परांना जोडलेला बहुधृवीय प्रदेश निर्माण करू पाहते आणि सर्वसंमत आंतरराष्ट्रीय प्रमाणके, नियम व आचार यांद्वारे त्याचे नियमन व्हावे असे मान्य करते. 'हिंद–पॅसिफिक' ही संज्ञा हिंद महासागरापासून पूर्व आशियातील किनारे, तिथपासून ते पश्चिमेकडील पॅसिफिक महासागर इथपर्यंतचा समुद्री अवकाश सामावणारी आहे.

**हिंद–पॅसिफिक प्रदेशातील देश–**

ऑस्ट्रेलिया, बांग्लादेश, भूतान, ब्रुनेई, कंबोडिया, फिजी, भारत, इंडोनेशिया, जपान, लाओस, मलेशिया, मालदीव, म्यानमार, नेपाळ, न्यूझिलंड, पापुआ न्यू गिनी, फिलिपाइन्स, सिंगापूर, श्रीलंका, तैवान, थायलंड, तिमोर लेस्ते, अमेरिका, व्हिएतनाम.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**क्वाड–**

'क्वाड्रिलॅटरल सिक्युरिटी डायलॉग' (क्वाड) हा अमेरिका, भारत, ऑस्ट्रेलिया व जपान या चार राष्ट्रांचा अनौपचारिक सामरिक मंच आहे. मुक्त, खुल्या, संपन्न व समावेशक हिंद–पॅसिफिक प्रदेशासाठी काम करणे, हे क्वाडचे एक प्राथमिक उद्दिष्ट आहे.

या गटाची पहिली बैठक २००७ साली 'असोसिएशन ऑफ साउथईस्ट एशियन नेशन्स' (आसिआन) या संस्थेच्या अधिवेशनावेळी झाली. ही समुद्री लोकशाही देशांची आघाडी मानली जाते, आणि माहितीची देवाणघेवाण, निम–नियमित शिखरबैठका, सैनिकी कवायती यांद्वारे हा मंच टिकवला जातो.






Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**महत्त्वाची तथ्ये–**

१. हिंद–पॅसिफिक प्रदेशातून जागतिक जीडीपीमधील ६३ टक्के वाटा येतो.

२. जागतिक समुद्री व्यापारातील ५० टक्के व्यापार हिंद–पॅसिफिक प्रदेशातून होतो.

३. नैसर्गिक संसाधनांची संपन्नता.

४. जगातील ६० टक्के लोकसंख्या इथे राहते.

**हिंद–पॅसिफिक प्रदेशासाठी भारताची योजना–**

भआरताने मुक्त, खुल्या, समावेशक, शांततापूर्ण व संपन्न हिंद–पॅसिफिक प्रदेशाची कल्पना केली आहे. या प्रदेशात नियमाधारित व्यवस्था असावी आणि शाश्वत व पारदर्शक पायाभूत गुंतवणूक व्हावी, अशी भारताची अपेक्षा आहे.

या प्रदेशातून समुद्री व हवाई प्रवाहासाचे स्वातंत्र्य असावे, कायदेशीर व्यापारात अडथळा येऊ नये, परस्परांच्या सार्वभौमत्वाचा सर्वांनी आदर करावा, वाद शांततापूर्ण रितीने सोडवावेत आणि राष्ट्रा–राष्ट्रांमध्ये समता असावी.

भारताची हिंद–पॅसिफिक प्रदेशासासाठीची योजना सकारात्मक व सर्व राष्ट्रांसाठी समावेशक आहे– या भूगोलातील राष्ट्रांसोबतच इथे हितसंबंध गुंतलेल्या राष्ट्रांचाही यात समावेश होतो.

पंतप्रधानांनी ‘इंडो–पॅसिफिक ओशन्स इनिशिएटिव्ह’मध्ये हिंद–पॅसिफिक समुद्री भूगोलाचे सात स्तंभ कल्पिले आहेत– समुद्री सुरक्षेची परिसंस्था व संसाधने; क्षमतावृद्धी; आपत्तीची जोखीम कमी करणे व आपत्ती व्यवस्थापन; एस अँड टी व अकादमिक सहकार्य; व्यापार, जोडणी व समुद्री सुरक्षा.



**हिंद–पॅसिफिक व क्वाडचे महत्त्व–**

१. समुद्री सुरक्षितता व सहकार्य– सागर अभियान.

२. आयओआरए, ईएएस, एमजीसी कॉरडॉर, एडीएमएम+, इत्यादी प्रादेशिक गटांमधील भारताचा सक्रिय सहभाग.

३. नियमाधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्था, मुक्त व खुला हिंद–पॅसिफिक प्रदेश अत्यंत महत्त्वाचा आहे, आणि क्वाडद्वारे त्यावर उपाय केला जाईल.

४. सागरमाला कार्यक्रम, बिम्स्टेक यांद्वारे जोडणी.

५. हिंद–पॅसिफिक प्रदेशातील चीनच्या उदयाचा प्रतिकार करण्यात आणि या प्रदेशातील वाहतुकीच्या स्वातंत्र्याची तजवीज करण्यात क्वाडची कळीची भूमिका असेल.

६. भारताचे राष्ट्रीय समुद्री हितसंबंध हिंद–पॅसिफिक प्रदेशाशी जोडलेले आहेत आणि यामध्ये क्वाडची महत्त्वाची भूमिका असणार आहे.

**प्रश्न आणि आव्हाने**

१. हिंद–पॅसिफिक प्रदेशातील चीनचा वाढता वावर– स्ट्रिंग ऑफ पर्ल्स.

२. रशिया व चीन क्वाडला आशियाई नाटो मानतात. याचा भारताच्या त्यांच्यासोबतच्या द्विपक्षीय संबंधांवर परिणाम होऊ शकतो.

३. परराष्ट्र मंत्रालयाच्या हिंद–पॅसिफिक विभागाचे संरक्षण मंत्रालयासोबत संयोजन करण्यातील आव्हाने.

४. भारताची मर्यादित नाविकी क्षमता व कमी सैनिकी व्यापार.

५. क्वाडच्या सदस्यांमध्ये हिंद–पॅसिफिकच्या भवितव्याविषयी भिन्न आकलने आहेत– निर्णायक सर्वानुमतीचा अभाव आणि अग्रक्रमातील भिन्नत्व.

६. भारताचे या प्रदेशासोबत कमी आर्थिक एकीकरण झाले आहे– आरसीईपीपासून भारताने पूर्ण अंतर राखले आहे.

७. खंडी व समुद्री व्यूहरचनेत समतोल साधण्यामधील आव्हाने.

**अलीकडच्या घडामोडी–**

१. एयूकेयूएसची स्थापना.

२. आयपीईएफ– इंडो–पॅसिफिक इकनॉमिक फ्रेमवर्क फॉर इकनॉमिक प्रॉस्पॅरिटी.

३. सप्लाय चेन रेसिलियन्ट इनिशिएटिव्ह (भारत, जपान, ऑस्ट्रेलिया).

**पुढील मार्गक्रमणा–**

१. हिंद–पॅसिफिक विभागाच्या प्रस्थापित स्थापत्याला बळकटी देणे व त्याला परिणामकारक दिशा देणे, सागर, इत्यादी.

२. 'पूर्वेकडे दृष्टी' धोरणामध्ये सामरिक सुसंगती आणणे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

३. प्रादेशिक हिंद–पॅसिफिक दृष्टियोजनेमध्ये स्पष्टता आणणे.

४. या देशांसाठी भारत प्रमुख आर्थिक भागीदार ठरला नाही तर हिंद–पॅसिफिक प्रदेशातील भारताची भूमिका मर्यादित राहील.

५. क्वाडचा विस्तार– भारताने इंडोनेशिया व सिंगापूर यांसारख्या देशांना भविष्यात क्वाडमध्ये दाखल होण्यासाठी निमंत्रित करायला हवे.

६. समुद्री तत्त्वाची गरज– सैनिकी व बिगरसैनिकी सामग्री गोळा करणे, सामरिक भागीदारांशी संवाद साधणे.

७. विकासात्मक भागीदारीमध्ये संयुक्त सहकार्य– क्विक इम्पॅक्ट प्रोजेक्ट, २+१ मेकॅनिझम.

***

PRAYAAS INSTITUTE OF EXCELLENCE



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

## अभ्यासक्रमातील विषय– परदेशस्थ भारतीय

**या विषयावरील गेल्या वर्षांमधील प्रश्न पाहू**

| प्रश्न | कळीचे शब्द/मागणी | विषयसूत्र |
|---|---|---|
| 'Indian diaspora has a decisive role to play in the politics and economy of America and European Countries'. Comment with examples. (2020) | परदेशस्थ भारतीयांची भूमिका | समकालीन चालू घडामोडी |
| The Indian Diaspora has an important role to play in South East Asian countries economy and society. Appraise the role of Indian Diaspora in South-East Asia in this context. (2017) | परदेशस्थ भारतीयांची भूमिका | समकालीन चालू घडामोडी |

इथे या दोन प्रश्नांमध्ये मुख्यत्वे परदेशस्थ भारतीयांनी निभावलेल्या भूमिकेवर लक्ष केंद्रित केले आहे.

**परदेशस्थ समूहसदस्य (डायस्पोरा)**

- विशिष्ट ठिकाणी मूळ असणाऱ्या एखाद्या वांशिक (एथ्निक) किंवा धार्मिक समूहाचे विभिन्न ठिकाणी जाऊन स्थायिक झालेले सदस्य.
- मूळ भौगोलिक स्थानापासून वेगळ्या असणाऱ्या प्रदेशांमध्ये विखुरलेले विशिष्ट समूहाचे सदस्य.

**परदेशस्थ भारतीय**

- परदेशस्थ भारतीय लोक जगभरात पसरलेले आहेत. भारताच्या विकासामध्ये या परदेशस्थ समूहसदस्यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका निभावली आहे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421




Source: **UN Population Division;** Research: **Atul Thakur**

**परदेशस्थ भारतीयांचे महत्त्व–**

१. ते सौम्य सत्ता म्हणून कार्यरत असतात आणि प्रतिमानिर्मितीमध्ये त्यांची भूमिका महत्त्वाची असते.

२. भारताच्या हितासाठी पाठपुरावा करणे– १२३ करार.

३. आर्थिक योगदान– जागतिक बँकेच्या अहवालानुसार, परदेशातून आर्थिक प्राप्ती होणाऱ्या देशांमध्ये भारताचा अग्रक्रम आहे– परदेशस्थ भारतीय दर वर्षी ८७ अब्ज डॉलर भारतात पाठवतात.

४. दबावगट– परदेशस्थ भारतीय दबावगट म्हणून कार्यरत असतात. त्यामुळे अनेकदा ते राहत असलेल्या देशाची धोरणे भारताला लाभदायक ठरतील अशा दिशेने तयार केली जातात.

५. बदलाचे कर्ते– गुंतवणुकीला सुकरता मिळवून देतात आणि लोकांच्या पातळीवरील देवाणघेवाणीला चालना देतात.

६. राजकीय सत्ता– उदाहरणार्थ, ऋषी सुनक, आलोक शर्मा.

७. प्रभावशाली पदांवरील परदेशस्थ भारतीय– गुगलचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुंदर पिचाई.

८. यजमान देशाचा विकास– उदाहरणार्थ, सिलिकॉन व्हॅली.

**१. मध्य–पूर्व**

- आर्थिक मंदी व ऑटोमेशनच्या वाढत्या कलामुळे नोकऱ्यांमध्ये कपात झाली.
- शोषणकारी कफाला व्यवस्था.
- कट्टरतावादी गटांमुळे सुरक्षेचा प्रश्न.
- नितगत कायदा– मोठ्या परदेशी श्रमिक लोकसंख्येच्या जागी सौदी लोकांना नोकरी देण्याचे उद्दिष्ट.

**२. उत्तर अमेरिका व युरोप**

- वांशिक (रेशिअल) भेदभाव.
- ब्रेक्झिटनंतर व्हिसाचे कडक झालेले नियम.
- दुहेरी नागरिकत्वाच्या मागण्या.

**३. सर्वसाधारण प्रश्न**

- कामाची विपरित परिस्थिती, सामाजिक सुरक्षेचा अभाव, कंत्राटाच्या अटींचा भंग, इत्यादी.

**पुढील मार्गक्रमणा**

१. यजमान देशांसोबत प्रमाणित श्रम निर्यात कराराबाबत वाटाघाटी करणे.

२. भारतीय दूतावासांना परदेशस्थ भारतीयांच्या वेळोवेळी संपर्कात राहणे.

३. परदेशातील भारतीय कर्मचाऱ्यांना विमा योजनांच्या कक्षेत आणणे.

४. भारतीय मूळ असलेल्या व्यक्तींसाठी विशेष आर्थिक क्षेत्रे स्थापन करणे.

**परदेशस्थ भारतीयांसाठी सरकारी उपक्रम–**

१. पंतप्रधानांची परदेशस्थ भारतीयांसाठीची जागतिक सल्लागार परिषद– भारत सरकारने जगभरात विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या विख्यात मूळ भारतीय लोकांच्या अनुभवाचा व ज्ञानाचा लाभ घेण्यासाठी पंतप्रधानांची परदेशस्थ भारतीयांसाठीची जागतिक सल्लागार परिषद स्थापन केली आहे.

२. परदेशस्थ भारतीय नागरिकत्व योजना– 'नागरिकत्व अधिनियम, १९५५'मध्ये दुरुस्ती करून जानेवारी २००६मध्ये परदेशस्थ भारतीय नागरिकत्व योजना औपचारिकरित्या सुरू करण्यात आली. मूळ भारतीय लोकांना आयुष्यभर भारतात व्हिसाविना प्रवास करता यावा आणि काही आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक लाभ मिळावेत, हा त्यामागील उद्देश आहे.

३. प्रवासी भारतीय दिवसाचे आयोजन.

४. परदेशस्थ भारतीयांच्या कामकाजासाठी स्वतंत्र मंत्रालय.

***



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

# अभ्यासक्रमातील विषय– भारताचा सहभाग असणारे व भारताच्या हितसंबंधंवर परिणाम करणारे द्विपक्षीय, प्रादेशिक व जागतिक गट आणि करार.

**संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतील सुधारणा आणि भारत**

संयुक्त राष्ट्रांची सुरक्षा परिषद ही संयुक्त राष्ट्रांच्या सहा प्रमुख शाखांपैकी एक आहे आणि आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता राखण्याची जबाबदारी तिच्यावर आहे, तसेच संयुक्त राष्ट्रांमध्ये नवीन सदस्यांच्या प्रवेशाबाबत सर्वसाधारण सभेला शिफार करणे, आणि संयुक्त राष्ट्रांच्या सनदेतील बदलांना मंजुरी देणे, हे काम याच परिषदेकडे असते. शांतताप्रस्थापनेच्या मोहिमा सुरू करणे, आंतरराष्ट्रीय निर्बंध लादणे आणि सैनिकी कारवाईचा अधिकृत निर्णय घेणे, आदी अधिकार सुरक्षा परिषदेकडे असतात. सदस्यदेशांना बंधनकारक ठरतील असे ठराव मांडायचा अधिकार संयुक्त राष्ट्रांमध्ये केवळ सुरक्षा परिषदेकडे असतो.

सुरक्षा परिषदेमध्ये पंधरा सदस्य आहेत, त्यातील पाच कायमस्वरूपी सदस्य आहेत– चीन, फ्रान्स, सोव्हिएत संघ, युनायटेड किंगडम व अमेरिका. दुसऱ्या महायुद्धात विजयी झालेल्या या महासत्ता आहेत (किंवा त्यांच्या उत्तराधिकारी राज्यसंस्था या ठिकाणी आहेत). सुरक्षा परिषदेतील कोणत्याही भरीव ठरावाविरोधात नकाराधिकार वापरणे (तो ठराव रोखणे) कायमस्वरूपी सदस्यांना शक्य असते. नवीन सदस्यदेशांना संयुक्त राष्ट्रांमध्ये प्रवेश देणे किंवा सरचिटणीसांच्या पदासाठीची नामांकने, अशा वेळी हा नकाराधिकार वापरता येतो. कोणत्याही सर्वसाधारण सभेमध्ये किंवा सर्वसाधारण सभेच्या आणीबाणीच्या विशेष अधिवेशनांमध्ये हा नकाराधिकार लागू होत नाही. इतर दहा सदस्यांची निवड प्रादेशिक आधारावर दोन वर्षांच्या कार्यकाळासाठी होते.

सध्या संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेचे अध्यक्षपद भारताकडे आहे.

**संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतील सुधारणांच्या  बाजूने केले जाणारे युक्तिवाद–**

१. भूराजकीय परिस्थितीमधील बदल– संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतील सध्याच्या संरचनेमध्ये दुसऱ्या महायुद्धानंतरच्या भूराजकीय परिस्थितीचे प्रतिबिंब उमटले आहे, पण गेल्या काही वर्षांमध्ये या परिस्थितीत मोठा बदल झाला आहे.

२. सुरक्षा परिषदेचा विस्तार एकदाच– १९६३मध्ये करण्यात आला. त्या वेळी चार कायमस्वरूपी नसलेल्या सदस्यांचा समावेश त्यात करणअयात आला. त्यानंतर संयुक्त राष्ट्रांच्या सदस्यसंख्येमध्ये वाढ झाली असली तरी सुरक्षा परिषदेमध्ये कोणतीही सुधारणा झालेली नाही.

३. विषम प्रतिनिधित्व– या परिषदेमध्ये युरोपाचे अतिरिक्त प्रतिनिधित्व आहे, तर आशियाचे अल्प प्रतिनिधित्व आहे. दुसऱ्या बाजूला, दक्षिण अमेरिका व आफ्रिका यांचे सुरक्षा परिषदेमध्ये काहीही प्रतिनिधित्व नाही.

४. उत्तर गोलार्ध व दक्षिण गोलार्ध यांमधील मोठी तफावत.

५. सुधारणांच्या अभावी निर्णयप्रक्रिया इतर बहुराष्ट्रीय मंचांच्या दिशेने जाण्याचा धोका आहे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421




Source: Ministry of Foreign Affairs, Japan

**एकंदर उद्दिष्ट–**

**अधिक परिणामकारक सुरक्षा परिषदेसाठी पुढील उद्दिष्टे साधावी लागतील**

- जगातील समकालीन भूराजकीय वास्तवाचे अधिक प्रतिबिंब उमटायला हवे.
- अधिक प्रतिनिधित्व दिसायला हवे.
- अधिक लोकशाही असायला हवी (निर्णयप्रक्रिया अधिक समावेश व सहभागाधारित असावी).
- सदस्यांमध्ये प्रादेशिक सत्तांचा समावेश असेल तर परिषद अधिक सक्षम होईल.

**संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेमधील अपेक्षित सुधारणा–**

१. सुरक्षा परिषदेची सदस्यसंख्या वाढवणे.

२. नकाराधिकाराचा पुनर्विचार करणे.

३. निर्णयप्रक्रियेमध्ये अधिक पारदर्शकता आणणे.

४. सुरक्षा परिषद अधिक प्रातिनिधिक व वैविध्यपूर्ण करणे.

५. सुरक्षा परिषद व संयुक्त राष्ट्रांची सर्वसाधारण सभा यांच्यात अधिक संयोजन आणणे व त्यांचे संबंध सुधारणे.

**संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतील सुधारणांबाबतची आव्हाने–**

१. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेमध्ये सुधारणा करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत दुरुस्ती करणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्वसाधारण सभेतील दोन तृतीयांश बहुमत व सुरक्षा परिषदेतील दोन तृतीयांश बहुमत लागेल, आणि ही



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

प्रक्रिया खूप अवघड आहे.

२. सुरक्षा परिषदेतील कायमस्वरूपी सदस्य या परिषदेतील सुधारणांसाठी फारसे तयार नाहीत.

३. परस्परांना होणारा विरोध. उदाहरणार्थ, सुरक्षा परिषदेतील भारताला सदस्यत्व देण्याला पाकिस्तान व चीन यांचा विरोध आहे, जपानच्या सदस्यत्वाला चीनचा विरोध आहे, तर ब्राझीलला सदस्यत्व देण्याला अर्जेन्टिनाचा विरोध आहे, इत्यादी.

४. सर्वानुमतीसाठी एकत्र (कॉफी क्लब) आलेल्या देशांनी संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतील सुधारणा रोखून धरल्या आहेत.

तर, एकंदरित सर्वानुमतीचा अभाव हा संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेमध्ये सुधारणा घडवण्याच्या मार्गातील सर्वांत मोठा अडथला आहे.

**सुरक्षा परिषदेमध्ये भारताला कायमस्वरूपी सदस्यत्व मिळण्याच्या बाजूने केला जाणारा युक्तिवाद–**

१. जगातील एक षष्ठांश लोकसंख्या असलेल्या भारतात चैतन्यशील लोकशाही आहे.

२. नामित सकल घरेलू उत्पन्नाच्या (नॉमिनल जीडीपी) संदर्भात भारत जगातील पाचवी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था आहे आणि क्रयशक्ती तुल्यतेच्या संदर्भात भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची सर्वांत मोठी अर्थव्यवस्था आहे.

३. जबाबदार आण्विक सत्ता.

४. सैनिकी खर्चाच्या बाबतीत अमेरिका व चीन यांच्यानंतर भारताचा तिसरा क्रमांक लागतो.

५. संयुक्त राष्ट्रांच्या शांतताप्रस्थआपना दलामध्ये सर्वाधिक योगदान देणाऱ्यांमध्ये भारताचा समावेश होतो.

६. हवामानबदलासारख्या जागतिक कामकाजात भारताचा सक्रिय सहभाग असतो.

समकालीन जागतिक वास्तवानुरूप संयुक्त राष्ट्रांमध्ये बदल करण्यासाठी आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता यांसाठीची प्रमुख शाखा असणाऱ्या सुरक्षा परिषदेमध्ये तातडीची व सर्वांगीण सुधारणा गरजेची आहे, असे आम्ही पुन्हा निक्षून सांगतो आहोत.

- परराष्ट्र कामकाज मंत्री एस. जयशंकर

सुधारणा अवघड असल्या व त्यात अनेक आव्हाने असली तरी पी–५ सदस्यांसोबत भारतानेही संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतील सुधारणांसाठी जोरकसपणे पाठपुरावा करायला हवा.

***



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

# जागतिक गट
# बिम्स्टेक

**आढावा–**

'बे ऑफ बंगाल इनिशिएटिव्ह फॉर मल्टिसेक्टोरल टेक्निकल अँड इकनॉमिक कोऑपरेशन (बिम्सटेक) या प्रादेशिक संघटनेमध्ये बंगाली उपसागराच्या प्रदेशातील सात देशांचा सदस्य म्हणून समावेश आहे. बिम्स्टेकमध्ये दक्षिण आशियातील पाच सदस्य (बांग्लादेश, भूतान, भारत, नेपाळ व श्रीलंका) आणि आग्नेय आशियातील दोन सदस्य (म्यानमार व थायलंड) यांचा समावेश असल्यामुळे दक्षिण व आग्नेय आशिया यांच्यातील अनन्य दुवा म्हणून ही संघटना कार्यरत आहे.

ही संघटना 'बँकॉक घोषणापत्रा'द्वारे ६ जून १९९७ रोजी अस्तित्वात आली. सुरुवातीला चार सदस्य देशांसह या आर्थिक गटाची स्थापना झाली आणि त्याला संबंधित देशांच्या (बांग्लादेश, भारत, श्रीलंका व थायलंड आर्थिक सहकार्य: बांग्लादेश, इंडिया, श्रीलंका अँड थायलंड इकनॉमिक कोऑपरेशन) इंग्रजी अद्याक्षरांवरून "BISTAEC' असे लघुरूपी नाव प्राप्त झाले. बँकॉकमध्ये २२ डिसेंबर १९९७ रोजी झालेल्या विशेष मंत्रिस्तरीय बैठकीमध्ये म्यानमारचाही या संघटनेत समावेश झाला आणि तिचे "BIMSTAEC' असे नामकरण झाले. थायलंड इथे फेब्रुवारी २००४मध्ये झालेल्या सहाव्या मंत्रिस्तरीय बैठकीत नेपाळ व भूतान यांनी या संघटनेत प्रवेश केला आणि या गटाचे नाव बदलून 'बे ऑफ बंगाल इनिशिएटिव्ह फॉर मल्टिसेक्टोरल टेक्निकल अँड इकनॉमिक कोऑपरेशन' असे करण्यात आले.

बिम्स्टेकचे कायमस्वरूपी सचिवालय सप्टेंबर २०१४ पासून ढाका इथे कार्यरत आहे.

**महत्त्वाची तथ्ये–**

१. बंगाली उपसागराच्या प्रदेशात जगातील २२ टक्के लोकसंख्या राहते– १.६ अब्ज.

२. या प्रदेशाचा संयुक्त जीडीपी ३.७ खर्व डॉलर इतका आहे.

३. जागतिक व्यापारातील २५ टक्के व्यापार बंगालच्या उपसागरातून होतो.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421




**भारतासाठी बिम्स्टेकचे महत्त्व–**

१. सामरिक– शेजाराला प्राधान्य, 'पूर्वेकडे कृती', ईशान्य भारताचा आर्थिक विकास, या तीन मुख्य धोरणांचा पाठपुरावा करण्यासाठी भारताला बिम्स्टेक संघटना महत्त्वाची आहे.

२. चिनी प्रभावाचा प्रतिकार करण्यासाठी महत्त्वाचा मंच.

३. या प्रदेशातील लोकसंख्या तरुण आहे व अर्थव्यवस्था उदयोन्मुख आहेत.

४. सार्क व आसिआन यांच्यातील प्रदेशांतर्गत सहकार्यासाठीचा मंच.

५. बिम्स्टेकसोबत भौतिक जोडणी असल्यास भारताला आसिआनच्या 'मास्टर प्लॅन फॉर कनेक्टिव्हिटी, २०२५' योजनेत सहभागी व्हायला मदत होईल.

**महत्त्वाचे जोडणी प्रकल्प–**

१. कलदान बहुलकी प्रकल्प– कोलकाताला म्यानमारमधील सित्तवे बंधराशी जोडणे आणि मग मिझोरामला नदीमार्गे व रस्त्याने जोडणे.

२. आयएमटी त्रिराष्ट्रीय महामार्ग– भारत व थायलंड यांना म्यानमारशी जोडणे.

३. वस्तू व लोक यांच्या मुक्तप्रवाहासाठी बीबीआयएन मोटर वाहन करार.

---

**पाचवी बिम्स्टेक शिखरबैठक २०२२–**

**'बिम्स्टेक– लवचिक प्रदेश, संपन्न अर्थव्यवस्था, निरोगी लोक या दिशेने.'**

**निष्पत्ती–**

१. बिम्स्टेक सनदेचा स्वीकार– काम करण्यासाठी व सहकार्यासाठी सात विशेष क्षेत्रे.

२. सुरक्षा स्तंभामध्ये भारताला नेतृत्वस्थान– यात दहशतवादाचा प्रतिकार, आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी, आपत्ती–व्यवस्थापन व ऊर्जा, या विषयांचा समावेश होतो.

३. वाहतूक जोडणीसाठी महायोजना तयार करणे.

४. क्षमतावृद्धीसंदर्भात बिम्स्टेकच्या सहा करारांवर सह्या झाल्या आहेत.

---

**प्रश्न व आव्हाने–**

१. सदस्यांचे दुर्लक्ष व बांधिलकीचा अभाव.

२. बंगालच्या उपसागरातील जोडणीचा अभाव– भौतिक पायाभूत सुविधा (खराब रस्ते व रेल्वे जोडणी, अंतिम घटकापर्यंतची अपुरी सेवा).

३. सदस्यदेशांमधील अलीकडचा ताण (भारत व बांग्लादेश यांच्या सीमावाद आहे आणि म्यानमार व बांग्लादेश यांच्या रोहिंग्यांवरून वाद आहे).

४. मुक्त व्यापारी करार स्वीकारण्यात विलंब झाल्यामुळे त्याच्या परिणामकारकतेविषयी शंकेला खतपाणी मिळते.

५. चिनी आक्रमकता व बंगालच्या उपसागरातील चीनची वाढती उपस्थिती याचा जहाजवाहतुकीच्या मार्गांच्या स्वायत्ततेवर परिणाम होतो (मलक्कातील संभ्रम).

६. प्रदेशांतर्गत व्यापार गेल्या दशकात केवळ सहा टक्के होता.

७. प्रादेशिक भूराजकारण– चीनवरील अतिरिक्त अवलंबित्वामुळे चीनविरोधी भावना व्यक्त करण्यातील अनुत्सुकता.

८. मर्यादित संघटनात्मक क्षमता व नोकरशाहीच्या पातळीवरील विलंब.

**पुढील मार्गक्रमणा**

१. फिक्कीने २०१८ साली केलेल्या शिफारसीनुसार मुक्त व्यापारी कराराबद्दल तातडीने वाटाघाटी करणे.

२. राजकीय संवाद बळकट करणे– अलीकडे द्वैवार्षिक शिखरबैठकीचे आयोजन पाचव्या बिम्स्टेक शिखरबैठकीदरम्यान करण्यात आले होते.

३. अपरंपरिक धोक्यांचे उपशमन करण्यासाठी सहकार्य करणे.

४. अधिक चांगल्या आर्थिक एकीकरणासाठी जोडणी प्रकल्प वेगाने पूर्ण करणे.

५. बहुराष्ट्रीयतेला प्राधान्य– पर्यटनविषयक मुत्सद्देगिरीला सुकरता मिळवून देणे आणि अकादमिक व विद्यार्थी देवाणघेवाणीचे कार्यक्रम राबवणे.

६. कलापनी व रोहिंग्या यांसारख्या वादग्रस्त प्रश्नांवर प्रत्यक्ष अपचारिक चर्चा घ्यायला हवी. असे प्रश्न चर्चेने व परस्परांविषयीच्या विश्वासाने सामोपचार दाखवत मिटवायला हवेत.

बंगालच्या उपसागराचे रुपांतर जोडणी, संपन्नता व सुरक्षितता यांच्यातील पुलामध्ये करावे, असे आवाहन पंतप्रधान नेहरूंनी सदस्यदेशांना व इतर नेत्यांना केले.

**सार्क**

**आढावा–**

भारत हा दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटनेचा (सार्क) संस्थापक सदस्य आहे. या संघटनेची स्थआपना १९८५ साली झाली. दक्षिण आशियाई प्रदेशातील सर्व देशांच्या विकासाला व प्रगतीला चालना देण्याच्या व्यापक ध्येयाने जोडणी व एकीकरण साधणे, हा यामागचा उद्देश होता. विभिन्न प्रदेशांमध्ये अधिक सहकार्य साधण्यासाठी सार्कच्या चौकटीत विविध उपक्रमांना भारत पाठबळ देत राहतो.

सार्कच्या आत्तापर्यंत १८ शिखरबैठका झाल्या आहेत, त्यातील तीन परिषदांचे यजमानपद भारताकडे होते– दुसरी सार्क शिखरबैठक (बंगळुरू, नोव्हेंबर १९८६), आठवी शिखरबैठक (नवी दिल्ली, मे १९९५), आणि चौदावी शिखरबैठक (नवी दिल्ली, एप्रिल २००७).

अफगाणिस्तान, बांग्लादेश, भूतान, मालदीव, नेपाळ व श्रीलंका यांच्याशी भारताचे उत्कृष्ट द्विपक्षीय संबंध आहेत. 'शेजाराला प्राधान्य' या धोरणानुसार भारत विकासविषयक एक सक्रिय भागीदार झाला आहे आणि या देशांमधील अनेक प्रकल्पांमध्ये त्याचा सहभाग असतो. या देशांशी असणारा आपला संपर्क सल्लामसलतीवर आधारलेला, केवळ मोबदल्यावर लक्ष न ठेवणारा व निष्पत्तीकेंद्री दृष्टिकोन राखणारा आहे, त्याचप्रमाणे अधिक चांगली जोडणी, पायाभूत सुविधांमधील सुधारणा, विविध क्षेत्रांमधील अधिक सक्षम विकासविषयक सहकार्य, सुरक्षातता व लोका–लोकांमधील विस्तृत संपर्क यांवर भर देणारा आहे.

**महत्त्वाची तथ्ये–**

१. जगातील २२ टक्के लोकसंख्या सार्क सदस्यदेशांमध्ये राहते.

२. जगातील ३ टक्के प्रदेश सार्कच्या कक्षेत येतो.

३. जगाची ३.८ टक्के अर्थव्यवस्था या प्रदेशात आहे.




**सहकार्यासाठी सहमतीचे पाच ढोबळ अवकाश–**

१. मनुष्यबळ विकास.

२. वाहतूक.

३. हवामानशास्त्र, विज्ञान व तंत्रज्ञान आणि दूरसंचार.

४. ग्रामीण व शेतकी विकास.

५. लोकसंख्या व आरोग्यविषयक उपक्रम.

**सार्कसमोरील प्रश्न व आव्हाने–**

१. सदस्य देशांचे खूप जास्त बहुजिनसी व विभाजित स्वरूप परस्परांविषयी वैरभाव व द्वेष निर्माण करते.

२. असमतोलाची समस्या– भारत प्रादेशिक प्रभुत्वसत्ताक / 'दादा' असल्याची प्रतिमा निर्माण होते.

३. असममित विकास– सार्कमधील ७० टक्के प्रदेश व लोकसंख्या भारतात आहे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

४. भारत–पाकिस्तान शत्रुत्वाचा परिणाम सार्कच्या कामकाजावर होतो.

५. तालिबानने अफगाणिस्तानातील सत्ता पुन्हा ताब्यात घेतली.

६. चीनचा वाढता प्रभाव– भारत वगळता सार्कच्या इतर सदस्यदेशांशी संबंध प्रस्थापित करायचा चीनचा प्रयत्न आहे. उदाहरणार्थ, चीनने पाकिस्तानसोबत सीपीईसी प्रकल्प सुरू केला, श्रीलंकेसोबत हम्बान्तोता प्रकल्प सुरू केला, मालदीवसोबत मुक्त व्यापरी करार केला आणि नेपाळसोबत रेल्वेजोडणीसाठीचा करार केला.

७. संसाधनांचा तुटवडा आणि सार्कमधील स्वतःचे योगदान वाढवण्याबाबत सदस्यदेशांमधील अनुत्सुकता.

८. सीमापार दहशतवादाच्या धोक्याबद्दल सर्वानुमतीचा अभाव.

**पुढील मार्गक्रमणा (सुधारणांचा आराखडा)–**

१. व्यापक प्रादेशिक एकीकरणासाठी आर्थिक एकीकरण हा एकमेव मार्ग आहे, हे सार्क देशांच्या लक्षात यायला हवे.

२. एकात्मिक दक्षिण आशियाई ऊर्जा जाळ्याच्या व्यवस्थेद्वारे ऊर्जा सुरक्षिततेची जोडणी करायला हवी.

३. सहकार्यावर आधारित प्रकल्पांसाठी तांत्रिक व वित्तीय संसाधने एकत्र करणे.

४. श्रीलंका पश्चिम बंदर स्थानकासारख्या वेगवान परिणाम दाखवणाऱ्या प्रकल्पांची सुरुवात.

५. विज्ञान व तंत्रज्ञान, अंतराळ, शिक्षण व आरोग्य यांसारख्या क्षेत्रांमध्ये सिंधू पाणी कराराच्या धर्तीवर सहकार्य वाढवणे.

६. सहकार्याच्या आधीपासून अस्तित्वात असणाऱ्या प्रादेशिक केंद्रांना बळकटी देणे व सुसूत्रता आणणे– उदाहरणार्थ, ढाक्यामध्ये कृषी केंद्र, भारतात आपत्ती व्यवस्थापन केंद्र, इत्यादी.

**ऐक्य व सर्वानुमती यांची गरज–**

जागतिक भांडवल व तंत्रज्ञान यांचे लक्ष्यस्थान संबंधित प्रदेशातील एकीकरणाच्या प्रमाणावर ठरते. त्यात पायाभूत सुविधांची उपलब्धता, कुशल कामगार, दळणवळणावरील कमी खर्च, इत्यादी घटकांचा समावेश असतो. अशा वेळी प्रादेशिक सहकार्याचा सकारात्मक परिणाम होतो. युद्धाचा हिंसक इतिहास असूनही युरोपीय राष्ट्रांनी स्वतःचे मतभेद बाजूला ठेवले व युरोपीय संघाची स्थापना केली. त्याच धर्तीवर सार्कच्या नेत्यांनी शांततापूर्ण प्रादेशिक विकासाची दृष्टी साध्य करायला हवी.

**आसिआन**

**आढावा–**

आसिआनसोबतचे भारताचे संबंध हा आपल्या परराष्ट्र धोरणाचा एक अत्यंत महत्त्वाचा आधार ठरला आहे. १९९०च्या दशकारंभी मांडण्यात आलेल्या 'पूर्वेकडे दृष्टी' धोरणातून हे संबंध विकसित झाले; या धोरणामुळे भारत १९९२ साली आसिआनचा क्षेत्रीय भागीदार झाला, १९९६ साली चर्चास्तरीय भागीदार झाला आणि २००२ साली शिखरबैठकीच्या स्तरावरील भागीदार झाला. नवी दिल्लीमध्ये २०१२ साली झालेल्या विसाव्या वर्धापनदिनाच्या स्मृतिप्रीत्यर्थ या भागीदारीने सामरिक भागीदारीचा टप्पा गाठला. गेल्या दोन दशकांमधील भारत–आसिआन

संबंधांच्या सामरिक संबंधांच्या वाढीची ही स्वाभाविक निष्पत्ती होती. २०१४ साली झालेल्या बाराव्या शिखरबैठकीदरम्यान घोषित करण्यात आलेल्या ‘पूर्वेकडे कृती’ धोरणानुसार भारत–आसिआन सामरिक भागीदारीला नव्याने गती मिळाली. आसिआनच्या सदस्यदेशांसोबतचे संबंध वृद्धिंगत करण्याचा भारताचा स्पष्ट हेतू या वेळी व्यक्त करण्यात आला. ‘पूर्वेकडे कृती’ धोरण आसिआन–भारत एकीकरण वाढवण्यासाठी जोडणी, वाणिज्य व संस्कृती या कृतीक्षेत्रांवर भर देते. आसिआन समुदायानिर्मितीच्या प्रक्रियेमधील तीन आधारस्तंभांचा आराखडा यामध्ये विचारात घेतला जातो– ‘आसिआन २०२५– फोर्जिंग अहेड टुगेदर’ हा आसिआन भविष्यवेधी योजनेचा दस्तावेज, ‘आसिआन मास्टर प्लॅन फॉर कनेक्टिव्हिटी २०२५, आसिआन आयसीटी मास्टर प्लॅन २०२०’ आणि ‘आसिआन इंटिग्रेशन वर्क प्लॅन– ३’साठीचा उपक्रम.

**महत्त्वी तथ्ये–**

१. आसिआन हा भारताचा चौथा सर्वांत मोठा व्यापारी भागीदार आहे.

२. भारत–आसिआन व्यापार १०० अब्ज डॉलरांपलीकडे गेला आहे.






Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**सहकार्याचे प्रदेश–**

१. जोडणी– भौतिक (भारत–म्यानमार–थायलंड, अर्थात आयएमटी त्रिराष्ट्रीय महामार्ग), समुद्री (कलदान बहुलकी प्रकल्प) संस्थात्मक (एआरएफ, एआयबीसी, एमजीसी).

२. राजकीय व सुरक्षाविषयक सहकार्य– आसिआनचा सामरिक भागीदार, दक्षिण चिनी समुद्रातील सुरक्षाविषयक भागीदार, संयुक्त सैनिकी कवायती.

३. आर्थिक सहकार्य– चौथा सर्वांत मोठा व्यापारी भागीदार, मुक्त व्यापारी करार.

४. सांस्कृतिक सहकार्य– प्रादेशिक (रामायण, महाभारत), भाषा (तामिळ ही सिंगापूरची एक अधिकृत भाषा आहे).

५. परदेशस्थ भारतीय– भारताच्या सौम्य सत्तेचे महत्त्वाचे साधन ; विशेषतः सिंगापूर व मलेशिया इथे.

**प्रश्न व आव्हाने–**

१. आर्थिक– भारताची आयात–निर्यात तफावत प्रतिकूल आहे. भारताने आरसीईपी करारातून माघार घेतली आहे.

२. आसिआन राष्ट्रांच्या राज्यक्षेत्रीय सार्वभौमत्वावर चीनचा प्रभाव वाढतो आहे व या प्रदेशातील चीनचा हस्तक्षेपही वाढतो आहे. (स्प्रेटली आयलंड).

३. दक्षिण चिनी समुद्रामधील चीनचा दावा भारताच्या हायड्रोकार्बन शोधाच्या शक्यतांसाठी धोकादायक आहे.

४. प्रलंबित प्रकल्प– भारताने भारत–म्यानमार–थायलंड त्रिराष्ट्रीय महामार्गासारख्या जोडणी प्रकल्पांचे आश्वासन दिले आहे. परंतु, हे प्रकल्प वेळेत पूर्ण न होणे ही समस्या आहे.

५. अपरिणामकारक वाटाघाटी– या राष्ट्रांसोबतचे अनेक द्विपक्षीय करार अजून पूर्णत्वास गेलेले नाहीत, त्यामुळे राजनैतिक संबंधांच्या विविध बाजू ठप्प झाल्या आहेत.

**पुढील मार्गक्रमणा–**

१. भारत व आसिआन यांच्यातील भौतिक व डिजिटल जोडणी वाढवण्यासाठीच्या संधींचा शोध घेणे.

२. भारताने भारत–म्यानमार–थायलंड त्रिराष्ट्रीय महामार्गासारख्या जोडणी प्रकल्पांसंबंधीचे काम वेगाने पुढे न्यायला हवे आणि सर्व आसिआन राष्ट्रांसोबत नवीन व्यापारी व वाहतूकविषयक दुवे उभारायला हवेत.

३. हवामानबदल, शाश्वत विकास व अपारंपरिक ऊर्जा यांसारख्या क्षेत्रांमधील सहकार्य पुढे नेणे.

४. समुदायकेंद्री अल्प कालावधीत पूर्ण होणारे व चटकन परिणाम दाखवणारे प्रकल्प पुढे नेऊन विकासविषयक सहकार्य वाढवणे.

५. लोकांचे परस्परांमधील संबंध व सांस्कृतिक संबंध सुधारणे– तरुणाईवर लक्ष केंद्रीत करून नालंदा विद्यापीठ व आयटीईसी यांद्वारे आसिआन देशांमधील तरुणांना शिष्यवृत्ती देणे.

भारताला आर्थिक व सुरक्षिततताविषयक कारणांसाठीही आसिआन राष्ट्रांसोबत जवळचे राजनैतिक संबंध गरजेचे आहेत. त्यामुळे सक्षम सामरिक, सुरक्षाविषयक व आर्थिक संबंध भारत व आसिआन सदस्यदेशांमध्ये परस्परावलंबित्व निर्माण करतील. यातून या प्रदेशातील चीनच्या वाढत्या वरचष्म्याचा परिणामकारक प्रतिकार होईल.

**शांघाय सहकार्य संघटना**

**आढावा–**

शांघाय सहकार्य परिषद ही आठ सदस्यांची बहुराष्ट्रीय संघटना असून तिची स्थापना चीनमधील शांघाय इथे १५ जून २००१ रोजी झाली. चीन, कझाखस्तान, किर्गिझिस्तान, रशिया, ताजिकिस्तान व उझबेकिस्तान या देशांच्या नेत्यांनी ही संघटना स्थापन केली.

वरीलपैकी उझबेकिस्तानचा अपवाद वगळता उर्वरित देशांनी २६ एप्रिल १९९६ रोजी 'सीमाप्रदेशांमधील सैनिकी विश्वासवृद्धीच्या करारा'वर सह्या केल्या आणि तेव्हाच त्या देशांचा मिळून 'शांघाय फाइव्ह' हा गट स्थापन झाला होता. २००१ साली शांघायमध्ये झालेल्या वार्षिक शिखरबैठकीमध्ये 'शांघाय फाइव्ह'च्या यंत्रणेत उझबेकिस्तानला प्रवेश देण्यात आला, त्यामुळे या गटाने 'शांघाय सिक्स' असे रूप घेतले.

त्यानंतर १५ जून २००१ रोजी शांघाय सहकार्य संघटनेच्या घोषणापत्रावर सह्या करण्यात आल्या आणि जून २००२मध्ये संबंधित सदस्यदेशांनी शांघाय सहकार्य संघटनेच्या सनदेवर सह्या केल्या. संघटनेचे उद्देश, तत्त्वे, संरचना व कार्यपद्धती यांची मांडणी सनदेमध्ये केली होती आणि आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार सदर संघटनेची स्थापन झाल्याचे प्रतिपादन त्यात केले होते. जुलै २००५मध्ये झालेल्या अस्ताना शिखरबैठकीमध्ये भारत, इराण व पाकिस्तान यांना निरीक्षकाचा दर्जा देण्यात आला. जुलै २०१५मध्ये रशियातील उफा इथे झालेल्या परिषदेत शांघाय सहकार्य संघटनेने भारत व पाकिस्तान यांना पूर्ण सदस्य म्हणून प्रवेश देण्याचे ठरवले. भारत व पाकिस्तान यांनी उझबेकिस्तानातील ताश्कंद इथे जून २०१६मध्ये दायित्वाच्या स्मरणपत्रावर सह्या केल्या, त्यातून त्यांची पूर्ण सदस्य म्हणून या संघटनेत सहभागी होण्याची औपचारिक प्रक्रिया सुरू झाली. अस्ताना इथल्या ऐतिहासिक शिखरबैठकीमध्ये ९ जून २०१७ रोजी भारत व पाकिस्तान यांनी पूर्ण सदस्य म्हणून शांघाय सहकार्य संघटनेमध्ये अधिकदृतरित्या प्रवेश केला.

**महत्त्वाची तथ्ये–**

१. युरेशियन प्रदेशातील ६० टक्के प्रदेश शांघाय सहकार्य संघटनेच्या अंतर्गत येतो.

२. जगातील ४२ टक्के लोकसंख्या या प्रदेशात राहते.

३. जागतिक जीडीपीतील २० टक्के वाटा या प्रदेशाचा असतो.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421




**भारतासाठी शांघाय सहकार्य संघटनेची प्रस्तुतता–**

१. भारताच्या मध्य आशियाशी जोडून घेण्यासंदर्भातील धोरणाला पुढे नेण्यासाठी महत्त्वाचा मंच.

२. प्रादेशिक दहशतवादविरोधी संरचनेद्वारे प्रादेशिक दहशतवादाचा प्रतिकार.

३. ऊर्जाविषयक सहकार्य– युरेशियापर्यंत पोचण्याचा भारताचा मार्ग मोकळा करणे आणि तापी वायू पाइपलाइन प्रकल्पाला चालना देणे.

४. भारत–मध्य आशिया व्यवसाय परिषदेला आर्थिक सहकार्य वाढवण्यासाठीचा मार्ग शांघाय सहकार्य संघटनेद्वारे उपलब्ध होतो.

५. या संघटनेमुळे भारताचे एक मुख्य आशियाव्यापी स्पर्धक म्हणून स्थान वधारते.

६. अफगाणिस्तानात स्थैर्य आणण्यात या संघटनेची महत्त्वाची भूमिका असू शकते; आणि हे स्थैर्य भारताच्या हिताचे आहे.

**प्रश्न व आव्हाने–**

१. चीनचे वर्चस्व– भारत वगळता चीनच्या बीआरआय प्रकल्पाला शांघाय सहकार्य संघटनेतील सर्व सदस्यांनी पाठिंबा दिला आहे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

२. या प्रदेशातील महासत्तांच्या बदलत्या राजकारणामुळे व शत्रुत्वामुळे भारताला सामरिक मार्गक्रमणा करणे अवघड होईल.

३. भारत–पाकिस्तान शत्रुत्व.

४. दहशतवादाची व्याख्या– भारताने केलेली दहशतवादाची व्याख्या आणि शांघाय सहकार्य परिषदेने प्रादेशिक दहशतवादविरोधी संरचनेनुसार केलेली व्याख्या यांच्यात भेद आहे.

५. रशिया–चीन–पाकिस्तान यांची जवळीक भारताला सामरिक पातळीवर अडचणीची ठरू शकते.

६. दहशतवादाविरोधात अपुऱ्या उपाययोजना– विशेषतः अफगाणिस्तान–पाकिस्तान प्रदेशातून उगम पावणाऱ्या धोक्यांवर उपाय करण्याला ही संघटना फारसे प्राधान्य देत नाही.

७. अफगाण संपर्क गट– याबाबत शांघाय सहकार्य संघटनेतील इतर सदस्यांशी भारताची सहमती नाही.

---

(पंतप्रधान मोदींनी मांडलेली) HEALTH चौकट

क– आरोग्यविषयक सहकार्य

ए– आर्थिक सहकार्य (बचावात्मकतेविरोधात, जागतिक व्यापार संघटनेला प्राधान्य)

–– पर्यायी ऊर्जा (सौर ऊर्जेला चालना)

ङ– साहित्य व संस्कृती

ढ– दहशतवादमुक्त समाज (शांघाय सहकार्य संघटनेतील दहशतवादविरोधी संरचनेला बळकटी देणे).

क– मानवीय सहकार्य

---

**पुढील मार्गक्रमणा–**

१. भारताने सामरिक स्वायत्तता राखायला हवी आणि इतर सदस्यांच्या वर्चस्वाविरोधात स्वतःचा स्वतंत्र आवाज जपायला हवा.

२. जोडणी प्रकल्पांचे सुसूत्रीकरण करणे– चाबहार बंदराचे काम वेगाने पूर्ण करणे आणि खछ्ब्ढउला गती देणे.

३. चीन व पाकिस्तान यांच्याशी मागल्या दाराने वाटाघाटी करण्याचा मंच म्हणून भारताने शांघाय सहकार्य संघटनेचा उपयोग करून घ्यायला हवा.

४. या संघटनेद्वारे भारत मध्य आशियाई प्रदेशात रचनात्मक भूमिका निभावू शकतो– तरुणाईवरील कट्टरतावादाचा प्रभाव कमी करणे व सौम्य सत्तेचा लाभ करून घेणे.

५. लोकांच्या पातळीवरील सहकार्य व सांस्कृतिक संपर्क बळकट करणे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**ब्रिक्स**

**आढावा–**

ब्रिक (ब्राझिल, रशिया, भारत व चीन) या देशांचे नेते पहिल्यांदा रशियातील सेंट पीटर्सबर्ग इथे जी–८ संपर्क शिखरबैठकीदरम्यान जुलै २००६मध्ये भेटले. त्यानंतर लगेचच सप्टेंबर २००६मध्ये या गटाला ब्रिक असे औपचारिक रूप देण्यात आले, आणि ब्रिक देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची पहिली बैठक झाली. न्यूयॉर्कमध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या सभेतील सर्वसाधारण चर्चेदरम्यान ही बैठक झाली.

अनेक उच्चस्तरीय बैठका झाल्यानंतर १६ जून २००९ रोजी रशियातील येकातेरिन्बर्ग इथे पहिली ब्रिक शिखरबैठक झाली.

सप्टेंबर २०१०मध्ये न्यूयॉर्क इथे झालेल्या ब्रिकमधील परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत दक्षिण आफ्रिकेचा पूर्ण सदस्य म्हणून स्वीकार झाल्यावर या गटाचे नामकरण ब्रिक्स (ब्राझिल, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिका) असे करण्यात आले. त्यानंतर १४ एप्रिल २०११ रोजी चीनमधील सान्या इथे झालेल्या ब्रिक्सच्या तिसऱ्या शिखरबैठकीला दक्षिण आफ्रिका उपस्थित होता.

**महत्त्वाची तथ्ये–**

१. जगातील ४१ टक्के लोकसंख्या या प्रदेशात राहते.

२. जागतिक जीडीपीमध्ये या प्रदेशाचा २३ टक्के वाटा आहे.

३. जागतिक व्यापारात या प्रदेशाचा १६ टक्के वाटा आहे.

४. जगातील ३० टक्के भूमी या प्रदेशात आहे.






Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**ब्रिक्सचे महत्त्व –**

१. दक्षिण गोलार्धातील उदयोन्मुख देशांना स्वतःचे मत मांडाण्यासाठीचा हा मंच आहे.

२. समावेशक आंतरराष्ट्रीय वित्तीय स्थापत्त्य निर्माण करण्यात योगदान– नवीन विकास बँक.

३. दहशतवादाचा प्रतिकार– भारताने ब्रिक्सला दहशतवादाविरोधात उभे केले आहे आणि दहशतवादाला होणाऱ्या वित्तपुरवठ्याबद्दल अधिक स्पष्ट सल्लामसलतीची प्रक्रिया सुरू केली आहे.

४. गरिबी व उपासमार नष्ट करण्यासाठी शाश्वत विकासविषयक उद्दिष्टे साध्य करणे– ब्रिक्स कृषी व संशोधन मंच.

५. भारताला सामरिक स्वायत्तता मिळवण्याची व पाश्चात्त्यांविरोधात समतोल साधण्यासाठीची संधी ब्रिक्समुळे मिळते.

६. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतील व आण्विक पुरवठादार गटामधील सदस्यत्वासाठी भारत सक्रिय पाठपुरावा करतो आहे. या उद्दिष्टांच्या पाठपुराव्यामध्ये चीनचा मोठा अडथळा आहे. त्यामुळे चीनशी सक्रिय संवाद साधून त्याचा पाठिंबा मिळवण्यासाठी भारताला ब्रिक्सच्या निमित्ताने संधी मिळते.

**प्रश्न व आव्हाने–**

१. भौगोलिक विभाजन– ब्रिक्सचे सदस्य चार भिन्न खंडांमध्ये विखुरलेले आहेत.

२. सदस्यदेशांच्या भिन्न राजकीय विचारसरण्या– भारत चैतन्यशील लोकशाही आहे, तर चीन व रशिया इथे एकाधिकारशाही राजवटी आहेत.

३. आर्थिक असमतोल– इतर देशांपेक्षा चीन आर्थिकदृष्ट्या बराच प्रभुत्वशाली आहे.

४. चीनच्या विस्तारवादी महत्त्वाकांक्षांमुळे भविष्यात ब्रिक्स कोणत्या वाटेने जाईल याबद्दल इतर सदस्यांच्या मनात शंका निर्माण होतात.

५. नवीन विकास बँकेमध्ये भांडवल पुरेशा प्रमाणात गुंतवले जात नाही.

६. सदस्यदेशांचा परस्परांशी असणारा व्यापार कमी आहे (भौगोलिक विखंडनामुळे व्यापारी एकीकरणाला बाधा येते).

**पुढील मार्गक्रमणा–**

१. जागतिक शासनव्यवहारातील संस्थांमधील (जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणे निधी, जागतिक व्यापार संघटना) सुधारणेच्या बाजूने आवाज उठवण्यासाठी मंच म्हणून भारताने ब्रिक्सचा वापर करायला हवा.

२. संयुक्त राष्ट्रे व संयुक्त राष्ट्रांची सुरक्षा परिषद यांमध्ये अधिक लोकशाहीकरण व्हावे, याकरता भारत ब्रिक्सच्या माध्यमातून दबाव आणू शकतो.

३. ब्रिक्स राष्ट्रांनी तळातून–वर पाहणारा दृष्टिकोन स्वीकारायला हवा (खाजगी क्षेत्र व नागरिकांचा सहभाग करून घ्यावा).

४. ब्रिक्समधील दहशतवादविरोधी कार्यक्रमाचे सुसूत्रीकरण व्हायला हवे. यासाठी भारताने पुढाकार घ्यायला हवा.

५. ब्रिक्सने आंतरराष्ट्रीय व प्रतिष्ठित पतपात्रता निर्धारण संस्था स्थापन करायला हवी; या संस्थेने पारदर्शक काम करून न्याय्य निर्धारण करायला हवे (पंतप्रधान मोदींनी हा प्रस्ताव मांडला).

६. जी–२०सोबतच ब्रिक्सचा वापर करून भारताने दक्षिण गोलार्धातील स्वतःचे हितसंबंध पुढे न्यायला हवेत.

***



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

# अभ्यासक्रमातील विषय– महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय संस्था व मंच– त्यांची संरचना, अधिकारक्षेत्र.

मागील वर्षांमध्ये विचारले गेलेले वरील विषयांशी संबंधित प्रश्न पाहू.

| Questions | कळीचा शब्द/मागणी | विषयसूत्र |
|---|---|---|
| Critically examine the aims and objectives of SCO. What importance does it hold for India? (2021) | एससीओचे विश्लेषण | समकालीन चालू घडामोडी |
| Critically examine the role of WHO in providing global health security during the COVID-19 pandemic. (2020) | कोव्हिड-१९दरम्यान जागतिक आरोग्य संघटनेच्या कामगिरीचे विश्लेषण | चालू घडामोडी |
| 'Too little cash, too much politics, leaves UNESCO fighting for life.' Discuss the statement in the light of US' withdrawal and its accusation of the cultural body as being 'anti-Israel bias'. (2020) | युनेस्कोशी निगडीत प्रश्न. | चालू घडामोडी |
| What are the key areas of reform if the WTO has to survive in the present context of 'Trade War', especially keeping in mind the interest of India? (2018) | जागतिक व्यापार संघटनेतील सुधारणा | चालू घडामोडी |
| What are the main functions of the United Nations Economic and Social Council (ECOSOC)? Explain different functional commissions attached to it. (2017) | ईसीओएसओसी | मुलभूत संकल्पना |
| What are the aims and objectives of the McBride Commission of UNESCO? What is India's position on these? (2016) | मॅकब्राइड आयोगाची भूमिका | समकालीन चालू घडामोडी |
| "The broader aims and objectives of WTO are to manage and promote international trade in the era of globalization. But the Doha | जागतिक व्यापार संघटनेशी निगडीत प्रश्न | समकालीन चालू घडामोडी |

| | | |
|---|---|---|
| round of negotiations seem doomed due to differences between the developed and developing countries." Discuss in the Indian perspective. (2016) | | |
| Discuss the impediments India is facing in its pursuit of a permanent seat in the UN Security Council. (2015) | संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतील सुधारणांचे प्रश्न | समकालीन चालू घडामोडी |
| India has recently signed to become founding member of New Development Bank (NDB) and also the Asian Infrastructure Investment Bank (AIIB). How will the role of the two Banks be different? Discuss the strategic significance of these two Banks for India. (2014) | एनडीबी व एआयआयबी यांचे सामरिक महत्त्व | समकालीन चालू घडामोडी |
| WTO is an important international institution where decisions taken affect countries in a profound manners. What is the mandate of WTO and how binding are their decisions? Critically analyze India's stand on the latest round of talks on Food security. (2014) | जागतिक व्यापार संघटनेचे नियम व नियमने | समकालीन चालू घडामोडी |
| Some of the International funding agencies have special terms for economic participation stipulating a substantial component of the aid to be used for sourcing equipment from the leading countries. Discuss the merits of such terms and if, there exists a strong case not to accept such conditions in the Indian context. (2014) | आंतरराष्ट्रीय संस्थांकडून होणारा सशर्त वित्तपुरवठा | समकालीन चालू घडामोडी |
| The World Bank and the IMF, collectively known as the Bretton Woods Institutions, are the two inter-governmental pillars supporting the structure of the world's economic and financial order. Superficially, the World Bank and the IMF exhibit many common characteristics, yet their role, functions and mandate are distinctly different. Elucidate. (2013) | आंतरराष्ट्रीय नाणे निधी व जागतिक बँक यांच्यातील फरक | मुलभूत संकल्पना |



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

संस्थांना भेडसावणाऱ्या समकालीन प्रश्नांवर लक्ष केंद्रित करण्यात आल्याचे इथे आपल्याला स्पष्टपणे दिसते. त्यानुसार आपण महत्त्वाच्या संस्थांचे विश्लेषण करू.

## संयुक्त राष्ट्रे




### संयुक्त राष्ट्रांच्या कामकाजातील प्रश्न व आव्हाने–

१. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतील कायमस्वरूपी सदस्यत्वाबाबतचा असमतोल.

२. संयुक्त राष्ट्रांच्या सचिवालयातील वाढती पारदर्शकता.

३. उत्तरदायित्व व कार्यक्षमता.

४. वित्तीय सुधारणा, सर्वसाधारण सभेमध्ये प्रातिनिधिक मतदान व्यवस्थेची अंमलबजावणी करून त्याद्वारे वैविध्य व लोकशाही आणण्याचे आवाहन,

५. मानवाधिकार याचिका व्यवस्थेमध्ये अपुरेपणा.

### युरोपीय संघाने दिलेले विकासव्यवस्थेसाठीचे सात महत्त्वाचे प्रस्ताव–

१. संयुक्त राष्ट्रांच्या देशानुसार संघांची नवीन पिढी– मागणीकेंद्री, कुशल, आणि देशविशिष्ट प्राधान्यक्रम पूर्ण

२. शाश्वत विकासावर भर देणारी नवऊर्जावान निवासी संयोजक व्यवस्था.

३. क्षेत्रीय कामाला अधिक परिणामकारकरित्या पाठबळ पुरवण्यासाठी संयोजित व पुनर्रचित प्रादेशिक दृष्टिकोन.

४. संयुक्त राष्ट्रांच्या सदस्यदेशांना सुसंगत, पारदर्शक व उत्तरदायी निष्पत्तीची हमी राहावी यासाठी नवीन अवकाश निर्माण करून त्यात व्यवस्थाव्यापी मूल्यांकनांना वाव देणे.

५. २०३० सालच्या कार्यक्रमासाठी संयुक्त राष्ट्रांचा सक्षम संस्थात्मक प्रतिसाद आणि भागीदारीचा व्यवस्थाव्यापी दृष्टिकोन.

६. संसाधनांमध्ये चांगली गुणवत्ता, संख्यात्मकता व अनुमानक्षमता आणण्यासाठी, तसेच २०३०चा कार्यक्रम प्रत्यक्षात आणण्यासाठी पारदर्शकता वाढवण्यासाठी निधीपुरवठा करणे.

७. २०३०च्या कार्यक्रमाशी विकासविषयक व्यवस्था जोडून घेण्यासाठी ठोस आवश्यक पावले उचलणे.

**जागतिक आरोग्य संघटना**

**जागतिक आरोग्य संघटनेची संस्थात्मक चौकट–**

**World Health Assembly**

The World Health Assembly is the decision-making body of WHO. It is attended by delegations from all WHO Member States and focuses on a specific health agenda prepared by the Executive Board. The main functions of the World Health Assembly are to determine the policies of the Organization, appoint the Director-General, supervise financial policies, and review and approve the proposed programme budget.

**Executive Board**

The Executive Board is composed of 34 technically qualified members elected for three-year terms. The annual Board meeting is held in January when the members agree upon the agenda for the World Health Assembly and the resolutions to be considered by the Health Assembly.

**Constitution**

WHO's work remains firmly rooted in the basic principles of the right to health and well-being for all people, as outlined in our 1948 Constitution. The Constitution was adopted by the International Health Conference held in New York 1946 and entered into force on 7 April 1948.

**Election of Director-General**

The appointment of the current WHO Director-General took place at the Seventy-fifth World Health Assembly in May 2022 (WHA75). Member States, through a circular letter sent by the WHO Secretariat, were invited to submit proposals for candidates. The World Health Assembly re-appointed Dr Tedros Adhanom Ghebreyesus as Director-General by secret ballot. The next election for Director-General is expected in 2027.

**सार्वजनिक आरोग्यामधील जागतिक आरोग्य संघटनेची भूमिका–**

**जागतिक आरोग्य संघटना तिच्या प्रमुख कार्यांमधून पुढील उद्दिष्टांची पूर्तता करते–**

१. अत्यंत कळीच्या आरोग्यविषयक बाबींमध्ये नेतृत्व पुरवणे आणि संयुक्त कृती गरजेची असेल तिथे भागीदारी करणे.

२. संशोधनविषयक कार्यक्रमाला आकार देणे आणि मूल्यवान ज्ञानाची निर्मिती, भाषांतर व प्रसार यांना चालना देणे.

३. नियम व प्रमाणके तयार करून त्यांच्या अंमलबजावणीला चालना देणे व त्यावर देखरेख ठेवणे.

४. नैतिक व पुराव्यावर आधारित धोरणात्मक पर्यायांची मांडणी करणे.

५. तांत्रिक पाठबळ पुरवणे, बदलाला चालना देणे, आणि शाश्वत संस्थात्मक कार्यक्षमता उभारणे.

६. आरोग्यविषयक परिस्थितीवर देखरेख ठेवणे आणि आरोग्यविषयक प्रवाहांचे मूल्यमापन करत राहणे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**जागतिक आरोग्य संघटनेच्या कामकाजाशी निगडीत प्रश्न–**

१. निधीपुरवठा– जागतिक आरोग्य संघटनेच्या कार्यक्रमांना बहुतांश निधीपुरवठा अर्थसंकल्पेतर देणगीतून उभा राहतो. ही देणगी देणे ऐच्छिक स्वरूपाचे असले तरी सर्वसाधारणतः त्याची ठराविक रक्कम निश्चित केलेली असते. जागतिक आरोग्य संघटनेला या निधीच्या वापराबाबत खूप कमी लवचिकता राखता येते.

२. सध्या सदस्यदेशांशी केवळ व्यापक प्राधान्यक्रमांचीच चर्चा केली जाते आणि उपक्रमांची निवड, त्यांवरील खर्च व समांतरपणे होणारी देखरेख, यांबाबतीत सदस्यदेशांचा समावेश असलेली कोणतीही नियमित व संस्थात्मक यंत्रणा नाही.

३. जागतिक व्यापार संघटनांसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांप्रमाणे सदस्यांवर बंधनकारक असणारे आदेश देण्याचे वा निर्बंध लादण्याचे अधिकार संयुक्त राष्ट्रांची विशेषज्ञ संस्था असलेल्या जागतिक आरोग्य संघटनेला नाहीत.

४. चीनशी वाढत असलेली जवळीक.

५. आंतरराष्ट्रीय आरोग्यविषयक नियमनांच्या बाबतीत देखरेख यंत्रणेचा अभाव.

६. परिणामकारक निर्णयप्रक्रियेसाठी सहकार्याधारित यंत्रणेचा अभाव.

**भारताने केलेल्या शिफारसी–**

१. आंतरराष्ट्रीय चिंताविषय असणारी सार्वजनिक आरोग्यासंदर्भातील आणीबाणी जाहीर करणारी प्रक्रिया बळकट करणे.

२. अर्थसंकल्पेतर किंवा ऐच्छिक देणग्यांच्या स्वरूपातील योगदान ठराविक रकमेपुरते असू नये, याची खातरजमा करणे गरजेचे आहे. असे केल्यास जागतिक आरोग्य संघटनेला सर्वाधिक आवश्यक असेल अशा प्रांतांमध्ये निधीचा वापर करण्यासाठी लवचिकता अंगी बाणवता येईल.

३. सक्षम व कणखर वित्तीय उत्तरदायित्वाच्या चौकटी प्रस्थापित करणे.

४. कोव्हिड–१९च्या जागतिक साथीशी लढण्यासाठी सर्व साधने न्याय्य, किफायतशीर व समतापूर्ण रितीने उपलब्ध होतील याची खातरजमा करणे. यासाठी साधनांच्या वाटपासाठीची चौकट उभारणे गरजेचे आहे.

५. माहिती व संदेशन तंत्रज्ञानाची अभिनव साधने वापरून जगव्यापी पाळतव्यवस्था स्थापन करणे ही अत्यावश्यक गरज झाली आहे.

६. कोणत्याही जागतिक साथीच्या व्यवस्थापनासाठी डेटावर आधारित परिणामकारक मर्मदृष्टी आवश्यक असतात, त्यामुळे जागतिक साथीच्या व्यवस्थापनासोबतच अग्रक्रमावरील प्रांत म्हणून डिजिटल आरोग्यविषयक कार्यक्रमाचा समावेश करणे गरजेचे आहे.

आरोग्यविषयक आणीबाणी व सार्वजनिक आरोग्यविषयक धोके, विशेषतः सार्वत्रिक साथी व जागतिक साथी या पातळीवरचे धोके, हे जागतिक आव्हान झाले आहे. यावर संयोजित व तत्काळ जागतिक प्रतिसाद आवश्यक असतो. जागतिक आरोग्यविषयक शासनव्यवहार व जागतिक आरोग्य संघटनेसोबतच्या पूरक संरचना यांचा गाभा कणखर असेल आणि कोव्हिड–१९च्या जागतिक साथीसारखी आव्हाने हाताळण्यासाठी सुसंगत असेल, याची खातरजमा करणे आवश्यक आहे.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

### जागतिक व्यापार संघटना

राष्ट्रांमधील व्यापाराच्या नियमांमध्ये लक्ष घालणारी जागतिक व्यापार संघटना ही एकमेव आंतरराष्ट्रीय संघटना आहे. जगातील अनेक व्यापारी राष्ट्रांनी वाटाघाटींनंतर सह्या केलेले आणि त्या–त्या देशांमधील संसदांनी कायदेशीर शिक्कामोर्तब केलेले करार, हा या संस्थेचा गाभा असतो. व्यापार सुरळीतपणे, अनुमानानुसार व शक्य तितक्या मुक्त रितीने प्रवाही राहावा, याची खातरजमा करणे, हे यामागील ध्येय आहे.

### जीनिव्हा इथे झालेली जागतिक व्यापार संघटनेची बारावी मंत्रिस्तरीय परिषद–



**संबंधित निर्णयांवर उपस्थित करण्यात आलेल्या चिंता–**

१. विकसनशील देशांना मासेमारीवरील अर्थसहाय्याबाबत देण्यात आलेली सूट केवळ चार वर्षांसाठीची आहे. हा कालावधी पुरेसा नाही.

२. शिवाय, 'विशेष व भेदजन्य वागणुकीचा' कोणताही उल्लेख त्यात नाही.

३. कायमस्वरूपी साठ्याशी निगडित प्रश्नांवर उपाय शोधण्याच्या भारताने केलेल्या मागणीवर काहीही निर्णय झाला नाही.

४. इलेक्ट्रॉनिक संप्रेषणाबाबत आणखी वाढवून मिळआलेला कालावधी अमेरिका व युनायटेड किंगडम यांसारख्या विकसित देशांच्या पथ्यावर पडणारा आहे– युएनसीटीडी अनुसार, यातून जागतिक पातळीवर १० अब्ज डॉलरांचा जागतिक तोटा झाला व यातील ९५ टक्के तोटा विकसनशील देशांना सहन करावा लागला.

५. कोव्हिड–१९ लशींसाठी बौद्धिक संपदा अधिकारांना देण्यात आलेली सोडचिठ्ठी भारत व दक्षिण आफ्रिका यांनी २०२० साली मांडलेल्या मूळ प्रस्तावाचे अधिक मवाळ रूप आहे. मूळ प्रस्तावात लशींवरील, तसेच उपचार व चाचण्या यांवरील बौद्धिक संपदा अधिकार मोठ्या प्रमाणात सोडून देण्याची मागणी करण्यात आली होती.

**जागतिक व्यापार संघटनेतील भारताचे न सुटलेले प्रश्न–**

| प्रश्न | भारताची भूमिका |
|---|---|
| १. जागतिक व्यापार संघटना भारतातील किमान हमीभावाचे धोरण ही व्यापाराचा विपर्यास करणारी उपाययोजना मानते आणि तिला पिवळ्या चौकटीतील तरतुदींमध्ये ठेवणे- म्हणजे संबंधित उत्पादनाच्या एकूण मूल्यातील १० टक्क्यांएवढीच या हमीभावाची कमाल मर्यादा असावी, अशी सूतना केली जाते. | किमान हमीभाव निर्यातीला चालना देण्यासाठी नसून अन्नसुरक्षेची तजवीज करण्यासाठी आहे, असे प्रतिपादन भारत करतो. |
| २. तांत्रिक अडथळे आणि फायटोसॅनिटरी अडथळे भारताच्या हितसंबंधांना बाधक ठरत आहेत. उदाहरणार्थ, हापूस आंबे परत पाठवण्यात आले. | भारताने अशा उपाययोजनांचे सुसूत्रीकरण करण्याची मागणी केली हे. |
| ३. देशांतर्गत पातळीवर दिल्या जाणाऱ्या जीआय टॅगला मान्यता न मिळाल्यामुळे उत्पादनांच्या बाजारपेठेतील वावराची हानी होते. | भारताने जीआय उत्पादनांना उच्चस्तरीय संरक्षण मिळावे अशी मागणी केली आहे. |
| ४. गुंतवणुकीमध्ये सुकरता | टीआरआयएमएसच्या उपयोजनासाठी विकसनशील देशांना लवचिकता द्यायला हवी, असे प्रतिपादन भारताने केले आहे. |



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**जागतिक व्यापार संघटनेतील विकसनशील देशाचे स्थान–**

**निवडीचा मुद्दा**

जागतिक व्यापार संघटना सदस्यदेशांना स्वतःचे वर्गीकरण 'विकसित' किंवा 'विकसनशील' यांनुसार करायची मुभा देते. परंतु, इतर सदस्य कोणत्याही देशाच्या 'विकसनशील' वर्गीकरणाला आव्हान देऊ शकतात. केवळ 'किमान विकसित देशां'च्या दर्जाबाबत संयुक्त राष्ट्रांनी निर्णय दिलेला असतो. तीन याद्यांमधील देश:

| विकसनशील | विकसित | किमान विकसित देश |
|---|---|---|
| भारत | अमेरिका | अफगाणिस्तान |
| चीन | युरोपीय संघ | बांग्लादेश |
| रशिया | जपान | भूतान |
| ब्राझिल | कॅनडा | म्यानमार |
| दक्षिण आफ्रिका | ऑस्ट्रेलिया | नेपाळ |
| दक्षिण कोरिया | न्यूझिलंड | दक्षिण सुदान |

**जागतिक व्यापार संघटनेतील डिजिटल व्यापारातील तफावत–**

**अमेरिकेच्या मागण्या–**

- डेटा स्थानिकीकरणावर, हस्तांतरणावर कोणत्याही मर्यादा असू नयेत; यात वैयक्तिक माहितीचाही समावेश होतो.
- ई–संप्रेषणावर जकात आकारू नये.
- वस्तू व सेवा व्यापारातील सुधारणेचा समावेश करण्यासाठी वाटाघाटी व्हाव्यात.

**युरोपीय संघ–**

- सीमापार डेटाप्रवाहाला मर्यादा घालू नयेत.
- सॉफ्टवेअरचा सोर्स कोड द्यायची गरज नाही.
- संगणकीय सेवा खुल्या कराव्यात, माहिती–तंत्रज्ञान कराराची व्याप्ती वाढवावी.

**चीन–**

- डेटाप्रवाह, साठा, डिजिटल उत्पादनांची हाताळणी यांबाबतीत अधिक उकल करणाऱ्या चर्चा गरजेच्या आहेत.
- ई–कॉमर्सच्या व्यापारविषयक बाबींवर लक्ष केंद्रित करून भविष्यातील नियम आणि जागतिक व्यापार संघटनेचे सध्याचे करार यांच्यातील संबंध स्पष्ट करावेत.
- जागतिक व्यापार संघटनेच्या सदस्यांच्या विकासविषयक दर्जावर लक्ष केंद्रित करण्याची गरज.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

**भारताचे चिंताविषय–**

- यातून डेटा अनिर्बंधपणे बाहेर पाठवला जाईल.
- जकात शिथील होऊ शकेल, सेवा क्षेत्र आणखी खुले होण्याची शक्यता आहे.
- विकसनशील देशांना जागतिक व्यापार संघटनेमध्ये काहीच मोबदला मिळत नाही.

**जागतिक व्यापार संघटनेचे भारतासाठी महत्त्व–**

१. जागतिक व्यापार संघटना 'नियमाधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्थे'ला चालना देते, आणि जागतिक व्यापारामध्ये विकसित देशांच्या प्रभावाविरोधात विकसनशील देशांसाठी ही व्यवस्था अतिशय महत्त्वाची असते.

२. मुक्त व्यापारी नियमचौकटीमुळे भारताच्या माहिती–तंत्रज्ञानविषयक निर्यातीला व औषधनिर्मिती क्षेत्रातील निर्यातीला पाठबळ पुरवले.

३. जागतिक व्यापार संघटना कोसळून पडली तर त्यातून टीपीपीसारख्या प्रादेशिक व्यापारी नियमचौकटी उदयाला येतील, आणि ते भारताच्या हिताचे नाही.

४. बहुतांश प्रादेशिक व्यापारी नियमचौकटी ट्रिप्सच्या (ज्यामध्ये पेटन्टना चिरकालीन दर्जा द्यायचे समर्थन केले जाते) बाजूच्या आहेत, आणि त्यातून भारताच्या औषधनिर्मितीविषयक निर्यातीचे नुकसान होऊ शकते.

**जागतिक व्यापार संघटनेच्या कामकाजाशी संबंधित सर्वसाधारण मुद्दे–**

१. चिनी धोरणांबाबत अपरिणामकारक– अन्याय्य व्यापारी व्यवहार व व्यापारविषयक सोयीस्कर आचरण.

२. अमेरिकेने न्यायाधीशांच्या नियुक्तीला आडकाठी केल्यामुळे निष्क्रिय झालेली वादनिवारण संस्था.

३. सर्वानुमतीची गरज असल्यामुळे दीर्घकाळ लांबणारी निर्णयप्रक्रिया.

४. टीपीपी, आरसीईपी यांसारख्या प्रादेशिक/बहुराष्ट्रीय व्यापारी नियमचौकटींच्या दिशेने जाणाऱ्या देशांचा वाढता प्रवाह.

५. इराण, इराक, लेबनॉन, उझबेकिस्तान यांसारख्या काही देशांची वगळणूक.

६. जकातेतर प्रतिबंध विकसनशील देशांच्या हितसंबंधांसाठी बाधक.

७. एओए, आयटीए, ट्रिम्स, इत्यादींसारख्या महत्त्वाच्या करारांबाबत सदस्यदेशांमध्ये सर्वानुमतीचा अभाव.

**पुढील मार्गक्रमणा–**

१. जागतिक व्यापार संघटनेच्या वाद निवारण व्यवस्थेला बळकटी देणे ही भावी परिस्थिती हाताळण्यासाठी काळाची गरज आहे.

२. जागतिक व्यापार संघटनेतील नियम व कार्यपद्धती बदलत्या काळानुसार उत्क्रांत व्हायला हव्यात.

३. जागतिक व्यापार संघटनेतील कार्यपद्धतीविषयक चौकटीमध्ये बदलत्या आर्थिक समतोलानुसार बदल व्हायला हवेत.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

४. एओए, आयटीए, ट्रिम्स, इत्यादींसारख्या मतभिन्नता झालेल्या प्रश्नांवर सर्वानुमती साधायचा प्रयत्न व्हायला हवा.

जग इतके एकात्मक व परस्परसंबंधित झाले आहे की देशांना विविध प्रश्न सोडवण्यासाठी एकत्र यायलाच लागेल. यामध्ये जागतिक व्यापार संघटना महत्त्वाची भूमिका निभावू शकेल.

**जी–२०**

- भारताने १ डिसेंबरला जी–२० मंचाचे अध्यक्षपद इंडोनेशियाकडून स्वीकारले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'ही भारतासाठी मोठी संधी' असल्याचे म्हटले.
- जी–२०मध्ये अर्जेन्टिना, ऑस्ट्रेलिया, ब्राझिल, कॅनडा, चीन, फ्रान्स, जर्मनी, भारत, इंडोनेशिया, इटली, जपान, कोरियाचे प्रजासत्ताक, मॅक्सिको, रशिया, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका, तुर्कस्तान, युनायटेड किंगडम, अमेरिका व युरोपीय संघ यांचा समावेश होतो.

**जी–२० चा इतिहास**

१. कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान, युनायटेड किंगडम व अमेरिका या सात देशांचे अर्थ मंत्री व केंद्रीय बँकांचे गव्हर्नर यांची एक बैठक १९९९ साली वॉशिंग्टन डी.सी. इथे झाली, त्यानंतर जी–२० मंचाची स्थापना करण्यात आली. १९९७–९८मधील आर्थिक संकट व त्याचे परिणाम, हा त्यांना एकत्र आणणारा घटक होता.

२. जी–२० गटाची पहिली वार्षिक बैठक म्हणून हे प्रतिनिधी जर्मनीतील बर्लिनला भेटले. जी–२० नेत्यांची पहिली बैठक १९९९ साली झाली आणि हा मंच २००८ साली राष्ट्रप्रमुखांच्या पातळीवर नेण्यात आला. २००९ साली जी–२०ला 'आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्याचा प्रमुख मंच' असा दर्जा मिळाला.

३. सुरुवातीला हा मंच स्थूलआर्थिक बाबी हाताळत होता, पण नंतरच्या वर्षांमध्ये त्याची कार्यक्रमपत्रिका विस्तारून त्यात व्यापार, हवामानबदल, शाश्वत विकास, आरोग्य, शेती, ऊर्जा, पर्यावरण, हवामानबदल, व भ्रष्टाचारविरोध यांचा समावेश झाला.

**जी–२०चे महत्त्व–**

१. जागतिक जीडीपीतील ९० टक्के वाटा या देशांचा आहे.

२. जागतिक व्यापारातील ८० टक्के वाटा या देशांचा आहे.

३. जागतिक लोकसंख्येतील ६० टक्के लोक या देशांमध्ये राहतात.

**जी–२०चे कामकाज–**

१. जी–२०अंतर्गत होणाऱ्या प्रक्रियांचे दोन समांतर मार्गांमध्ये विभाजन केले जाते– वित्तीय मार्ग व शेर्पा मार्ग.

२. वित्तीय मार्गाचे नेतृत्व सदस्यराष्ट्रांचे अर्थ मंत्री व केंद्रीय बँकांचे गव्हर्नर करतात. त्यांच्यात वर्षभर भेटीगाठी होत असतात.

३. नेत्यांचे वैयक्तिक प्रतिनिधी असणारे शेर्पा हे दुसऱ्या मार्गाचे नेतृत्व करतात. ते वर्षभर वाटाघाटींवर देखरेख ठेवतात, शिखरबैठकांसाठीच्या कार्यक्रमपत्रिकेतील घटकांवर चर्चा करतात आणि जी–२०च्या भरीव कामाचे संयोजन करतात.

४. विशिष्ट सूत्रामध्ये बांधलेले कार्यकारी गट दोन्ही मार्गांवर काम करत असतात. मध्ये सदस्यराष्ट्रांच्या संबंधित मंत्रालयांचे प्रतिनिधी आणि निमंत्रित/पाहुणे देशही असतात.

५. संयुक्त राष्ट्रे, आंतरराष्ट्रीय नाणे निधी व ऑर्गनायझेशन फॉर इकनॉमिक कोऑपरेशन अँड डेव्हलपमेन्ट यांसारख्या विविध आंतरराष्ट्रीय संघटनाही कार्यकारी गटांमध्ये सहभागी होतात.

**जी–२०शी संबंधित प्रश्न व आव्हाने–**

१. परिणामकारक सत्तेचा अभाव– ही कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक संस्था नाही.

२. प्रतिनिधित्वामधील असमतोल– आफ्रिकी देशांचे पुरेसे प्रतिनिधित्व नाही.

३. औपचारिक सनदेच्या अभावी पारदर्शकता व उत्तरदायित्व यांचा प्रश्न.

४. जी–२०ची काही धोरणे बचावात्मकतेला चालना देतात.

**अध्यक्षीय कार्यकाळातील भारतासमोरची आव्हाने–**

१. अन्नाच्या व ऊर्जेच्या वाढत्या किंमती.

२. जागतिक आर्थिक मंती.

३. हवामानबदल– अनेक देशांनी जागतिक तापमानवाढ १.५ अंश सेल्सियसपर्यंत मर्यादित ठेवण्याच्या कल्पनेवर असहमती दर्शवली आहे.

४. भूराजकीय प्रश्न– रशिया–युक्रेन युद्ध.

५. शेजारच्या देशांमधील आर्थिक संकट.

**भारतासाठी संधी व पुढील मार्गक्रमणा–**

१. दहशतवादविरोधी व पुरवठासाखळ्या यांसारख्या महत्त्वाच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी अतिशय महत्त्वाचा मंच.

२. अन्नसुरक्षेसाठी आघाडी उभी करणे.

३. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणे निधी यांसारख्या जागतिक शासनव्यवहाराच्या संस्थांमधील सुधारणांसाठी पाठपुरावा करणे.

४. भारत संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेच्या कायमस्वरूपी सदस्यत्वासाठी मागणी करू शकतो.

५. आंतरराष्ट्रीय समुदायासाठी अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या वळणावर भारत 'दक्षिण गोलार्धा'च्या चिंता ठळकपणे मांडू शकतो.



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

६. भारत या मंचाचा वापर करून पाश्चात्त्य देश व दक्षिण गोलार्धातील देश यांच्यात हवामानबदल, व्यापारसुकरता व आरोग्यसेवाविषयक चिवट सहाय्य या मुद्द्यांवरील तफावत भरून काढू शकतो.

जी–२०चे अध्यक्षपद ही अतुलनीय व अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे.

- परराष्ट्र कामकाज मंत्री एस. जयशंकर.

***



Ramshree, CTS No. 279, N.C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 411 030. Contact : 09894998421

# PRAYAAS - Daily Answer Writing (UPSC)

## FREE ANSWER WRITING INITIATIVE




- Open to all Sincere aspirants.
- Monday to Friday Daily Answer Writing Practice.
- Detailed Individual and Group Feedback.
- Model Answer will be provided both in English and Marathi on Daily Basis.
- Available both in Marathi and English.
- Planned Syllabus Coverage.
- Immediate evaluation within 24 hours.
- Exam oriented Evaluation and Feedback.
- Personal counselling regarding Answer Writing through expert faculty.

Scan the QR code to join us on YouTube and telegram

Address :
Ramashree, CTS No, 279, NC Kelkar Road, Narayan Peth Pune.